**राज्य माहिती आयुक्त, राज्य माहिती आयोग, महाराष्ट्र राज्य, पुणे खंडपीठ यांच्यासमोर**
**माहितीचा अधिकार अधिनियम, २००५ च्या कलम १९ (३) अन्वये दाखल झालेले अपील**

राज्य माहिती आयोग, पुणे खंडपीठ,
नवीन प्रशासकीय इमारत, चौथा मजला,
कौन्सिल हॉल समोर, पुणे ४११ ००१

श्री.रमजान आदम मुजावर
देशप्रेमी मित्र मंडळ, प्रदीप पान शॉपसमोर, यादवनगर, कोल्हापूर अपीलकर्ता

**विरुध्द**

**अपिलीय प्राधिकारी** तथा उपआयुक्त (I), कोल्हापूर महानगरपालिका,
कोल्हापूर उत्तरवादी

**जन माहिती अधिकारी** तथा उप शहर अभियंता, विभागीय कार्यालय क्र.१,
कोल्हापूर महानगरपालिका, कोल्हापूर

| | | |
|---|---|---|
| १ | अपील क्रमांक | २१११/२०१० / कोल्हापूर |
| २ | सुनावणीची तारीख | दि.१३.९.२०११ |

**३. उपस्थित**

**जन माहिती अधिकारी** तथा उप शहर अभियंता, विभागीय कार्यालय क्र.१,
कोल्हापूर महानगरपालिका, कोल्हापूर श्री.महादेव मारूती निर्मळे

| | |
|---|---|
| ४ | माहिती - मागणीच्या मूळ अर्जाची (जोडपत्र-अ) छायाप्रत सोबत जोडली आहे. |

## विवेचन

दि.२३.८.२०११ रोजी प्रस्तुत अपिलाची सुनावणी ठेवण्यात आली होती. अपीलकर्ता अनुपस्थित राहिल्यामुळे दि.१३.९.२०११ रोजी पुन्हा सुनावणी घेण्यात आली. या सुनावणीलाही अपीलकर्ता अनुपस्थित होते.

अपीलकर्ता श्री.रमजान आदम मुजावर यानी जवाहर नेहरू नागरी पुनरूत्थान विकास योजनेतील एकात्मिक गृहनिर्माण योजना, कोटीतीर्थ, यादवनगर या योजनेच्या संदर्भातील माहिती

मागितली होती. विहित मुदतीत माहिती देण्यात आली. यापूवीर्ही तीन अर्जाद्वारे त्यानी एकात्मिक घरकुल योजनेबाबत विस्तृत माहिती मागितली होती. तीही त्याना पुरविण्यात आली होती. माहिती दिली असल्याचे नमूद करून अपिलीय प्राधिकारी यानी अपील निकाली काढले. वरील योजनेच्या संदर्भात नस्ती पहावयाची असल्यास उपलब्ध असल्याचे, मूळ उत्तरातच त्याना कळविले होते व नंतर समक्षही सांगितले होते. परंतु ते आले नाहीत. त्यानंतर स्मरणपत्र पाठवूनही अभिलेख अवलोकनासाठी ते आले नाहीत, असे प्रतिपादन जन माहिती अधिकारी तथा उप शहर अभियंता, विभागीय कार्यालय क्र.१, कोल्हापूर महानगरपालिका, कोल्हापूर श्री.महादेव मारूती निर्मळे यानी पूरक कागदपत्रांसह केले.

जन माहिती अधिकारी व अपिलीय प्राधिकारी यांनी माहितीबाबत केलेली कार्यवाही योग्य आहे.

आयोगाचे आदेश पुढीलप्रमाणे :

**आदेश**

अपील अमान्य करण्यात येत आहे.

**(विजय कुवळेकर)**
**राज्य माहिती आयुक्त,**
**पुणे खंडपीठ**

**पुणे**
**दि :- १४.९.२०११**

**राज्य माहिती आयुक्त, राज्य माहिती आयोग, महाराष्ट्र राज्य, पुणे खंडपीठ यांच्यासमोर**
**माहितीचा अधिकार अधिनियम, २००५ च्या कलम १९ (३) अन्वये दाखल झालेले अपील**

राज्य माहिती आयोग, पुणे खंडपीठ,
नवीन प्रशासकीय इमारत, चौथा मजला,
कौन्सिल हॉल समोर, पुणे ४११ ००१

श्री.रमेश हिंदूराव देसाई
२०२३, बी वॉर्ड, सोमवार पेठ, कोल्हापूर-४१६ ००२ अपीलकर्ता

**विरुध्द**

**अपिलीय प्राधिकारी** तथा उपआयुक्त (II),
कोल्हापूर महानगरपालिका, कोल्हापूर उत्तरवादी

**जन माहिती अधिकारी** तथा कामगार अधिकारी (आस्थापना),
कोल्हापूर महानगरपालिका, कोल्हापूर

| | | |
|---|---|---|
| १ | अपील क्रमांक | १९२५ / २०१० / कोल्हापूर |
| २ | सुनावणीची तारीख | दि.१३.९.२०११ |
| **३.** | **उपस्थित**<br>**जन माहिती अधिकारी** तथा कामगार अधिकारी (आस्थापना), कोल्हापूर महानगरपालिका, कोल्हापूर श्री.संजय शिवाजीराव भोसले | |
| ४ | माहिती - मागणीच्या मूळ अर्जाची (जोडपत्र-अ) छायाप्रत सोबत जोडली आहे. | |

## विवेचन

दि.२३.८.२०११ रोजी प्रस्तुत अपिलाची सुनावणी ठेवण्यात आली होती. त्यावेळी जन माहिती अधिकारी व अपिलीय प्राधिकारी उपस्थित होते. अपीलकर्ता अनुपस्थित होते. परंतु अपरिहार्य कारणामुळे सुनावणी रद्द करण्यात आली व दि.१३.९.२०११ रोजी सुनावणी घेण्यात आली. त्या दिवशीही अपीलकर्ता हे अनुपस्थित होते.

कनिष्ठ अभियंता श्री.सरनोबत यांच्याकडे शहर अभियंता पदाचा पदभार देणेच्या संदर्भातील आक्षेप नोंदविणारा अर्ज अपीलकर्ता श्री.रमेश हिंदूराव देसाई यानी माहितीच्या अधिकाराखाली केला होता. ही बाब माहितीचा अधिकार अधिनियम, २००५ अंतर्गत व अभिलेखात येत नसल्याचे त्यांच्या निदर्शनास आणून दिले असता त्यानी कार्यभार सोपविल्याची प्रत व त्या अनुषंगाने मुंबई उच्च न्यायालयातील रिट अर्जावरील निकालाची प्रत ही माहिती निःशुल्क देण्याची मागणी केली. त्यानुसार ती माहिती पुरविली, असे जन माहिती अधिकारी तथा कामगार अधिकारी (आस्थापना), कोल्हापूर महानगरपालिका, कोल्हापूर श्री.संजय शिवाजीराव भोसले यानी नमूद केले.

अपीलकर्ता यांची मागणी माहितीचा अधिकार अधिनियम, २००५ च्या कलम २ मध्ये नमूद केलेल्या 'माहिती'च्या संज्ञेत येत नाही. तसेच संपूर्ण माहिती मिळाली असल्याचे अपीलकर्त्यानी लेखी निवेदनाद्वारे आयोगास कळविले. सबब आयोगाचे आयोगाचे आदेश पुढीलप्रमाणे :

**<u>आदेश</u>**

अपील निकाली काढण्यात येत आहे.

**(विजय कुवळेकर)**
**राज्य माहिती आयुक्त,**
**पुणे खंडपीठ**

**पुणे**
**दि :- १४.९.२०११**

**राज्य माहिती आयुक्त, राज्य माहिती आयोग, महाराष्ट्र राज्य, पुणे खंडपीठ यांच्यासमोर**
**माहितीचा अधिकार अधिनियम, २००५ च्या कलम १९ (३) अन्वये दाखल झालेले अपील**

राज्य माहिती आयोग, पुणे खंडपीठ,
नवीन प्रशासकीय इमारत, चौथा मजला,
कौन्सिल हॉल समोर, पुणे ४११ ००१

श्री.दिवाकर सदाशिव वाटवे
३६/बी, प्लॉट नं.४, ई-वॉर्ड, ताराबाई पार्क, सदर बाजारजवळ, कोल्हापूर अपीलकर्ता

**विरुध्द**

**अपिलीय प्राधिकारी** तथा जिल्हा पुनर्वसन अधिकारी, मध्यवर्ती
प्रशासकीय इमारत, कसबा बावडा, कोल्हापूर उत्तरवादी

**जन माहिती अधिकारी** तथा तहसीलदार, पुनर्वसन, जिल्हा पुनर्वसन
अधिकारी कार्यालय, मध्यवर्ती प्रशासकीय इमारत, कसबा बावडा, कोल्हापूर

| | | |
|---|---|---|
| १ | अपील क्रमांक | २०८५ / २०१० / कोल्हापूर |
| २ | सुनावणीची तारीख | दि.१३.९.२०११ |
| **३. उपस्थित**<br><br>**अपिलीय प्राधिकारी** तथा जिल्हा पुनर्वसन अधिकारी,<br>मध्यवर्ती प्रशासकीय इमारत, कसबा बावडा, कोल्हापूर प्रतिनिधी श्री.एस.डी.रावळ | | |
| ४ | माहिती - मागणीच्या मूळ अर्जाची (जोडपत्र-अ) छायाप्रत सोबत जोडली आहे. | |

## विवेचन

दि.२३.८.२०११ रोजी प्रस्तुत अपिलाची सुनावणी ठेवण्यात आली होती. अपरिहार्य कारणामुळे सुनावणी रद्द करण्यात आली व दि.१३.९.२०११ रोजी सुनावणी ठेवण्यात आली. या सुनावणीला अपीलकर्ता गैरहजर होते.

‘माहिती मिळाली असून मी केलेल्या अर्जाबाबत माझे पूर्ण समाधान झाल्याने अपील निकाली काढावे,’ असे अपीलकर्ता श्री.दिवाकर सदाशिव वाटवे यांचे लेखी निवेदन अपिलीय प्राधिकारी तथा जिल्हा पुनर्वसन अधिकारी, मध्यवर्ती प्रशासकीय इमारत, कसबा बावडा, कोल्हापूर यांचे प्रतिनिधी श्री.एस.डी.रावळ यानी आयोगाला सुनावणीच्या वेळी सादर केले.

आयोगाचे आदेश पुढीलप्रमाणे :

**आदेश**

अपील निकाली काढण्यात येत आहे.

**(विजय कुवळेकर)**
**राज्य माहिती आयुक्त,**
**पुणे खंडपीठ**

**पुणे**
**दि :- १४.९.२०११**

**राज्य माहिती आयुक्त, राज्य माहिती आयोग, महाराष्ट्र राज्य, पुणे खंडपीठ यांच्यासमोर**
**माहितीचा अधिकार अधिनियम,२००५ च्या कलम १९ (३) अन्वये दाखल झालेले अपील**

राज्य माहिती आयोग, पुणे खंडपीठ,
नवीन प्रशासकीय इमारत, चौथा मजला,
कौन्सिल हॉल समोर, पुणे ४११ ००१

श्री. निवृत्ती विष्णु साळुंखे
जिल्हा परिषद कॉलनी, आगशिवनगर,
कराड, जि. सातारा अपीलकर्ता

**विरुध्द**

**अपिलीय प्राधिकारी** तथा तालुका कृषि अधिकारी,
कृषि अधिकारी कार्यालय, पाटण, जि. सातारा

उत्तरवादी

**जन माहिती अधिकारी** तथा मंडल कृषि अधिकारी,
कृषि अधिकारी कार्यालय, पाटण, जि. सातारा

| | | |
|---|---|---|
| १ | अपील क्रमांक | १६४९/२०१०/सातारा |
| २ | सुनावणीची तारीख | दि. २२/२/२०११ |

**३. उपस्थित**

**अपीलकर्ता** श्री. निवृत्ती विष्णु साळुंखे
जिल्हा परिषद कॉलनी, आगशिवनगर, कराड, जि. सातारा

**अपिलीय प्राधिकारी** तथा तालुका कृषि अधिकारी,
कृषि अधिकारी कार्यालय, पाटण, जि. सातारा श्री.चंद्रकांत गणपतराव जगताप

**विद्यमान जन माहिती अधिकारी** तथा मंडल कृषि अधिकारी,
कृषि अधिकारी कार्यालय, पाटण, जि. सातारा श्री. रामचंद्र धोंडीबा मासाळ

| | |
|---|---|
| | **तत्कालीन जन माहिती अधिकारी** तथा मंडल कृषि अधिकारी,<br>कृषि अधिकारी कार्यालय, पाटण, जि. सातारा श्री. शिवाजीराव दत्तात्रय खराडे |
| ४ | माहिती - मागणीच्या मूळ अर्जाची (जोडपत्र-अ) छायाप्रत सोबत जोडली आहे. |

## विवेचन

आयोगापुढील सुनावणीत अपीलकर्ता, जन माहिती अधिकारी व अपिलीय प्राधिकारी यांनी पुढीलप्रमाणे निवेदन केले :

अपीलकर्ता- ग्राम बीजोत्पादन योजनेअंतर्गत शेतकऱ्यांना अनुदान वाटप करताना पाटणचे तत्कालीन तालुका कृषि अधिकारी श्री. उत्तमराव देसाई यानी गैरप्रकार केला असून त्या अनुषंगाने मागितलेली माहिती दिली नाही. ३३ शेतकऱ्यांची यादीत नावे असूनही प्रत्यक्ष अनुदान दिलेले नाही. सन २००७ साली मृत्यू पावलेल्या शेतकऱ्याचेही नाव २००८-०९ च्या अनुदान वाटपाच्या यादीत आहे. तालुका कृषि अधिकारी, पाटण यांच्या कार्यालयातील कर्मचाऱ्यांच्या भत्त्यांबाबतच्या केलेल्या तक्रारीवरील चौकशीच्या अहवालाची प्रत दिली नाही. अभिलेख अवलोकनासाठी मागणाऱ्या अर्जाची दखल घेतली नाही. अनुदान वाटपातील भ्रष्टाचाराबद्दल अन्यायग्रस्त शेतकऱ्यांसह अनेकांनी वेळोवेळी तक्रारी केल्या आहेत. काही बाबतीत चौकशीही झाली आहे. परंतु सत्य स्पष्ट करणारी माहिती अधिकारी देत नाहीत.

तत्कालीन जन माहिती अधिकारी- अपीलकर्त्यांच्या अर्जाला विहित मुदतीत उत्तर देऊन शुल्क कळविले. दि. २२/४/२०१० रोजी त्यानी शुल्क भरल्यावर दि. २३/४/२०१० रोजी माहिती दिली. दि. ३/५/२०१० पासून मी तो पदभार सोडला.

विद्यमान जन माहिती अधिकारी - प्रथम अपिलीय प्राधिकाऱ्यांपुढील सुनावणीच्या वेळी मी पदभार स्वीकारला होता. त्यानंतर अपीलकर्त्यांनी केलेल्या अर्जानुसार मागितलेली इतर माहितीही अपीलकर्त्यास दिली.

<u>अपिलीय प्राधिकारी</u> - श्री.निवृत्ती विष्णु साळुंखे व इतर काही शेतकऱ्यांनी/लाभार्थींनी तालुका कृषि अधिकारी श्री. उत्तमराव देसाई यांच्या विरुध्द केलेल्या भ्रष्टाचाराच्या आरोपासंदर्भात उपविभागीय कृषि अधिकारी, कराड यानी चौकशी करुन अहवाल सादर केलेला आहे.

अपीलकर्त्यांनी उपस्थित केलेला मुद्दा व्यक्तिगत मागणीच्या स्वरुपाचा नाही, तर सार्वजनिक निधीच्या वापराबाबतचा व शासकीय योजनेचा लाभ योग्य व्यक्तींपर्यंत पोहचण्यासंदर्भातील आहे, आणि म्हणून तो व्यापक सार्वजनिक महत्त्वाचा आहे. माहितीविषयक तांत्रिक पूर्ततेवर जन माहिती अधिकारी व अपिलीय प्राधिकारी यांनी भर दिलेला दिसतो. अभिलेखानुसार माहिती पुरविण्याची मर्यादा त्यांना असली, तरी त्यातून वस्तुस्थितीची नेमकी माहिती मिळत नाही. अभिलेखात असेल त्यानुसार माहिती देण्याची तरतूद माहितीचा अधिकार अधिनियम, २००५ मध्ये आहे, हे खरे. परंतु सार्वजनिक निधीच्या/शासकीय योजनेच्या अंमलबजावणीच्या बाबतीत अभिलेखातील नोंदींबाबतच नागरिकांच्या सामूहिक स्वरुपातील तक्रारी/आक्षेप असतील आणि त्याबद्दल शासनाच्या स्तरावरुन चौकशीची कार्यवाहीही झाली असेल अथवा प्रस्तावित असेल, तर त्या अभिलेखातील; नोंदींच्या स्वरुपातील माहितीबाबत साशंकता शासनालाही वाटत असल्याचे स्पष्ट होते. एखाद्या प्रकरणात चौकशीसारखी प्रशासकीय कार्यवाही करणे/आदेशित करणे ही सर्वसाधारणतः माहितीचा अधिकार अधिनियम, २००५ च्या कक्षेतील बाब नाही. मात्र माहितीचा अधिकार अधिनियम, २००५ च्या कलम ४ अन्वये शासनाच्या सार्वजनिक योजनांच्या संदर्भातील सर्व माहिती स्वयंस्फूर्तीने 'सार्वजनिक प्राधिकरणां'नी जाहीर करणे बंधनकारक आहे, आणि ही माहिती सत्य असणे हीदेखील सार्वजनिक प्राधिकरणाची जबाबदारी आहे. व्यक्तिगत विषयांच्या संदर्भात आक्षेप, तक्रारींवरुन अभिलेखांची सत्यता पडताळणे वा अनुषंगिक प्रशासकीय कार्यवाही करणे/आदेशित करणे ही माहितीचा अधिकार अधिनियम, २००५ च्या कक्षेतील बाब नाही व तसे करणे शक्यही नाही. सार्वजनिक हिताच्या विषयांच्या संदर्भात मात्र त्या त्या प्रकरणातील परिस्थितीनुसार आवश्यक तर अशी पडताळणी करावी लागेल. शासकीय कारभारात पारदर्शकता असणे आणि नागरिकांना संपूर्ण सत्य माहिती मिळणे हा माहितीचा अधिकार अधिनियम, २००५ मधील अविभाज्य भाग आहे. म्हणून अभिलेखातील नोंदींच्या सत्यतेबाबत माहितीचा अधिकार अधिनियम,

२००५ च्या कलम १८ (२) नुसार चौकशी करणे अपरिहार्य ठरेल. कारण अशी पडताळणी झ ााल्याशिवाय नेमकी माहिती स्पष्ट होणार नाही. म्हणून उपविभागीय कृषि अधिकारी, कराड यांच्या चौकशी अहवालाबरोबरच संबंधित विषयातील वस्तुस्थितीचा नेमकी, तपशीलवार माहिती देणारा अहवाल, आवश्यक तर अनुदानप्रकरणी पूर्ण छाननी करुन, विभागीय कृषि सहसंचालक, कोल्हापूर विभाग, कोल्हापूर व जिल्हा अधीक्षक कृषि अधिकारी, सातारा यांनी १५ दिवसांत आयोगाला सादर करावा, असे मौखिक आदेश आयोगाने सुनावणीच्या वेळी दिले. त्यानुसार त्यांनी दि. २/९/२०११ च्या पत्रान्वये अहवाल सादर केला. चौकशीची व्याप्ती लक्षात घेता अहवाल सादर करण्यास झालेला विलंब मान्य करण्यात येत आहे. अपीलकर्ता श्री. निवृत्ती विष्णु साळुंखे व इतर ९१ शेतकऱ्यांनी तत्कालीन तालुका कृषि अधिकारी, पाटण श्री. यु. के. देसाई यांच्याविरुध्द रु १०,५५,०००/- अनुदान प्रत्यक्ष न वाटल्याची व खोटी कागदपत्रे तयार करून संगनमताने भ्रष्टाचार केल्याची तक्रार केली होती. उपविभागीय कृषि अधिकारी, कराड श्री. एस.बी.दोरगे यांनी दि. ४/२/२०११ व दि. ३/६/२०११ रोजी सादर केलेला चौकशी अहवाल लक्षात घेऊन जिल्हा अधीक्षक, कृषी अधिकारी, सातारा यानी दि. ५/७/२०११ अन्वये अभिप्राय सादर केले. त्याची छाननी करून संबंधित प्रकरणी विभागीय कृषि सहसंचालक, कोल्हापूर विभाग, कोल्हापूर या कार्यालयाच्या स्तरावरुन चौकशी करण्यासाठी सहा अधिकाऱ्यांची नियुक्ती करण्यात आली. त्यांच्या अहवालानुसार संबंधित कृषि सहाय्यक, कृषि पर्यवेक्षक, मंडल कृषि अधिकारी व तालुका कृषि अधिकारी, पाटण यांना जबाबदार धरुन योग्य ती प्रशासकीय कार्यवाही करावी, अशी शिफारस विभागीय कृषि सहसंचालक, कोल्हापूर विभाग, कोल्हापूर यानी आयुक्त कृषि, महाराष्ट्र राज्य, पुणे याना दि. ८/७/२०११ रोजी सादर केलेल्या अहवालात केली आहे. या अहवालाची प्रत जिल्हा अधीक्षक, कृषि अधिकारी, सातारा यानी दि. २/९/२०११ च्या पत्रान्वये आयोगाला सादर केली. या अहवालाची प्रत त्यानी अपीलकर्त्यास पुरविणे आवश्यक आहे.

आयोगाचे आदेश पुढीलप्रमाणे :

## आदेश

१. अपील मान्य करण्यात येत आहे.

२. विभागीय कृषि सहसंचालक, कोल्हापूर विभाग, कोल्हापूर यांच्या अहवालावर केलेल्या कार्यवाहीची माहिती आयुक्त कृषि, महाराष्ट्र राज्य, पुणे यानी दि. ३०/१०/२०११ पर्यंत आयोगाला सादर करावी व त्याची प्रत अपीलकर्त्यास पुरवावी.

**(विजय कुवळेकर)**
**राज्य माहिती आयुक्त,**
**पुणे खंडपीठ**

**पुणे**
**दि :- २३.९.२०११**

**राज्य माहिती आयुक्त, राज्य माहिती आयोग, महाराष्ट्र राज्य, पुणे खंडपीठ यांच्यासमोर**
**<u>माहितीचा अधिकार अधिनियम, २००५ च्या कलम १९ (३) अन्वये दाखल झालेले अपील</u>**

राज्य माहिती आयोग, पुणे खंडपीठ,
नवीन प्रशासकीय इमारत, चौथा मजला,
कौन्सिल हॉल समोर, पुणे ४११ ००१

श्री.सुरेश जयसिंग वायदंडे
मु.पो.पेठ वडगांव, भादोले रोड, ता.हातकणंगले, जि.कोल्हापूर अपीलकर्ता

**विरुध्द**

**(१)अपिलीय प्राधिकारी** तथा जिल्हा उपनिबंधक, सहकारी संस्था,
जि.कोल्हापूर (अपील क्र.२२११/२०१०/कोल्हापूर) उत्तरवादी
**(२)अपिलीय प्राधिकारी** तथा विशेष जिल्हा समाजकल्याण अधिकारी,
मध्यवर्ती प्रशासकीय इमारत, कसबा बावडा रोड, कोल्हापूर (अपील क्र.२२१२/२०१०/कोल्हापूर)
**(१)जन माहिती अधिकारी** तथा सहाय्यक निबंधक, सहकारी संस्था, जि.कोल्हापूर
**(२)जन माहिती अधिकारी** तथा सहाय्यक निबंधक, सहकारी संस्था, जि.कोल्हापूर

| | | |
|---|---|---|
| १ | अपील क्रमांक | २२११+२२१२ / २०१० / कोल्हापूर |
| २ | सुनावणीची तारीख | दि.१३.९.२०११ |

**३. उपस्थित**

**अपीलकर्ता** श्री.सुरेश जयसिंग वायदंडे
मु.पो.पेठ वडगांव, भादोले रोड, ता.हातकणंगले, जि.कोल्हापूर

**(१)अपिलीय प्राधिकारी** तथा जिल्हा उपनिबंधक, सहकारी संस्था, जि.कोल्हापूर
श्री.सचिन रावल

**(२)अपिलीय प्राधिकारी** तथा विशेष जिल्हा समाजकल्याण अधिकारी, मध्यवर्ती प्रशासकीय इमारत, कसबा बावडा रोड, कोल्हापूर डॉ.बाजीराव पाटील

**(१)जन माहिती अधिकारी** तथा सहाय्यक निबंधक, सहकारी संस्था, जि.कोल्हापूर
श्री.महेश रोहिदास शेलार, श्रीमती ए.व्ही.पाटील

| | |
|---|---|
| | **त्रयस्थ पक्ष**-मॅनेजर, भारतीय मागासवर्गीय औद्योगिक उत्पादन सहकारी संस्था मर्यादित, वडगाव, ता.हातकणंगले, जि.कोल्हापूर प्रतिनिधी ॲड.एस.एन.मुदगल |
| ४ | माहिती - मागणीच्या मूळ अर्जाची (जोडपत्र-अ) छायाप्रत सोबत जोडली आहे. |

## विवेचन

दि.२३.८.२०११ रोजी प्रस्तुत अपिलांची सुनावणी ठेवण्यात आली होती. अपील क्र.२२११/२०१०/कोल्हापूर या अपिलामध्ये उभय घटकांमधील सर्व उपस्थित होते. परंतु अपील क्र.२२१२ मध्ये फक्त अपीलकर्ता उपस्थित असल्यामुळे दि.१३.९.२०११ रोजी पुन्हा सुनावणी घेण्यात आली.

अपीलकर्ता, जन माहिती अधिकारी व अपिलीय प्राधिकारी यांनी आयोगासमोरील सुनावणीत खालीलप्रमाणे निवेदन केले :

अपीलकर्ता : भारतीय मागासवर्गीय औद्योगिक उत्पादन सहकारी संस्था मर्यादित, वडगाव, ता.हातकणंगले, जि.कोल्हापूर या संस्थेच्या संचालक मंडळाची यादी, प्रकल्प अहवाल, मंजूर निधी आदीबाबतची माहिती जन माहिती अधिकारी तथा सहाय्यक निबंधक, सहकारी संस्था, जि.कोल्हापूर व अपिलीय प्राधिकारी तथा विशेष जिल्हा समाजकल्याण अधिकारी, मध्यवर्ती प्रशासकीय इमारत, कसबा बावडा रोड, कोल्हापूर यांच्याकडे मागितली होती. अपिलीय प्राधिकारी यानी संस्थेला कळवूनही संस्थेने माहिती दिली नाही. अपिलीय प्राधिकारी यांच्या आदेशानंतरही संस्थेने माहिती पुरविली नाही. मॅनेजर, भारतीय मागासवर्गीय औद्योगिक उत्पादन सहकारी संस्था मर्यादित, वडगाव, ता.हातकणंगले, जि.कोल्हापूर यांच्या कार्यालयात वारंवार विचारणा करूनही त्यांच्याकडूनही माहितीची पूर्तता झाली नाही.

जन माहिती अधिकारी यांचे प्रतिनिधी (अ.क्र.२२१२) - संस्थेला शासनाने मदत अथवा अनुदान दिलेले नाही. रूपये २.५४ कोटीचा हा प्रकल्प असून भागभांडवल व कर्ज म्हणून शासनाने दिलेली ७० टक्के रक्कम व्याजासह परतफेड करण्याची आहे. त्यामुळे संस्थेला माहितीचा अधिकार अधिनियम,

२००५ लागू नाही. अपीलकर्ता याना दोन वेळा नि:शुल्क माहिती देऊनही पुन: पुन्हा ते त्याच त्याच स्वरूपाची मागणी माहितीचा अधिकार अधिनियम, २००५ अंतर्गत करीत आहेत.

जन माहिती अधिकारी (अ.क्र.२२११): जमीन खरेदीची आहे. शासन अनुदान ५० टक्के कर्ज व ५० टक्के अनुदान असा रेशो आहे. ३७.५० लाख रूपये भागभांडवल व तेवढेच कर्ज मिळालेले आहे. भागभांडवल व कर्ज हे सर्व परतफेड करण्याचे आहे. शासनाचे भरीव अनुदान वा अर्थसहाय्य नसल्यामुळे माहितीचा अधिकार अधिनियम, २००५ संस्थेला लागू होत नाही.

उभय बाजूंची निवेदने व सादर करण्यात आलेली कागदपत्रे विचारात घेता संस्थेला शासनाकडून मिळालेली रक्कम परतफेडीच्या कर्जाच्या स्वरूपाची आहे. ती तत्कालीन स्वरूपाची मदत असली तरी माहितीचा अधिकार अधिनियम, २००५ कलम २(एच) मधील तरतुदीनुसार भरीव अर्थसहाय्य मानता येणार नाही. त्यामुळे संस्थेला माहितीचा अधिकार अधिनियम, २००५ लागू होणार नाही. तथापि यातील काही मुद्दयांची माहिती सहकार खाते व काही मुद्दयांची माहिती समाजकल्याण खाते संबंधित संस्थेकडून प्रशासकीय अधिकारात प्राप्त करून घेऊ शकते. तशी ती प्राप्त करून घेऊन त्यानी अधिनियमाच्या कलमान्वये अपीलकर्त्यास देणे योग्य ठरेल. मात्र संचालक मंडळाच्या ग्रुप फोटोसारखी अपीलकर्त्यांची मागणी अवाजवी आहे.

आयोगाचे आदेश पुढीलप्रमाणे :

## आदेश

(१) अपिले अंशत: मान्य करण्यात येत आहेत.

(२) भारतीय मागासवर्गीय औद्योगिक उत्पादन सहकारी संस्था मर्यादित, वडगाव, ता.हातकणंगले, जि.कोल्हापूर या संस्थेच्या संचालकांची व सभासदांची यादी जन माहिती अधिकारी तथा सहाय्यक निबंधक, सहकारी संस्था, जि.कोल्हापूर यानी अपीलकर्त्यास द्यावी. मूळ अर्जातील मुद्दा क्र.३,५,७ ही माहिती जन माहिती अधिकारी तथा कार्यालय अधीक्षक, विशेष जिल्हा समाजकल्याण अधिकारी कार्यालय, मध्यवर्ती प्रशासकीय इमारत, कसबा बावडा रोड, कोल्हापूर यानी अपीलकर्त्यास द्यावी. मु.क्र.१० व ११ ची माहिती मॅनेजर, भारतीय मागासवर्गीय औद्योगिक उत्पादन सहकारी संस्था मर्यादित, वडगाव, ता.हातकणंगले, जि.कोल्हापूर यानी जन माहिती अधिकारी तथा कार्यालय अधीक्षक, विशेष

जिल्हा समाजकल्याण अधिकारी कार्यालय, मध्यवर्ती प्रशासकीय इमारत, कसबा बावडा रोड, कोल्हापूर याना सादर करावी व त्यानी ती अपीलकर्त्यास पुरवावी. ही सर्व कार्यवाही जन माहिती अधिकारी तथा सहाय्यक निबंधक, सहकारी संस्था, जि.कोल्हापूर व जन माहिती अधिकारी तथा  कार्यालय अधीक्षक, विशेष जिल्हा समाजकल्याण अधिकारी कार्यालय, मध्यवर्ती प्रशासकीय इमारत, कसबा बावडा रोड, कोल्हापूर यांनी पूर्ण करून दि.३०.९.२०११ पर्यंत अनुपालन अहवाल आयोगाला सादर करावा.

**(विजय कुवळेकर)**
**राज्य माहिती आयुक्त,**
**पुणे खंडपीठ**

**पुणे**
**दि :- १५.९.२०११**

**राज्य माहिती आयुक्त, राज्य माहिती आयोग, महाराष्ट्र राज्य, पुणे खंडपीठ यांच्यासमोर**
**माहितीचा अधिकार अधिनियम, २००५ च्या कलम १९ (३) अन्वये दाखल झालेले अपील**

राज्य माहिती आयोग, पुणे खंडपीठ,
नवीन प्रशासकीय इमारत,चौथा मजला,
कौन्सिल हॉल समोर, पुणे -४११००१

श्री. रामगोंडा शिवनिंगप्पा पाटील — **अपिलकर्ता**
शिव- पार्वती सिंधू विहार, साखर कारखाना रोड, जुळे सोलापूर

**विरूध्द**

**अपिलीय प्राधिकारी तथा** विस्तार अधिकारी, पंचायत समिती — **उत्तरवादी**
दक्षिण सोलापूर, ता. दक्षिण सोलापूर, जि. सोलापूर

**जन माहिती अधिकारी तथा** ग्रामसेवक, ग्रामपंचायत संजवाड,
ता. दक्षिण सोलापूर, जि. सोलापूर

| | | |
|---|---|---|
| १ | अपील क्रमांक | १५९६/ २०१०/सोलापूर |
| २ | सुनावणीची तारीख | दि.३०.०६.२०११ |
| ३ | **उपस्थित**<br><br>**अपीलकर्ता** श्री. रामगोंडा शिवनिंगप्पा पाटील<br>शिव- पार्वती सिंधू विहार, साखर कारखाना रोड, जुळे सोलापूर<br><br>**अपिलीय प्राधिकारी तथा** विस्तार अधिकारी, पंचायत समिती दक्षिण सोलापूर<br>ता. दक्षिण सोलापूर, जि. सोलापूर श्री. पी. एल. कोळी | |

## विवेचन

वाचा:- आयोगाचा समक्रमांकाचा आदेश दि - २९/०७/२०११

अपीलकर्ता श्री. रामगोंडा शिवनिगंप्पा पाटील यांच्या अपिलावर राज्य माहिती आयोगाने पारित केलेल्या दि. २९.०७.२०११ च्या आदेशामधील अ. क्र. २ मध्ये आयोगाच्या मौखिक आदेशानुसार अहवाल सादर न करण्याबद्दल अपिलीय प्राधिकारी तथा विस्तार अधिकारी, पंचायत समिती, दक्षिण सोलापूर,

जि. सोलापूर श्री. पी. एल. कोळी यांच्याविरूध्द शिस्तभंगाची करवाई का करू नये, याचा खुलासा व तत्कालीन जन माहिती अधिकारी तथा ग्रामसेवक, ग्रामपंचायत संजवाड, ता दक्षिण सोलापूर, जि. सोलापूर श्री. मदन कांबळे यांच्याकडून अपीलकर्त्यास माहिती देण्याबाबत केलेल्या कार्यवाहीचा शास्तीविषयक म्हणण्यासह खुलासा मागविण्यात आला होता.

आयोगाच्या मौखिक आदेशानुसार सबंधित ग्रामसेवक यांना विलंबाबत दि. ८.७.२०११ रोजी लेखी पत्र दिले व वारंवार भ्रमणध्वनीव्दारे सूचना देऊनही श्री. एम. जी. कांबळे, ग्रामसेवक यांनी खुलासा सादर केला नाही. त्यामुळे आयोगास अहवाल पाठविण्यास विलंब झाला, असे नमूद करून एक वेळ माफ करण्याची विनंती अपिलीय प्राधिकारी तथा विस्तार अधिकारी, पंचायत समिती, दक्षिण सोलापूर, जि. सोलापूर श्री. पी. एल. कोळी यानी दि.२५.०८.२०११ च्या पत्रान्वये आयोगास केली. ती मान्य करण्यात येत आहे.

मौजे संजवाड, ता. दक्षिण सोलापूर येथील ग्रामपंचायतीकडील माहिती मिळणेबाबत श्री. पाटील यानी दि. १५.०३.२०१०, १७.०३.२०१० व १८.०३.२०१० असे तीन अर्ज टपालाने सादर केले होते. त्यावेळी माझ्याकडे ग्रामपंचायत औराद, ता. दक्षिण सोलापूर, जि. सोलापूर ही मोठी ग्रामपंचायत होती. त्यामुळे कामाचा भार जास्त होता. शिवाय दरम्यानच्या काळात मी कंत्राटी ग्रामसेवकपदावरून नियमित ग्रामसेवक म्हणून कार्यरत झालो. त्यामुळे सबंधिताला मुदतीत माहिती देण शक्य झाले नाही. अपिलीय प्राधिकारी यांच्या निर्णयानंतर दि. २३.०६.२०१० रोजी टपालाने माहिती पाठविली, असे तत्कालीन जन माहिती अधिकारी तथा ग्रामसेवक, ग्रामपंचायत संजवाड, ता. दक्षिण सोलापूर जि. सोलापूर श्री. एम.जी. कांबळे यानी दि. २५.०८.२०११ च्या पत्रान्वये आयोगास सादर केलेल्या, खुलाशात म्हटले आहे,

अपीलकर्त्यानी तीन अर्जावर एकत्रित अपील करणे योग्य नाही. तथापि तत्कालीन जन माहिती अधिकारी तथा ग्रामसेवक, ग्रामपंचायत संजवाड ता. दक्षिण सोलापूर जि. सोलापूर श्री. एम. जी. कांबळे यांचा खुलासा विचारात घेता माहिती विलंबाने दिल्याचे स्पष्ट होते. त्यानी नमूद केलेली कारणे लक्षात घेऊन विलंबाचा काही कालावधी क्षम्य मानला तरी संपूर्ण कालावधी क्षमापित करण्यास त्यांचा खुलासा समर्थनीय नाही. ते शास्तीस पात्र ठरतात. यास्तव आयोगाचे अंतिम आदेश पुढीलप्रमाणे :-

## अंतिम आदेश

तत्कालीन जन माहिती अधिकारी तथा ग्रामसेवक, ग्रामपंचायत संजवाड, ता. दक्षिण सोलापूर, श्री. एम. जी. कांबळे यानी अपिलकर्त्यास माहिती देण्यास ६९ दिवसांचा विलंब केला असन त्यातील ३३ दिवसांच्या

विलंब त्यांचा खुलासा लक्षात घेऊन क्षमापित करण्यात येत असून उर्वरित ३६ दिवसांसाठी त्याना माहितीचा अधिकार अधिनियम, २००५ कलम २० मधील तरतुदीनुसार प्रतिदिन रू. २५० /- प्रमाणे एकूण रूपये ९००० /- शास्ती लावण्यात येत आहे. शास्तीची रक्कम तत्कालीन जन माहिती अधिकारी तथा ग्रामसेवक, ग्रामपंचायत संजवाड; ता. दक्षिण सोलापूर, जि. सोलापूर श्री. एम. जी. कांबळे यांच्या माहे ऑक्टोबर २०११, नोव्हेंबर २०११, डिसेंबर २०११ च्या अनुक्रमे नोव्हेंबर २०११, डिसेंबर २०११ व जानेवारी २०१२ मध्ये देय असलेल्या वेतनातून कपात करून '००७, इतर प्रशासकीय सेवा, ६०, इतर सेवा, ८००, इतर जमा रकमा, (१८)माहितीचा अधिकार (००७०००१६१)' या लेखाशिर्षाखाली जमा करण्याची कार्यवाही अपिलीय प्राधिकारी तथा विस्तार अधिकारी (पं), पंचायत समिती दक्षिण सोलापूर, जि. सोलापूर यानी करावी व त्याबाबतचा पूर्तता अहवाल आयोगास सादर करावा.

पुणे
दि. 22 SEP 2011

(विजय कुवळेकर)
राज्य माहिती आयुक्त,
पुणे खंडपीठ

राज्य माहिती आयोग, महाराष्ट्र
पुणे खंडपीठ

**राज्य माहिती आयुक्त, राज्य माहिती आयोग, महाराष्ट्र राज्य, पुणे खंडपीठ यांच्यासमोर**
**माहितीचा अधिकार अधिनियम,२००५ च्या कलम १९ (३) अन्वये दाखल झालेले अपील**

राज्य माहिती आयोग, पुणे खंडपीठ,
नवीन प्रशासकीय इमारत, चौथा मजला,
कौन्सिल हॉल समोर, पुणे ४११ ००१

सौ. मोहिनी मनोहर कोळी
'मातृछाया निवास', ८७०/अ/३ ब, त्र्यंबोलीनगर कॉलनी,
लाईन बाजार, कोल्हापूर ४१६ ००६ — अपीलकर्ता

**विरुध्द**

**अपिलीय प्राधिकारी** तथा उपसंचालक
(ए.क्षे.वि.का) आदिवासी संशोधन व प्रशिक्षण संस्था, २८, क्विन्स गार्डन, पुणे ४११ ००१
(अपील क्र. २४९६/२०१०, २६६४/२०१०, ३०९३/२०१०, ३०९४/२०१०, ३०९५/२०११)

उत्तरदायी

**जन माहिती अधिकारी** तथा संशोधन अधिकारी,
संशोधन व प्रशिक्षण संस्था, पुणे
(अपील क्र. २४९६/२०१०, २६६४/२०१०, ३०९३/२०१०, ३०९४/२०१०, ३०९५/२०१०, २४१४/२०११)

**अपिलीय प्राधिकारी** तथा उपसंचालक
(ए.क्षे.वि.का) आदिवासी संशोधन व प्रशिक्षण संस्था,
२८, क्विन्स गार्डन, पुणे ४११ ००१ (अपील क्र. ३०९४/२०१०,२४१४/२०११)

**जन माहिती अधिकारी** तथा कक्ष अधिकारी,
आदिवासी विकास विभाग, मंत्रालय, मुंबई
(अपील क्र. ३०९४/२०१०, २४१४/२०११, २१२४/२०११, २१२५/२०११, २१२६/२०११)

**अपिलीय प्राधिकारी** तथा सह सचिव,
आदिवासी विकास विभाग, म.रा.मंत्रालय, मुंबई.
(अपील क्र. २१२४/२०११, २१२५/२०११, २१२६/२०११)

**जन माहिती अधिकारी** तथा कक्ष अधिकारी,
आदिवासी विकास विभाग, मंत्रालय, मुंबई (अपील क्र. २१२४/२०११, २१२५/२०११, २१२६/२०११)

**जन माहिती अधिकारी** तथा सांख्यिकी अधिकारी,
आदिवासी संशोधन व प्रशिक्षण संस्था, पुणे (अपील क्र. २१२६/२०११)

**जन माहिती अधिकारी** तथा उपग्रंथपाल,
'जे' ग्रंथालय, विधानभवन, मुंबई (अपील क्र. २१२५/२०११)

**अपिलीय प्राधिकारी** तथा सह सचिव,
महाराष्ट्र शासन, गृह विभाग, मंत्रालय, मुंबई (अपील क्र. २४१३/२०११)

**जन माहिती अधिकारी** तथा कक्ष अधिकारी,
महाराष्ट्र शासन, गृह विभाग, मंत्रालय, मुंबई (अपील क्र. २४१३/२०११)

**अपिलीय प्राधिकारी** तथा उपसचिव,
आदिवासी विकास विभाग, मुंबई (अपील क्र. २४१४/२०११, २४२०/२०११)

**जन माहिती अधिकारी** तथा कक्ष अधिकारी,
आदिवासी विकास विभाग, मंत्रालय, मुंबई
(अपील क्र. २४१४/२०११, २४२०/२०११)

**अपिलीय प्राधिकारी** तथा उपसचिव,
सामाजिक न्याय व विशेष सहाय्य विभाग,
म.शा.मंत्रालय, मुंबई (अपील क्र. २४२०/२०११)

**जन माहिती अधिकारी** तथा कक्ष अधिकारी,
सामाजिक न्याय व विशेष सहाय्यक विभाग,
म.शा. मंत्रालय, मुंबई (अपील क्र. २४२०/२०११)

**अपिलीय प्राधिकारी** तथा उपसचिव,
सामाजिक न्याय व विशेष सहाय्य विभाग,
म.शा.मंत्रालय, मुंबई (अपील क्र. २१२४/२०११, २४२०/२०११, २५२३/२०११, २५२४/२०११)

**जन माहिती अधिकारी** तथा अवर सचिव,
सामाजिक न्याय व विशेष सहाय्य विभाग,
म.शा.मंत्रालय, मुंबई (अपील क्र. २१२४/२०११)

| | | |
|---|---|---|
| १ | अपील क्रमांक | २४९६/२०१०, २६६४/२०१०, ३०९३/२०१०, ३०९४/२०१०, ३०९५/२०१०, २१२४/२०११, २१२५/२०११, २१२६/२०११, २४१३/२०११, २४१४/२०११, २४२०/२०११, २५२३/२०११, २५२४/२०११ |
| २ | माहिती - मागणीच्या मूळ अर्जाची (जोडपत्र-अ) छायाप्रत सोबत जोडली आहे. | |

# <u>विवेचन</u>

महादेव कोळी व तत्सम जमातीची ऐतिहासिक संदर्भ, पुरावे यासह माहिती, राज्य शासनाच्या आदिवासी विकास विभागाच्या निर्मितीपासून अनुसूचित जमातीच्या दाखल्यासंदर्भात काढण्यात आलेली परिपत्रके व महत्त्वाचे न्यायालयीन निकाल, त्या बाबतची कागदपत्रे, संबंधित नियमावलीविषयीचे निकष, अनुसूचित जमातीची दिलेली प्रमाणपत्रे, सन १९५० पासूनची या संदर्भातील शासकीय परिपत्रके, शासन निर्णय इ. बाबतची माहिती न मिळाल्याच्या कारणावरुन अपीलकर्त्या सौ. मोहिनी मनोहर कोळी यानी राज्य माहिती आयोगाकडे एकूण १३ अपिले केली आहेत. आदिवासी संशोधन व प्रशिक्षण संस्था शासनाचा गृहविभाग, सामाजिक न्याय व विशेष सहाय्य विभाग इ. विविध विभागांकडे/ सार्वजनिक प्राधिकरणांकडे त्यानी अशा स्वरुपाचे माहिती मागणी अर्ज केले होते. संबंधित जन माहिती अधिकारी यानी दिलेली माहिती व अपिलीय प्राधिकारी यानी दिलेला निर्णय यामुळे समाधान न झाल्याच्या कारणावरुन त्यानी राज्य माहिती आयोगाकडे उपरोक्त अपिले केली आहेत.

सादर करण्यात आलेली कागदपत्रे विचारात घेता अपीलकर्त्यांनी अत्यंत विस्तृत प्रदीर्घ कालखंडातील व सरसकट स्वरुपातील सार्वजनिक प्राधिकरणाची साधनसामग्री माहिती देण्यासाठी प्रमाणाबाहेर वळवावी लागत असल्यास माहितीचा अधिकार अधिनियम, २००५ च्या कलम ७ (९) अन्वये ती नाकारता येऊ शकते. तसेच माहितीचा अधिकार अधिनियम, २००५ च्या कलम (२) मध्ये नमुद केलेल्या 'माहिती'च्या व्याख्येत न येणारे ऐतिहासिक पुरावे मागण्यासारखे मुद्देही अपीलकर्त्यांनी मांडले आहेत. 'गृहमंत्र्यांना समक्ष सादर केलेल्या निवेदनातील निर्णय, तसेच गृहविभागाकडे पाठविलेल्या स्वेच्छाधिकार तपासणी अर्जाबाबतची कार्यवाही (अपील क्र. २४१३/२०११) या सारखा एखादा मुद्दा वगळता बहुसंख्य अर्जांमध्ये त्यानी केलेली विचारणा ही अतिव्याप्त स्वरुपाची, तसेच काही बाबींमध्ये कायदेशीर अन्वयार्थ, खुलासा, स्पष्टीकरण याची मागणी करणारी आहे.

माहितीचा अधिकार अधिनियम, २००५ चा कलम ७ (९) मध्ये वर उल्लेख केल्याप्रमाणे तरतूद असतानाही जन माहिती अधिकारी यानी माहिती नाकारलेली नाही. सर्वोच्च न्यायालयाने दि. ९/८/२०११ रोजी अपील क्र.६४५४/२०११ प्रकरणी दिलेला निकाल या संदर्भात मार्गदर्शक आहे.

'Indiscriminate and impractical demands or directions under RTI Act for disclosure of all and sundry information (unrelated to transparency and accountability in the functioning of public authorities and eradication of corruption) would be counter-productive as it will adversely affect the efficiency of the administration and result in the executive getting bogged down with the non-productive work of collecting and furnishing information'.

'The Act should not be allowed to be misused or abused, to become a tool to obstruct the national development and integration, or to destroy the peace, tranquility and harmony among its citizens. Nor should it be converted into a tool of oppression or intimidation of honest officials striving to do their duty. The nation does not want a scenario where 75% of the staff of public authorities spends 75 % of their time in collecting and furnishing information to applicants instead of discharging their regular duties. The threat of penalties under the RTI Act and the pressure of the authorities under the RTI Act should not lead to employees of the public authorities prioritizing 'information furnishing', at the cost of their normal and regular duties'.

असा मार्गदर्शक अभिप्राय सर्वोच्च न्यायालयाने सदर निर्णयात नोंदविला आहे. अशा प्रकारचे अर्ज व अपिले या संदर्भात त्याची जाणीव उभय बाजूंनी ठेवणे आवश्यक आहे. प्रस्तुत अपिलांमधील अपीलकर्त्यांची विशिष्ट संदर्भातील व व्यापक स्वरुपाची सातत्याने असलेली माहितीची मागणी लक्षात घेता त्याना हव्या असलेल्या सर्व संबंधित अभिलेखांचे अवलोकन माहितीचा अधिकार अधिनियम, २००५ च्या तरतुदीनुसार सर्व जन माहिती अधिकारी यानी त्याना करु द्यावे, आवश्यक असलेल्या कागदपत्रांचा नेमका तपशील अपीलकर्त्यांनी नोंदवावा, व त्यानुसार लेखी मागणी त्यानी केल्यास योग्य

ते शुल्क आकारुन त्या कागदपत्रांच्या प्रती जन माहिती अधिकारी यानी त्याना पुरवाव्या, अशी कार्यपध्दती अवलंबिणे योग्य ठरेल.

आयोगाचे आदेश पुढीलप्रमाणे :

**<u>आदेश</u>**

अपिले निकाली काढण्यात येत आहेत.

**(विजय कुवळेकर)**
**राज्य माहिती आयुक्त,**
**पुणे खंडपीठ**

**पुणे**
**दि :- २८.९.२०११**

**राज्य माहिती आयुक्त, राज्य माहिती आयोग, महाराष्ट्र राज्य, पुणे खंडपीठ यांच्यासमोर**
**माहितीचा अधिकार अधिनियम,२००५ च्या कलम १९ (३) अन्वये दाखल झालेले अपील**

राज्य माहिती आयोग, पुणे खंडपीठ,
नवीन प्रशासकीय इमारत, चौथा मजला,
कौन्सिल हॉल समोर, पुणे ४११ ००१

श्री. वसंतराव भाऊसाहेब पाटील
शांती सदन, २३/६/४ क ई, हिम्मतबहादूर परिसर,
ताराबाई पार्क, कोल्हापूर ४१६००३ अपीलकर्ता

**विरुध्द**

**अपिलीय प्राधिकारी** तथा उपआयुक्त (I),
कोल्हापूर महानगरपालिका, कोल्हापूर
उत्तरवादी

**जन माहिती अधिकारी** तथा उपशहर अभियंता,
वि.का.क्र.४, कोल्हापूर महानगरपालिका, कोल्हापूर

| | | |
|---|---|---|
| १ | अपील क्रमांक | २०१२/२०१०/कोल्हापूर |
| २ | सुनावणीची तारीख | दि. १३/९/२०११ |

**३. उपस्थित**

**अपीलकर्ता** श्री. वसंतराव भाऊसाहेब पाटील
शांती सदन, २३/६/४ क ई, हिम्मतबहादूर परिसर,
ताराबाई पार्क, कोल्हापूर

**जन माहिती अधिकारी** तथा उपशहर अभियंता,
वि.का.क्र.४, कोल्हापूर महानगरपालिका, कोल्हापूर
श्री. सरनोबत नेत्रदिप शंकरराव

| | |
|---|---|
| ४ | माहिती - मागणीच्या मूळ अर्जाची (जोडपत्र-अ) छायाप्रत सोबत जोडली आहे. |

# विवेचन

सदर अपिलाची दि. २३/८/२०११ ची सुनावणी काही अपरिहार्य कारणामुळे रद्द करण्यात आली, व सुनावणी दि. १३/९/२०११ रोजी घेण्यात आली.

आयोगापुढील सुनावणीत अपीलकर्ता, जन माहिती अधिकारी व अपिलीय प्राधिकारी यांनी पुढीलप्रमाणे निवेदन केले :

अपीलकर्ता - उपशहर अभियंता, कोल्हापूर महानगरपालिका, कोल्हापूर यानी अधिकार नसताना बांधकाम आराखडयाला दिलेल्या मंजुरीबाबत व त्या अनुषंगाने आमच्याबाबत करुन दिलेल्या खोटया हमीपत्राच्या अनुषंगाने १२ मुद्दयांची माहिती मागितली होती. परंतु माहितीचा बोध होत नाही, माहिती उपलब्ध होत नाही, अशी उत्तरे जन माहिती अधिकारी यानी व तीही ३० दिवसांच्या मुदतीनंतर दिली.

जन माहिती अधिकारी - अपीलकर्त्यांच्या दि. १०/३/२०१० च्या अर्जाला दि. ७/४/२०१० च्या पत्रान्वये उत्तर दिले. त्यानी अनेक विधाने केली असून नेमकी कोणती माहिती हवी आहे, हे स्पष्ट होत नाही. मुद्देनिहाय नमूद करुन तसे पत्रात कळविले. संचिका पाहून हव्या असलेल्या कागदपत्रांची मागणी करावी, असेही त्याना कळविले. मिळकतीच्या वादातून अशाच स्वरुपाची ८ अपिले त्यानी आतापर्यंत केली आहेत. संबंधित प्रकरणी न्यायालयात दावा दाखल आहे.

उभय बाजूंची निवेदने व सादर करण्यात आलेली कागदपत्रे विचारात घेता अपीलकर्त्यांनी अनेक मुद्दयांमध्ये स्वतःचे अभिप्राय नमूद केले आहेत. (उदा. मुद्दा क्र. १, २, ६, ७, ९, १२), तर काही मुद्दयांमध्ये खुलासा अथवा कायदेशीरपणाबाबतचे स्पष्टीकरण याची मागणी केली आहे. सदर बाब माहितीचा अधिकार अधिनियम, २००५ अंतर्गत येत नाही. आवश्यक असल्यास अपीलकर्ता अभिलेख अवलोकन करुन हव्या असलेल्या कागदपत्रांच्या प्रती योग्य ते शुल्क भरुन प्राप्त करुन घेऊ शकतात.

जन माहिती अधिकारी व अपिलीय प्राधिकारी यांनी माहितीबाबत केलेली कार्यवाही योग्य आहे. सार्वजनिक हिताचा कोणताही संदर्भ नसलेल्या एकाच विषयाच्या संदर्भात माहितीचा अधिकार अधिनियम, २००५ अंतर्गत सातत्याने अर्ज व अपिले करुन सर्व यंत्रणांचा वेळ व परिश्रम याचा अपव्यय न करण्याची समज अपीलकर्त्यास देण्यात येत आहे.

आयोगाचे आदेश पुढीलप्रमाणे :

**<u>आदेश</u>**

अपील अमान्य करण्यात येत आहे.

**(विजय कुवळेकर)**
**राज्य माहिती आयुक्त,**
**पुणे खंडपीठ**

**पुणे**
**दि :- २३.९.२०११**

**राज्य माहिती आयुक्त, राज्य माहिती आयोग, महाराष्ट्र राज्य, पुणे खंडपीठ यांच्यासमोर**
**माहितीचा अधिकार अधिनियम,२००५ च्या कलम १९ (३) अन्वये दाखल झालेले अपील**

राज्य माहिती आयोग, पुणे खंडपीठ,
नवीन प्रशासकीय इमारत, चौथा मजला,
कौन्सिल हॉल समोर, पुणे ४११ ००१

श्री. रावसाहेब जिनगोंडा पाटील
श्रीराम अपार्टमेंट, प्रभाकर महाराज मठाजवळ,
सम्राट चौक, बुधवार पेठ, सोलापूर माण — अपीलकर्ता

**विरुध्द**

**अपिलीय प्राधिकारी** तथा प्राचार्य,
शेठ गोविंदजी रावजी आयुर्वेद महाविद्यालय,
२१/अ/१३, बुधवार पेठ, सम्राट चौक, सोलापूर

उत्तरवादी

**जन माहिती अधिकारी** तथा
शेठ गोविंदजी रावजी आयुर्वेद महाविद्यालय,
२१/अ/१३, बुधवार पेठ, सम्राट चौक, सोलापूर

| | | |
|---|---|---|
| १ | अपील क्रमांक | ९५३/२००९/सोलापूर |
| २ | सुनावणीची तारीख | दि. २३/२/२०११ |

**३. उपस्थित**

**अपीलकर्ता -** श्री. रावसाहेब जिनगोंडा पाटील
श्रीराम अपार्टमेंट, प्रभाकर महाराज मठाजवळ,
सम्राट चौक, बुधवार पेठ, सोलापूर

**अपिलीय प्राधिकारी** तथा प्राचार्य
शेठ गोविंदजी रावजी आयुर्वेद महाविद्यालय,
२१/अ/१३, बुधवार पेठ, सम्राट चौक, सोलापूर यांचे वतीने
ॲड. श्री. र. रा. राळेरासकर

| | |
|---|---|
| ४ | माहिती - मागणीच्या मूळ अर्जाची (जोडपत्र-अ) छायाप्रत सोबत जोडली आहे. |

## विवेचन

प्रस्तुत अपिलाची सुनावणी दि. २८/१०/२०१० रोजी मुक्रर करण्यात आली होती. सदर सुनावणीस जन माहिती अधिकारी व अपिलीय प्राधिकारी अनुपस्थित होते. म्हणून पुन्हा दि. २३/२/२०११ रोजी सुनावणी घेण्यात आली.

आयोगापुढील सुनावणीत अपीलकर्ता, जन माहिती अधिकारी व अपिलीय प्राधिकारी यांचे प्रतिनिधी यांनी पुढीलप्रमाणे निवेदन केले:

अपीलकर्ता- शेठ गोविंदजी रावजी आयुर्वेद महाविद्यालय, सोलापूर या महाविद्यालयाला शासकीय अनुदान मिळते तसेच त्यानी जन माहिती अधिकारीही नेमले आहेत. परंतु महाविद्यालयाला माहितीचा अधिकार अधिनियम, २००५ लागू नाही, असे उत्तर संस्थेतर्फे दिले जाते. सन २००९ पासून मी माहिती मिळविण्याचा प्रयत्न करीत असून हा माझ्या जीवन-मरणाचा प्रश्न असल्यामुळे माहिती मिळणे आवश्यक आहे.

जन माहिती अधिकारी व अपिलीय प्राधिकारी यांचे प्रतिनिधी- हे महाविद्यालय शेठ सखाराम नेमचंद जैन औषधालय व रुग्णालय ट्रस्टतर्फे चालविले जाते. त्यावर शासनाचे नियंत्रण नाही. विश्वस्त संस्था असल्यामुळे मुंबई उच्च न्यायालयाने रिट पिटीशन क्र. ५६६६/२००७ मध्ये दि. १३/१/२००९ रोजी दिलेल्या निर्णयानुसार विश्वस्त संस्थेला माहितीचा अधिकार अधिनियम, २००५ लागू होत नाही.

उभय बाजूंची निवेदने व सादर करण्यात आलेली कागदपत्रे विचारात घेता शेठ गोविंदजी रावजी आयुर्वेद महाविद्यालय, सोलापूर हे महाविद्यालय विश्वस्त संस्थेमार्फत चालविले जात असले तरी त्याला शासनाचे वेतन-अनुदान आहे. म्हणून जन माहिती अधिकाऱ्यांच्या प्रतिनिधींनी घेतलेला उच्च न्यायालयाच्या निकालाचा आधार रास्त ठरत नाही. त्यामुळे महाविद्यालय माहितीचा अधिकार अधिनियम, २००५ कलम २ नुसार 'सार्वजनिक प्राधिकरण' ठरते व त्याने अपीलकर्त्याला माहिती देणे आवश्यक आहे. एका आठवडयात माहिती द्यावी, असे मौखिक आदेश आयोगाने सुनावणीच्या वेळी दिले. परंतु महाविद्यालयाने त्यानुसार कार्यवाही न केल्याची तक्रार अपीलकर्ता यानी दि. २/४/२०१० च्या पत्रान्वये आयोगाकडे केली. त्याअनुषंगाने आयोगाने केलेल्या विचारणेनंतर जन माहिती अधिकारी यानी दि. २१/४/२०११ च्या पत्रान्वये अपीलकर्त्यास छायांकित प्रतीसाठी रु ११००/- शुल्क कळविल्याची प्रत

दि. ७/९/२०१० रोजी आयोगाला सादर केली. महाविद्यालयाची ही कृती जबाबदारपणाची नाही. आयोगाच्या आदेशानुसार एका आठवडयात माहिती न देता दोन महिने विलंबाने अपीलकर्त्यास शुल्क कळविणे मान्य करता येणार नाही. महाविद्यालयाने ही माहिती निःशुल्क व त्वरित दिली पाहिजे.

आयोगाचे आदेश पुढीलप्रमाणे :

## आदेश

१. अपील मान्य करण्यात येत आहे.

२. आयोगाच्या मौखिक आदेशानुसार विहित मुदतीत कार्यवाही न करण्याबाबतचा खुलासा जन माहिती अधिकारी यानी दि. ५/१०/२०११ पर्यंत आयोगाला सादर करावा.

३. जन माहिती अधिकारी यानी अपीलकर्त्यास माहिती निःशुल्क पुरवावी. दरम्यानच्या कालावधीत अपीलकर्त्यांनी शुल्क भरले असल्यास ते परत करुन अनुपालन अहवाल जन माहिती अधिकारी यानी दि. ५/१०/२०११ पर्यंत आयोगाला सादर करावा. वरील प्रमाणे कार्यवाही न झाल्यास जन माहिती अधिकारी हे पुढील कारवाईस पात्र ठरतील.

**(विजय कुवळेकर)**
**राज्य माहिती आयुक्त,**
**पुणे खंडपीठ**

**पुणे**
**दि :- २३.९.२०११**

**राज्य माहिती आयुक्त, राज्य माहिती आयोग, महाराष्ट्र राज्य, पुणे खंडपीठ यांच्यासमोर**
**माहितीचा अधिकार अधिनियम,२००५ च्या कलम १९ (३) अन्वये दाखल झालेले अपील**

राज्य माहिती आयोग, पुणे खंडपीठ,
नवीन प्रशासकीय इमारत, चौथा मजला,
कौन्सिल हॉल समोर, पुणे ४११ ००१

श्री. भीमसेन रामचंद्र खेडकर
अहिल्या, ४३/९०, नवसहयाद्री,
कर्वेनगर, पुणे ४११ ०५२ अपीलकर्ता

**विरुध्द**

**अपिलीय प्राधिकारी** तथा सहाय्यक अभियंता (विद्युत),
पुणे महानगरपालिका, शिवाजीनगर, पुणे ४११ ००५
उत्तरवादी

**जन माहिती अधिकारी** तथा उप आयुक्त (तांत्रिक),
पुणे महानगरपालिका, शिवाजीनगर, पुणे ४११ ००५पुणे

| | | |
|---|---|---|
| १ | अपील क्रमांक | ६६७/२००९/पुणे |
| २ | सुनावणीची तारीख | दि. ९/२/२०११ |

**३. उपस्थित**

**अपीलकर्ता -** श्री. भीमसेन रामचंद्र खेडकर
अहिल्या, ४३/९०, नवसहयाद्री, कर्वेनगर, पुणे ४११ ०५२

**अपिलीय प्राधिकारी** तथा सहाय्यक अभियंता (विद्युत),
पुणे महानगरपालिका, शिवाजीनगर, पुणे श्री. विजय दहिभाते

**तत्कालीन जन माहिती अधिकारी** तथा उप आयुक्त (तांत्रिक),
पुणे महानगरपालिका, शिवाजीनगर, पुणे श्रीमती मनिषा रोकटकर

| | |
|---|---|
| ४ | माहिती - मागणीच्या मूळ अर्जाची (जोडपत्र-अ) छायाप्रत सोबत जोडली आहे. |

## विवेचन

आयोगापुढील सुनावणीत अपीलकर्ता, जन माहिती अधिकारी व अपिलीय प्राधिकारी यांनी पुढीलप्रमाणे निवेदन केले :

अपीलकर्ता - रस्ता रुंदीकरणात विजेचे खांब हलविण्याचे काम, विजेच्या ओव्हरहेड केबल्स ऐवजी भूमिगत केबल्स टाकण्यावर पुणे महानगरपालिकेने केलेला खर्च व महाराष्ट्र राज्य विद्युत मंडळाकडून त्याची परतफेड याबाबतची माहिती मागितली होती. ती अर्धवट मिळाली. वास्तविक विजेचे खांब हलविणे, केबल टाकणे हे काम तत्कालीन महाराष्ट्र राज्य विद्युत मंडळाचे व सद्यस्थितीत महाराष्ट्र राज्य विज वितरण कंपनीचे आहे. महानगरपालिका आयुक्त व वीज मंडळाचे अधिकारी यांच्यामध्ये बैठक होऊन हे काम महानगरपालिकेने करावे व वीज मंडळाने खर्चाची प्रतिपूर्ती नंतर करावी, असे ठरले होते. त्यानुसार सन २००७ ते फेब्रुवारी २००९ या कालावधीत झालेल्या या कामाबाबतची सुमारे ८२ कोटी रुपये एवढी रक्कम पुणे महानगरपालिकेला महाराष्ट्र राज्य वीज वितरण कंपनीकडून परत मिळावयाची आहे. म्हणून हा सार्वजनिक कामाबाबतचा व सार्वजनिक निधीच्या वापराबाबतचा महत्त्वाचा विषय असून त्याबाबतची नेमकी व पूर्ण माहिती मिळाली पाहिजे. हा सर्व तपशील गुंतागुंतीचा व सखोल शोध घेण्याचा आहे, याची मला कल्पना आहे. त्यामुळे शास्तीची माझी मागणी नाही.

जन माहिती अधिकारी - या एकाच विषयाच्या संदर्भात श्री. खेडकर यानी दोन अर्ज केले होते. वॉर्डनिहाय माहिती संकलित करुन देणे आवश्यक असल्यामुळे माहिती देण्यास विलंब लागेल, याची श्री. खेडकर याना कल्पना दिली होती.

अपिलीय प्राधिकारी -महानगरपालिकेच्या स्थायी समितीच्या निर्णयानंतर विजेचे खांब हलविण्याची व अंडर ग्राऊंड केबल टाकण्याची कामे करण्यात आली. त्यासाठी खर्च झालेल्या ८२ कोटी रुपये रकमेच्या प्रतिपूर्तीसाठी महाराष्ट्र राज्य वीज वितरण कंपनीकडे पाठपुरावा चालू आहे. ही कामे महाराष्ट्र राज्य वीज वितरण कंपनीने करावयाची असल्यामुळे आता महानगरपालिकेच्या नवीन अर्थसंकल्पात त्याची तरतूद करण्यात आलेली नाही.

अपीलकर्ता हे ज्येष्ठ नागरिक असून श्री. भीमसेन रामचंद्र खेडकर यानी सार्वजनिक हिताच्या दृष्टीने महत्त्वाचा विषय माहितीच्या अधिकाराद्वारे मांडला आहे. त्यांची ही कृती प्रशंसनीय आहे. सार्वजनिक निधीबाबतचा तपशील पारदर्शक असावा. महानगरपालिकेसारख्या स्थानिक स्वराज्य संस्थेचा निधी अन्य कोणत्याही खात्याकडे अडून राहू नये, म्हणून त्याबाबतचा तपशील स्पष्ट व्हावा, यासाठी श्री. खेडकर यांचा प्रयत्न असून शास्तीचा आग्रह नाही, हे त्यांचे निवेदन या संदर्भात लक्षणीय आहे. अपीलकर्त्यांनी मागितलेल्या माहितीबाबतचा सर्व तपशील १५ दिवसांत त्याना पुरवावा. आवश्यक असल्यास संबंधित अभिलेखांचे अवलोकन त्याना करु द्यावे व त्याना हव्या असलेल्या कागदपत्रांच्या प्रती निःशुल्क पुरवाव्या, असे मौखिक आदेश आयोगाने सुनावणीच्या वेळी दिले. त्यानुसार माहिती देण्यात आल्याचा अहवाल अपिलीय प्राधिकारी यानी दि. २४/२/२०११ च्या पत्रान्वये आयोगाला सादर केला.

आयोगाचे आदेश पुढीलप्रमाणे :

## आदेश

१. अपील निकाली काढण्यात येत आहे.

२. महाराष्ट्र राज्य वीज वितरण कंपनीने पुणे महानगरपालिकेला येणे असलेल्या रुपये ८२ कोटी खर्चाच्या प्रतिपूर्तीबाबतच्या कार्यवाहीचा अद्ययावत तपशील पुरविणारा अहवाल अपिलीय प्राधिकारी तथा सहाय्यक अभियंता (विद्युत) पुणे महानगरपालिका, शिवाजीनगर, पुणे यानी दि. १५/१०/२०११ पर्यंत आयोगास सादर करावा व त्याची प्रत अपीलकर्त्यास पुरवावी.

**(विजय कुवळेकर)**
**राज्य माहिती आयुक्त,**
**पुणे खंडपीठ**

**पुणे**
**दि :- २३.९.२०११**

**राज्य माहिती आयुक्त, राज्य माहिती आयोग, महाराष्ट्र राज्य, पुणे खंडपीठ यांच्यासमोर**
**माहितीचा अधिकार अधिनियम, २००५ च्या कलम १९ (३) अन्वये दाखल झालेले अपील**

राज्य माहिती आयोग, पुणे खंडपीठ,
नवीन प्रशासकीय इमारत, चौथा मजला,
कौन्सिल हॉल समोर, पुणे ४११ ००१

श्री.शिवाजी हनुमंत सुगरे
सलगर वस्ती, डोणगाव रोड, सोलापूर अपीलकर्ता

**विरुध्द**

**अपिलीय प्राधिकारी** तथा सहाय्यक धर्मादाय आयुक्त, सार्वजनिक न्यास नोंदणी कार्यालय, दिवाणजी कॉम्प्लेक्स, अंबाजोगाई रोड, लातूर विभाग, लातूर उत्तरवादी

**जन माहिती अधिकारी** तथा अधीक्षक, सार्वजनिक न्यास नोंदणी कार्यालय, दिवाणजी कॉम्प्लेक्स, अंबाजोगाई रोड, लातूर विभाग, लातूर

| | | |
|---|---|---|
| १ | अपील क्रमांक | १६३३ / २००९ / सोलापूर |
| २ | सुनावणीची तारीख | दि.३.९.२०११ |
| ४ | माहिती - मागणीच्या मूळ अर्जाची (जोडपत्र-अ) छायाप्रत सोबत जोडली आहे. | |

## विवेचन

सुनावणीच्या दिवशी उभय घटकांतील कोणीही उपस्थित नव्हते, यास्तव गुणावगुणावर निर्णय घेण्यात येत आहे.

तत्कालीन सहाय्यक धर्मादाय आयुक्त, सोलापूर श्री.य.श.बोराडे यांच्या विरूध्दच्या तक्रारी अर्जावर आपण सादर केलेले लेखी निवेदन, अनुषंगिक कागदपत्रे व धर्मादाय सहआयुक्त, लातूर यानी शासनाला सादर केलेल्या चौकशी अहवालाची नक्कल अशी कागदपत्रे मागितली होती. जन माहिती अधिकाऱ्यानी शुल्क कळविल्याचे पत्र मुदतीनंतर मिळाले, म्हणून माहिती नि:शुल्क देण्याची मागणी केली. चौकशी प्रकरणातील गोपनीय अहवाल असल्यामुळे देता येत नसल्याचे जन माहिती अधिकारी

यानी कळविले व अपिलीय प्राधिकारी यानीही ते मान्य केले. माहिती मिळाली नसल्यामुळे जन माहिती अधिकाऱ्याना शास्ती लावावी व जन माहिती अधिकारी व अपिलीय प्राधिकारी यानी संगनमताने सहेतुक माहिती नाकारल्यामुळे नुकसानभरपाई मिळावी, अशी मागणी अपीलकर्ता श्री.शिवाजी हणमंत सुगरे यानी लेखी निवेदनाद्वारे केली आहे.

संबंधित अहवाल चौकशी प्रकरणातील असून गोपनीय आहे. चौकशीच्या कार्यवाही दरम्यान संबंधित कागदपत्रे देता येणार नाहीत, असे लेखी निवेदन जन माहिती अधिकारी तथा अधीक्षक, सार्वजनिक न्यास नोंदणी कार्यालय, दिवाणजी कॉम्प्लेक्स, अंबाजोगाई रोड, लातूर विभाग, लातूर यानी सादर केले असून त्याच आधारे निर्णय दिला असल्याचे लेखी निवेदन अपिलीय प्राधिकारी तथा सहाय्यक धर्मादाय आयुक्त, सार्वजनिक न्यास नोंदणी कार्यालय, दिवाणजी कॉम्प्लेक्स, अंबाजोगाई रोड, लातूर विभाग, लातूर सौ.एस.ए.पडाळकर यानी सादर केले आहे.

संबंधित प्रकरणातील चौकशीची कार्यवाही चालू असल्यास त्याबाबतची कागदपत्रे अपीलकर्त्यास न देण्याचा जन माहिती अधिकारी व अपिलीय प्राधिकारी यांचा निर्णय योग्य आहे. मात्र संबंधित चौकशी प्रकरणातील कार्यवाही पूर्ण झाली असल्यास केवळ वरिष्ठ अधिकाऱ्यांना सादर केलेला गोपनीय अहवाल असल्याच्या कारणावरून माहिती नाकारता येणार नाही. अपिलीय प्राधिकारी तथा सहाय्यक धर्मादाय आयुक्त, सार्वजनिक न्यास नोंदणी कार्यालय, दिवाणजी कॉम्प्लेक्स, अंबाजोगाई रोड, लातूर विभाग, लातूर हे राज्य माहिती आयुक्त, औरंगाबाद खंडपीठ यांचे कार्यक्षेत्रात येत असल्याचे अपिलीय प्राधिकारी यानी दि.२.९.२०११ च्या लेखी निवेदनात म्हटले आहे. तथापि अपीलकर्ता ज्या खंडपीठाच्या कक्षेतील रहिवासी असेल त्या खंडपीठाकडे आयोगापुढील अपील वर्ग केले जाईल, असा निर्णय राज्य मुख्य माहिती आयुक्त, महाराष्ट्र राज्य, मुंबई यांच्या दि.२५ एप्रिल २०११ (क्र.२०११/प्र.क्र.०६/०१) च्या परिपत्रकान्वये जाहीर करण्यात आला आहे, याची जाणीव अपिलीय प्राधिकारी तथा सहाय्यक धर्मादाय आयुक्त, सार्वजनिक न्यास नोंदणी कार्यालय, दिवाणजी कॉम्प्लेक्स, अंबाजोगाई रोड, लातूर विभाग, लातूर सौ.एस.ए.पडाळकर याना देण्यात येत आहे.

आयोगाचे आदेश पुढीलप्रमाणे :

## **आदेश**

(१) अपील निकाली काढण्यात येत आहे.

(२) अपीलकर्त्यानी मागणी केलेल्या प्रकरणातील चौकशीची कार्यवाही पूर्ण झाली असल्यास जन माहिती अधिकारी तथा अधीक्षक, सार्वजनिक न्यास नोंदणी कार्यालय, दिवाणजी कॉम्प्लेक्स, अंबाजोगाई रोड, लातूर विभाग, लातूर यानी चौकशी अहवाल व अन्य कागदपत्रांच्या प्रती अपीलकर्त्यास निःशुल्क पुरवाव्यात व याबाबतचा अहवाल दि.८.१०.२०११ पर्यंत आयोगाला सादर करावा.

**(विजय कुवळेकर)**
**राज्य माहिती आयुक्त,**
**पुणे खंडपीठ**

**पुणे**
**दि :- २३.९.२०११**

**राज्य माहिती आयुक्त, राज्य माहिती आयोग, महाराष्ट्र राज्य, पुणे खंडपीठ यांच्यासमोर**
**<u>माहितीचा अधिकार अधिनियम, २००५ च्या कलम १९ (३) अन्वये दाखल झालेले अपील</u>**

राज्य माहिती आयोग, पुणे खंडपीठ,
नवीन प्रशासकीय इमारत, चौथा मजला,
कौन्सिल हॉल समोर, पुणे ४११ ००१

श्री.उत्तम दत्तात्रय पोतदार
मु.पो.ता.बार्शी, श्रीकृष्ण कृपा सदन, ७१३/१०ब,
फुले प्लॅट,उपळाई रोड, जि.सोलापूर अपीलकर्ता

**विरुध्द**

**अपिलीय प्राधिकारी** तथा अप्पर जिल्हाधिकारी,
जिल्हाधिकारी कार्यालय, उस्मानाबाद उत्तरवादी

**जन माहिती अधिकारी** तथा विशेष भूमी संपादन अधिकारी (ल.सि.का),
उस्मानाबाद,मु.परांडा, ता.परांडा, जि.उस्मानाबाद

| | | |
|---|---|---|
| १ | अपील क्रमांक | १८०५ / २००९ / सोलापूर |
| २ | सुनावणीची तारीख | दि.३.९.२०११ |
| **३.** | **उपस्थित**<br><br>**जन माहिती अधिकारी** तथा विशेष भूमी संपादन अधिकारी (ल.सि.का), उस्मानाबाद,मु.परांडा, ता.परांडा, जि.उस्मानाबाद श्री.ए.पी.जाधव | |
| ४ | माहिती - मागणीच्या मूळ अर्जाची (जोडपत्र-अ) छायाप्रत सोबत जोडली आहे. | |

## विवेचन

दि.२२.९.२००८ च्या अर्जानुसार मागणी केलेले प्रलंबित प्रवास भत्ते, पगारवाटप प्रमाणपत्राप्रमाणे मला मिळालेले आहेत. त्यामुळे माझी तक्रार राहिलेली नाही, असे अपीलकर्त्याचे दि.१.१२.२०१० चे लेखी निवेदन जन माहिती अधिकारी तथा विशेष भूमी संपादन अधिकारी (ल.सि.का), उस्मानाबाद, मु.परांडा, ता.परांडा, जि.उस्मानाबाद श्री.ए.पी.जाधव यानी सुनावणीच्या वेळी आयोगाला सादर केले. अपीलकर्त्याची मागणी माहितीचा अधिकार अधिनियम, २००५ अंतर्गत येत नसून त्याबाबतची प्रशासकीय कार्यवाहीही झालेली आहे. सबब आयोगाचे आदेश पुढीलप्रमाणे :

## आदेश

अपील निकाली काढण्यात येत आहे.

**(विजय कुवळेकर)**
**राज्य माहिती आयुक्त,**
**पुणे खंडपीठ**

**पुणे**
**दि :- २२.९.२०११**

**राज्य माहिती आयुक्त, राज्य माहिती आयोग, महाराष्ट्र राज्य, पुणे खंडपीठ यांच्यासमोर**
**माहितीचा अधिकार अधिनियम,२००५ च्या कलम १९ (३) अन्वये दाखल झालेले अपील**

राज्य माहिती आयोग, पुणे खंडपीठ,
नवीन प्रशासकीय इमारत, चौथा मजला,
कौन्सिल हॉल समोर, पुणे ४११ ००१

श्री. बसवराज शिवाप्पा पाटील
३०७, किसान नगर, अक्कलकोट रोड,
सोलापूर सुत मिल शेजारी, सोलापूर — अपीलकर्ता

**विरुध्द**

**अपिलीय प्राधिकारी** तथा अप्पर जिल्हाधिकारी,
जिल्हाधिकारी कार्यालय, सोलापूर

उत्तरवादी

**जन माहिती अधिकारी** तथा जिल्हा पुरवठा अधिकारी,
जिल्हाधिकारी कार्यालय, पुरवठा शाखा, सोलापूर

| | | |
|---|---|---|
| १ | अपील क्रमांक | २८४४/२०१०/सोलापूर |
| २ | सुनावणीची तारीख | दि. ३/९/२०११ |

**३. उपस्थित**

**अपिलीय प्राधिकारी** तथा अप्पर जिल्हाधिकारी,
जिल्हाधिकारी कार्यालय, सोलापूर यांचे प्रतिनिधी श्री. दत्तात्रय बाळकृष्ण क्षिरसागर

**जन माहिती अधिकारी** तथा जिल्हा पुरवठा अधिकारी,
जिल्हाधिकारी कार्यालय, पुरवठा शाखा, सोलापूर श्री. सोनकर

| | |
|---|---|
| ४ | माहिती - मागणीच्या मूळ अर्जाची (जोडपत्र-अ) छायाप्रत सोबत जोडली आहे. |

## विवेचन

प्रस्तुत अपिलाची सुनावणी दि.११/५/२०११ रोजी मुक्रर करण्यात आली होती. सदर सुनावणीस जन माहिती अधिकारी व अपिलीय प्राधिकारी अनुपस्थित होते. म्हणून पुन्हा दि. ३/९/२०११ रोजी सुनावणी घेण्यात आली त्यावेळी अपीलकर्ता अनुपस्थित होते.

जन माहिती अधिकारी यानी विहित मुदतीत उत्तर दिले नाही व अपिलीय प्राधिकाऱ्यांच्या आदेशानंतरही अपूर्ण व चुकीची माहिती दिली,अशी तक्रार अपीलकर्ता यानी राज्य माहिती आयोगाकडील अपील अर्जात केली आहे.

अपीलकर्त्यांच्या अर्जात माहिती कोणत्या कालावधीची पाहिजे याचा उल्लेख नव्हता. त्यामुळे समक्ष उपस्थित राहून स्पष्ट केल्यास त्यानुसार माहिती देण्यात येईल, असे कळविले. विविध रास्त भाव धान्य दुकानांच्या संदर्भात अपीलकर्ता वेळोवेळी माहिती मागतात, ती त्या त्या वेळी त्याना देण्यात आली आहे. कोणतीही माहिती नाकारलेली नाही. अपीलकर्त्यांनी कार्यालयात समक्ष उपस्थित राहून माहितीचे अवलोकन करावे व त्यांच्या मागणीनुसार माहिती जन माहिती अधिकारी यानी द्यावी, असे आदेश अपिलीय प्राधिकाऱ्यांनीही दिले. त्यानंतर कार्यालयात हजर राहून हवी असलेली माहिती त्यानी प्राप्त करुन घेतली, असे प्रतिपादन जन माहिती अधिकारी तथा जिल्हा पुरवठा अधिकारी, जिल्हाधिकारी कार्यालय, पुरवठा शाखा, सोलापूर श्री. सोनकर यानी पूरक कागदपत्रांसह केले.

उभय बाजूंची निवेदने व सादर करण्यात आलेली कागदपत्रे विचारात घेता जन माहिती अधिकारी व अपिलीय प्राधिकारी यांनी माहितीबाबत केलेली कार्यवाही योग्य आहे. अपीलकर्त्यांना माहिती देण्यात आली आहे.

आयोगाचे आदेश पुढीलप्रमाणे :

## आदेश

अपील अमान्य करण्यात येत आहे.

**(विजय कुवळेकर)**
**राज्य माहिती आयुक्त,**
**पुणे खंडपीठ**

**पुणे**
**दि :- २३.९.२०११**

**राज्य माहिती आयुक्त, राज्य माहिती आयोग, महाराष्ट्र राज्य, पुणे खंडपीठ यांच्यासमोर**
**<u>माहितीचा अधिकार अधिनियम,२००५ च्या कलम १९ (३) अन्वये दाखल झालेले अपील</u>**

राज्य माहिती आयोग, पुणे खंडपीठ,
नवीन प्रशासकीय इमारत, चौथा मजला,
कौन्सिल हॉल समोर, पुणे ४११ ००१

श्री. सुरेश भाऊ लोकरे
मु. मोरवंची, पो. शिरापूर, ता.मोहोळ,
जि. सोलापूर अपीलकर्ता

**विरुध्द**

**अपिलीय प्राधिकारी** तथा विस्तार अधिकारी (पं),
पंचायत समिती मोहोळ, ता. मोहोळ, जि. सोलापूर

उत्तरवादी

**जन माहिती अधिकारी** तथा ग्रामसेवक,
ग्रामपंचायत कार्यालय, मोरवंची, पो. शिवापूर,
ता. मोहोळ, जि. सोलापूर

| | | |
|---|---|---|
| १ | अपील क्रमांक | २९३१/२०१०/सोलापूर |
| २ | सुनावणीची तारीख | दि. ३/९/२०११ |
| **३.** | **उपस्थित**<br><br>**जन माहिती अधिकारी** तथा ग्रामसेवक,<br>ग्रामपंचायत कार्यालय, मोरवंची, पो. शिवापूर,<br>ता. मोहोळ, जि. सोलापूर श्रीमती राणी चंद्रहार चव्हाण | |
| ४ | माहिती - मागणीच्या मूळ अर्जाची (जोडपत्र-अ) छायाप्रत सोबत जोडली आहे. | |

## विवेचन

अपिलाची सुनावणी दि.१२/५/२०११ रोजी मुक्रर करण्यात आली होती. अपरिहार्य कारणामुळे सदर सुनावणी रद्द करण्यात आली असून पुन्हा दि. ३/९/२०११ रोजी सुनावणी घेण्यात आली.

मौजे मोरवंची, पो. शिवापूर, ता. मोहोळ, जि. सोलापूर या ग्रामपंचायतीच्या कक्षेत १९९० ते २०१० पर्यंत शासकीय योजनेंतर्गत केलेली कामे , याचा कागदपत्रांसह तपशील इ. माहिती अपीलकर्ता श्री. सुरेश भाऊ लोकरे यानी मागितली होती. मागणी केलेली सर्व माहिती मिळाली त्यामुळे आता माझी काहीही तक्रार नाही असे दि. २५/८/२०११ चे लेखी निवेदन अपीलकर्त्यांनी सुनावणीच्या वेळी आयोगाला सादर केले. त्याची प्रत जन माहिती अधिकारी यानी सुनावणीच्या वेळी सादर केली.

अपीलकर्त्यांनी २० वर्षांच्या काळातील माहिती विस्तृत व सरसकट स्वरुपात मागितली आहे. माहितीचा अधिकार अधिनियम, २००५ च्या कलम (७) (९) अन्वये अशा स्वरुपाची माहिती नाकारता येते. परंतु तसे न करता जन माहिती अधिकारी तथा ग्रामसेवक, ग्रामपंचायत कार्यालय, मोरवंची, पो. शिवापूर,ता. मोहोळ, जि. सोलापूर श्रीमती राणी चंद्रहार चव्हाण यानी अपीलकर्त्यांना ग्रामपंचायत कार्यालयात बोलावून, माहिती बाबत विचारणा करुन, कागदपत्रे अवलोकनासाठी उपलब्ध करुन देऊन हवी असलेली माहिती पुरविली, हे उल्लेखनीय आहे.

आयोगाचे आदेश पुढीलप्रमाणे :

## आदेश

अपील निकाली काढण्यात येत आहे.

**(विजय कुवळेकर)**
**राज्य माहिती आयुक्त,**
**पुणे खंडपीठ**

**पुणे**
**दि :- २३.९.२०११**

**राज्य माहिती आयुक्त, राज्य माहिती आयोग, महाराष्ट्र राज्य, पुणे खंडपीठ यांच्यासमोर**
**माहितीचा अधिकार अधिनियम,२००५ च्या कलम १९ (३) अन्वये दाखल झालेले अपील**

राज्य माहिती आयोग, पुणे खंडपीठ,
नवीन प्रशासकीय इमारत, चौथा मजला,
कौन्सिल हॉल समोर, पुणे ४११ ००१

श्री. म. सलीम नबीलाल नदाफ
१७१, गुरुवार पेठ, सोलापूर अपीलकर्ता

**विरुध्द**

**अपिलीय प्राधिकारी** तथा व्यवस्थापकीय संचालक,
वसंतराव नाईक वि. जा. भ. ज. विकास महामंडळ, मुंबई
अंधेरी, विलेपार्ले

उत्तरवादी

**जन माहिती अधिकारी** तथा जिल्हा व्यवस्थापक,
वसंतराव नाईक विमुक्त जाती व भटक्या जमाती विकास महामंडळ,
महसूल कर्मचारी पतसंस्था इमारत, जिल्हाधिकारी कार्यालय आवार,
सोलापूर

| | | |
|---|---|---|
| १ | अपील क्रमांक | १४३६/सोलापूर |
| २ | सुनावणीची तारीख | दि. ३/९/२०११ |
| **३.** | **उपस्थित**<br><br>**जन माहिती अधिकारी** तथा जिल्हा व्यवस्थापक,<br>वसंतराव नाईक विमुक्त जाती व भटक्या जमाती विकास महामंडळ,<br>महसूल कर्मचारी पतसंस्था इमारत, जिल्हाधिकारी कार्यालय आवार,<br>सोलापूर श्री. पोपट महादेव झोंबाडे | |
| ४ | माहिती - मागणीच्या मूळ अर्जाची (जोडपत्र-अ) छायाप्रत सोबत जोडली आहे. | |

# <u>विवेचन</u>

राज्य माहिती आयोगाने दि. १६/४/२००९ रोजी आयोजित केलेल्या 'विशेष अपील निर्गत कार्यक्रमा'त या अपिलाचा समावेश होता. त्यावेळी जन माहिती अधिकारी तथा व अपिलीय प्राधिकारी अनुपस्थित असल्यामुळे अपिलाची सुनावणी दि.२३/२/२०११ रोजी मुक्रर करण्यात आली होती. अपरिहार्य कारणामुळे सदर सुनावणी रद्द करण्यात आली व पुन्हा दि. ३/९/२०११ रोजी सुनावणी घेण्यात आली.

अपीलकर्ता श्री. पोपट महादेव झोंबाडे याचा माहिती-मागणीचा मूळ अर्ज आमच्या कार्यालयाला प्राप्त झालेला नव्हता. आयोगाकडील सुनावणीच्या सुचनेमुळे अपीलकर्त्याकडील मूळ अर्जाची प्रत तत्कालीन  जिल्हा व्यवस्थापक, जिल्हाधिकारी कार्यालय आवार, सोलापूर श्री. डी. जे. जाधव यानी मागवून घेतली व माहिती तयार करुन अपीलकर्त्यास दिली. 'दिलेली माहिती बरोबर असून माझे समाधान झाले आहे', असे अपीलकर्त्यांनी लेखी दिले, असे विद्यमान जन माहिती अधिकारी तथा जिल्हा व्यवस्थापक, जिल्हाधिकारी कार्यालय आवार, सोलापूर श्री. पोपट महादेव झोंबाडे यानी अपीलकर्त्यांच्या संबंधित पत्राच्या प्रतीसह नमूद केले.

आयोगाचे आदेश पुढीलप्रमाणे :

## <u>आदेश</u>

अपील निकाली काढण्यात येत आहे.

**(विजय कुवळेकर)**
**राज्य माहिती आयुक्त,**
**पुणे खंडपीठ**

**पुणे**
**दि :- २३.९.२०११**

**राज्य माहिती आयुक्त, राज्य माहिती आयोग, महाराष्ट्र राज्य, पुणे खंडपीठ यांच्यासमोर**
**माहितीचा अधिकार अधिनियम,२००५ च्या कलम १९ (३) अन्वये दाखल झालेले अपील**

राज्य माहिती आयोग, पुणे खंडपीठ,
नवीन प्रशासकीय इमारत, चौथा मजला,
कौन्सिल हॉल समोर, पुणे ४११ ००१

श्री. जावेद मोहीन शेख
व्दारा शशीकांत शामराव सरवदे,
नाईकवाडी प्लॉट नं. ५ अ, सावली, बार्शी, अपीलकर्ता
ता. बार्शी, जि. सोलापूर

**विरुध्द**

**अपिलीय प्राधिकारी** तथा उपमुख्य कार्यकारी अधिकारी (पं),
जिल्हा परिषद, उस्मानाबाद

उत्तरवादी

**जन माहिती अधिकारी** तथा गटविकास अधिकारी,
पंचायत समिती, कळंब, जि. उस्मानाबाद

| | | |
|---|---|---|
| १ | अपील क्रमांक | २७६५/२०१०/सोलापूर |
| २ | सुनावणीची तारीख | दि. ३/९/२०११ |
| **३.** | **उपस्थित**<br>**जन माहिती अधिकारी** तथा गटविकास अधिकारी,<br>पंचायत समिती, कळंब, जि. उस्मानाबाद प्रमोद हनुमंत काळे | |
| ४ | माहिती - मागणीच्या मूळ अर्जाची (जोडपत्र-अ) छायाप्रत सोबत जोडली आहे. | |

## विवेचन

अपिलाची सुनावणी दि.१०/५/२०११ रोजी मुक्रर करण्यात आली होती. सदर सुनावणीस जन माहिती अधिकारी व अपिलीय प्राधिकारी अनुपस्थित होते. म्हणून पुन्हा दि. ३/९/२०११ रोजी सुनावणी घेण्यात आली त्यावेळी अपीलकर्ता व अपिलीय प्राधिकारी अनुपस्थित होते.

अपीलकर्ता श्री. जावेद मोहीन शेख यांच्या माहिती-मागणी अर्जावर तत्कालीन अपिलीय प्राधिकारी यानी दिलेल्या आदेशानुसार देऊ केलेली सन १९८५ ते २००५ या कालावधीतील विस्तृत माहिती स्वीकारण्यास अपीलकर्ते टाळाटाळ करत असून माहिती स्वीकारण्याऐवजी सदर प्रकरणी ते अवांतर मागणी करतात. त्यामुळे रजिस्टर टपालाने माहिती पाठविली. तत्कालीन जन माहिती अधिकारी तथा गटविकास अधिकारी, पंचायत समिती, कळंब, जि. उस्मानाबाद श्रीमती सुभद्रा शेरखाने सध्या निलंबित आहेत, असे प्रतिपादन विद्यमान जन माहिती अधिकारी तथा गटविकास अधिकारी, पंचायत समिती, कळंब, जि. उस्मानाबाद श्री. प्रमोद हनुमंत काळे यानी पूरक कागदपत्रांसह केले. दि. १५/४/२०११ च्या अर्जान्वये अपीलकर्त्यांनी मागितलेली माहिती तत्कालीन जन माहिती अधिकारी यानी दि. ११/५/२०११ रोजी रजिस्टर टपालाने पाठविल्याचे विद्यमान जन माहिती अधिकारी यानी दि. २/९/२०११ च्या लेखी निवेदनात नमूद केले आहे. 'अवांतर मागणी' म्हणजे नेमके काय ते त्यांनी स्पष्ट करणे व त्या अनुषंगाने आवश्यक तर पुढील कायदेशीर कार्यवाही करणे उचित ठरले असते.

वरील बाबी लक्षात घेता आयोगाचे आदेश पुढीलप्रमाणे :

**आदेश**

अपील निकाली काढण्यात येत आहे.

**(विजय कुवळेकर)**
**राज्य माहिती आयुक्त,**
**पुणे खंडपीठ**

**पुणे**
**दि :- २३.९.२०११**

**राज्य माहिती आयुक्त, राज्य माहिती आयोग, महाराष्ट्र राज्य, पुणे खंडपीठ यांच्यासमोर**
**माहितीचा अधिकार अधिनियम,२००५ च्या कलम १९ (३) अन्वये दाखल झालेले अपील**

राज्य माहिती आयोग, पुणे खंडपीठ,
नवीन प्रशासकीय इमारत, चौथा मजला,
कौन्सिल हॉल समोर, पुणे ४११ ००१

श्री. आदिनाथ भगवान जाधव
जयविजय निवास, नाईकवाडी प्लॉट परंडा रोड,
बार्शी, जि. सोलापूर — अपीलकर्ता

**विरुध्द**

**अपिलीय प्राधिकारी** तथा अध्यक्ष,
श्री सावतामाळी शिक्षण प्रसारक मंडळ, टेंभुर्णी,
ता. माढा, जि. सोलापूर

उत्तरवादी

**जन माहिती अधिकारी** तथा मुख्याध्यापक,
कै विठ्ठलरावजी शिंदे विद्यालय, टेंभुर्णी, ता. माढा, जि. सोलापूर

| | | |
|---|---|---|
| १ | अपील क्रमांक | १२१४/सोलापूर |
| २ | सुनावणीची तारीख | दि. ३/९/२०११ |
| ४ | माहिती - मागणीच्या मूळ अर्जाची (जोडपत्र-अ) छायाप्रत सोबत जोडली आहे. | |

## विवेचन

राज्य माहिती आयोगाने दि. २७/२/२००९ रोजी आयोजित केलेल्या ‘विशेष अपील निर्गत कार्यक्रमा’त या अपिलाचा समावेश होता. त्यावेळी जन माहिती अधिकारी व अपिलीय प्राधिकारी गैरहजर असल्यामुळे अपिलाची सुनावणी दि. २३/२/२०११ रोजी घेण्यात आली.

प्रस्तुत अपिलाची सुनावणी दि. २३/२/२०११ रोजी मुक्रर करण्यात आली होती. सदर सुनावणीस अपीलकर्ता, जन माहिती अधिकारी व अपिलीय प्राधिकारी अनुपस्थित होते. पुन्हा दि. ३/९/२०११ रोजी

सुनावणी घेण्यात आली. त्या सुनावणीसही अपीलकर्ता, जन माहिती अधिकारी व अपिलीय प्राधिकारी अनुपस्थित होते.

कै विठ्ठलरावजी शिंदे विद्यालय, टेंभुर्णी, ता. माढा, जि. सोलापूर या शाळेतील कर्मचा-यांची सन २००३ ते २००७ या कालावधीमधील वेतनपत्रकाची माहिती मागितली होती. परंतु जन माहिती अधिकारी व अपिलीय प्राधिकारी यांनी माहिती दिली नाही व दखलही घेतली नाही. त्यामुळे जन माहिती अधिकाऱ्यांना शास्ती करावी व माहिती निःशुल्क मिळावी, अशी मागणी अपीलकर्ता श्री. आदिनाथ भगवान जाधव (वय वर्षे ७६) यानी लेखी निवेदनाद्वारे केली.

विशेष अपील निर्गत कार्यक्रम, दि. २३/२/२०११ व दि. ३/९/२०११ रोजी आयोगाने पुढील सुनावणीच्या तारखा देऊनही जन माहिती अधिकारी व अपिलीय प्राधिकारी एकदाही उपस्थित राहिलेले नाहीत. ही बाब गंभीर आहे. माहिती न देणे, सुनावणीला गैरहजर राहणे, त्या बाबतचा कोणताही खुलासा व माहितीबाबत केलेल्या कार्यवाहीचा अहवाल सादर न करणे ही जन माहिती अधिकारी व अपिलीय प्राधिकारी यांची वर्तणूक माहितीचा अधिकार अधिनियम, २००५ च्या अधिनियमाची पायमल्ली करणारे आहे. त्याबाबत त्यानी त्वरित लेखी खुलासा न केल्यामुळे ते पुढील कारवाईस पात्र ठरतात.

आयोगाचे आदेश पुढीलप्रमाणे :

## <u>आदेश</u>

१. अपील अंशतः मान्य करण्यात येत आहे.

२. जन माहिती अधिकारी तथा मुख्याध्यापक, कै विठ्ठलरावजी शिंदे विद्यालय, टेंभुर्णी, ता.माढा, जि. सोलापूर व अपिलीय प्राधिकारी तथा अध्यक्ष, श्री. सावतामाळी शिक्षण प्रसारक मंडळ, टेंभुर्णी, ता. माढा, जि. सोलापूर श्री. आन. एन. देवकर यानी अपीलकर्त्यास माहिती देण्याबाबत केलेल्या कार्यवाहीचा अहवाल, माहिती देण्यास विलंब झाला असल्यास शास्ती विषयक म्हणण्यासह दि. १५/१०/२०११ पर्यंत आयोगाला सादर करावा. सुनावणीच्या तारखांना उपस्थित न राहणे व त्याबाबतची कोणतीही निवेदने सादर न करणे याबाबतचा खुलासाही त्यासोबत असणे आवश्यक आहे. यानुसार कार्यवाही न केल्यास माहितीचा अधिकार अधिनियम, २००५ च्या भंगाबाबत व जाणीवपूर्वक माहिती नाकारल्याबाबत जन

माहिती अधिकारी व अपिलीय प्राधिकारी असणारे, परंतु माहितीबाबत कार्यवाही करण्यास जबाबदार असल्याने माहितीचा अधिकार अधिनियम, २००५ च्या कलम (४,५) अन्वये जन माहिती अधिकारी ठरणारे संस्थेचे अध्यक्ष शास्तीस व त्याअनुषंगिक कारवाईस पात्र ठरतील.

३. शिक्षणाधिकारी, जिल्हा परिषद, सोलापूर यानी संबंधित विद्यालयातील व संस्थेतील माहितीचा अधिकार अधिनियम, २००५ च्या अंमलबजावणीबाबत चौकशी करुन दि. १५/१०/२०११ पर्यंत आयोगाला अहवाल सादर करावा. प्रस्तुत अपिलातील अपीलकर्त्यांच्या मागणीबाबत जन माहिती अधिकारी व अपिलीय प्राधिकारी यांनी केलेल्या कार्यवाहीची तपासणी करुन त्याबाबतचाही अभिप्राय त्यात नोंदविणे आवश्यक आहे.

**(विजय कुवळेकर)**
**राज्य माहिती आयुक्त,**
**पुणे खंडपीठ**

**पुणे**
**दि :- २६.९.२०११**

प्रत माहितीसाठी व पुढील कार्यवाहीसाठी-
१. शिक्षणाधिकारी, जिल्हापरिषद, सोलापूर

**राज्य माहिती आयुक्त, राज्य माहिती आयोग, महाराष्ट्र राज्य, पुणे खंडपीठ यांच्यासमोर**
**माहितीचा अधिकार अधिनियम,२००५ च्या कलम १९ (३) अन्वये दाखल झालेले अपील**

राज्य माहिती आयोग, पुणे खंडपीठ,
नवीन प्रशासकीय इमारत, चौथा मजला,
कौन्सिल हॉल समोर, पुणे ४११ ००१

श्री. रामचंद्र हरिदास लेंडवे
मु. पो. आंधळगाव, ता. मंगळवेढा, जि. सोलापूर अपीलकर्ता

**विरुध्द**

**अपिलीय प्राधिकारी** तथा विस्तार अधिकारी,
पंचायत समिती, मंगळवेढा, जि. सोलापूर

उत्तरवादी

**जन माहिती अधिकारी** तथा ग्रामसेवक,
ग्रामपंचायत, आंधळगाव, ता.मंगळवेढा, जि. सोलापूर

| | | |
|---|---|---|
| १ | अपील क्रमांक | १०३३/२००९/सोलापूर |
| २ | सुनावणीची तारीख | दि. ३/९/२०११ |

**३. उपस्थित**

**अपिलीय प्राधिकारी** तथा विस्तार अधिकारी,
पंचायत समिती, मंगळवेढा, जि. सोलापूर श्री. ज्ञानेश्वर औदुंबर साळुंखे

**जन माहिती अधिकारी** तथा ग्रामसेवक,
ग्रामपंचायत, आंधळगाव, ता.मंगळवेढा, जि. सोलापूर श्री. गोविंद हनुमंत तांदुलकर

| | |
|---|---|
| ४ | माहिती - मागणीच्या मूळ अर्जाची (जोडपत्र-अ) छायाप्रत सोबत जोडली आहे. |

## विवेचन

'मी मागितलेली माहिती मला ग्रामपंचायतीकडून प्राप्त झाली असून माझे पूर्ण समाधान झालेले आहे. आता माझी काहीही तक्रार नाही. तरी माझे केलेले अपील निकालात काढावे',असे लेखी निवेदन अपीलकर्ता श्री. रामचंद्र हरिदास लेंडवे यानी आयोगाला पाठविले. जन माहिती अधिकारी यानी माहिती दिली असल्याचे प्रतिपादन केले.

आयोगाचे आदेश पुढीलप्रमाणे :

## आदेश

अपील निकाली काढण्यात येत आहे.

**(विजय कुवळेकर)**
**राज्य माहिती आयुक्त,**
**पुणे खंडपीठ**

**पुणे**
**दि :- २८.९.२०११**

**राज्य माहिती आयुक्त, राज्य माहिती आयोग, महाराष्ट्र राज्य, पुणे खंडपीठ यांच्यासमोर**
**माहितीचा अधिकार अधिनियम, २००५ च्या कलम १९ (३) अन्वये दाखल झालेले अपील**

राज्य माहिती आयोग, पुणे खंडपीठ,
नवीन प्रशासकीय इमारत, चौथा मजला,
कौन्सिल हॉल समोर, पुणे ४११ ००१

श्री.सतीश पांडुरंग साळुंखे
मु.पो.हतीज, ता.बार्शी, जि.सोलापूर — अपीलकर्ता

**विरुध्द**

**अपिलीय प्राधिकारी** तथा शिक्षणाधिकारी (माध्यमिक),
जिल्हा परिषद, सोलापूर — उत्तरवादी

**जन माहिती अधिकारी** तथा उपशिक्षणाधिकारी (माध्यमिक),
जिल्हा परिषद, सोलापूर

| | | |
|---|---|---|
| १ | अपील क्रमांक | ११२८ / सोलापूर |
| २ | सुनावणीची तारीख | दि.१९.११.२००८ |

**३. उपस्थित**

**अपिलीय प्राधिकारी** तथा शिक्षणाधिकारी (माध्यमिक), जिल्हा परिषद, सोलापूर
श्री.महादेव गेनू आंबेडकर

**जन माहिती अधिकारी** तथा उपशिक्षणाधिकारी (माध्यमिक), जिल्हा परिषद, सोलापूर
विद्यमान-श्री.एम.एस.मुजावर, तत्कालीन-श्री.एस.के.सगरे

| | |
|---|---|
| ४ | माहिती - मागणीच्या मूळ अर्जाची (जोडपत्र-अ) छायाप्रत सोबत जोडली आहे. |

## विवेचन

नरसिंह प्रशाला, काळेगाव, ता.बार्शी, जि.सोलापूर या प्रशालेतील एका शिक्षकाच्या मान्यता प्रस्तावाबाबतची माहिती अपीलकर्ता श्री.सतीश पांडुरंग साळुंखे यानी मागितली होती. १५ दिवसांत

माहिती देण्याचे दि.१९.११.२००८ च्या 'विशेष अपील निर्गत कार्यक्रमा'त अपीलकर्ता व जन माहिती अधिकारी तथा उपशिक्षणाधिकारी (माध्यमिक), जिल्हा परिषद, सोलापूर यांचे एकमत झाले होते. परंतु त्यानुसार माहिती दिली नसल्याची तक्रार अपीलकर्ता यानी केली असून अपीलकर्ता सुनावणीला उपस्थित नाहीत व दि.१०.१२.२००८ नंतर कोणतेही निवेदन त्यानी आयोगाला सादर केलेले नाही. तथापि माहिती देण्याबाबतच्या कार्यवाहीचा अहवाल संबंधित प्रशालेच्या मुख्याध्यापकाकडून जन माहिती अधिकारी तथा उपशिक्षणाधिकारी (माध्यमिक), जिल्हा परिषद, सोलापूर यानी प्राप्त करून घेऊन आयोगाला सादर करावा, असे मौखिक आदेश आयोगाने सुनावणीच्या वेळी दिले.

आयोगाचे आदेश पुढीलप्रमाणे :

## आदेश

(१) अपील निकाली काढण्यात येत आहे.

**(२)** आयोगाच्या मौखिक आदेशानुसार केलेल्या कार्यवाहीचा अहवाल जन माहिती अधिकारी तथा उपशिक्षणाधिकारी (माध्यमिक), जिल्हा परिषद, सोलापूर यानी दि.१५.१०.२०११ पर्यंत आयोगाला सादर करावा.

**(विजय कुवळेकर)**
**राज्य माहिती आयुक्त,**
**पुणे खंडपीठ**

**पुणे**
**दि :- २८.९.२०११**

**राज्य माहिती आयुक्त, राज्य माहिती आयोग, महाराष्ट्र राज्य, पुणे खंडपीठ यांच्यासमोर**
**माहितीचा अधिकार अधिनियम, २००५ च्या कलम १९ (३) अन्वये दाखल झालेले अपील**

राज्य माहिती आयोग, पुणे खंडपीठ,
नवीन प्रशासकीय इमारत, चौथा मजला,
कौन्सिल हॉल समोर, पुणे ४११ ००१

श्री.सतीश पांडुरंग साळुंखे
मु.पो.हतीज, ता.बार्शी, जि.सोलापूर — अपीलकर्ता

**विरुध्द**

**अपिलीय प्राधिकारी** तथा शिक्षणाधिकारी (माध्यमिक),
जिल्हा परिषद, सोलापूर — उत्तरवादी

**जन माहिती अधिकारी** तथा अध्यक्ष, शिवशक्ती बहुउद्देशीय सेवा संस्था,
जामगाव (पा), ता.बार्शी, जि.सोलापूर

| | | |
|---|---|---|
| १ | अपील क्रमांक | ११६३ / सोलापूर |
| २ | सुनावणीची तारीख | दि.२७.९.२०११ |

**३. उपस्थित**

**अपिलीय प्राधिकारी** तथा शिक्षणाधिकारी (माध्यमिक), जिल्हा परिषद, सोलापूर
प्रतिनिधी श्री.एम.एस.मुजावर

| | |
|---|---|
| ४ | माहिती - मागणीच्या मूळ अर्जाची (जोडपत्र-अ) छायाप्रत सोबत जोडली आहे. |

## विवेचन

राज्य माहिती आयोगाने दि.१९.११.२००८ रोजी आयोजित केलेल्या ‘विशेष अपील निर्गत कार्यक्रमा’त या अपिलाचा समावेश होता. त्यावेळी उभय घटकांत एकमत न झाल्यामुळे अपिलाची सुनावणी दि.१९.११.२००८ रोजी घेण्यात आली.

जानेवारी १९९७ पासून जून २००८ पर्यंत शिवशक्ती बहुउद्देशीय सेवा संस्था, जामगाव (पा), ता.बार्शी, जि.सोलापूर संस्थेने घेतलेले संपूर्ण ठराव, लेखा तपासणी अहवाल, संस्थेला आलेली पत्रे व संस्थेने केलेला पत्रव्यवहार याच्या नोंदी आदी माहिती अपीलकर्ता श्री. श्री.सतीश पांडुरंग साळुंखे यानी मागितली होती. पूर्वी माहिती दिली असून आणखी माहिती हवी असल्यास नियमानुसार देण्यास तयार आहोत, असे जन माहिती अधिकारी तथा अध्यक्ष, शिवशक्ती बहुउद्देशीय सेवा संस्था, जामगाव (पा), ता.बार्शी, जि.सोलापूर यानी 'विशेष अपील निर्गत कार्यक्रमा'तील प्रपत्रात नमूद केले आहे. अपीलकर्त्यास हवी असलेली ऊर्वरित माहिती वीस दिवसांत देण्याबाबत पुढील कार्यवाही करण्याचे अपिलीय प्राधिकारी यानी प्रपत्रात नमूद केले होते. परंतु त्यानुसार माहिती मिळाली नसल्याची तक्रार अपीलकर्ता यानी आयोगाकडे केली. परंतु अपीलकर्त्यानी दि.२३.६.२००८ च्या अर्जान्वये मागितलेली माहिती दि.४.७.२००८ च्या पत्रान्वये युपीसीने दिली असल्याचे जन माहिती अधिकारी तथा अध्यक्ष, शिवशक्ती बहुउद्देशीय सेवा संस्था, जामगाव (पा), ता.बार्शी, जि.सोलापूर यानी युपीसीच्या पावतीसह कळविले. नंतरच्या काळात संस्थेचे रेकॉर्ड दि.२६.९.२०१० रोजी जळाल्याबाबतच्या पोलीस पंचनाम्याची प्रतही त्यानी सोबत सादर केली आहे. अपीलकर्त्यांनी मागितलेली माहिती अत्यंत विस्तृत स्वरूपाची व प्रदीर्घ कालखंडातील असून माहितीचा अधिकार अधिनियम, २००५ च्या कलम ७(९) अन्वये नाकारता येईल, याची समज अपीलकर्त्यास देण्यात येत आहे. आवश्यक तर उपलब्ध अभिलेखाचे अवलोकन करून हव्या असलेल्या कागदपत्रांच्या प्रती अपीलकर्ता प्राप्त करून घेऊ शकतात. अपीलकर्त्यानी मागणी केल्यास उपरोक्त शिक्षण संस्थेचे जन माहिती अधिकारी तथा अध्यक्ष, शिवशक्ती बहुउद्देशीय सेवा संस्था, जामगाव (पा), ता.बार्शी, जि.सोलापूर यानी असे अभिलेख अवलोकनासाठी उपलब्ध करून दिले पाहिजेत.

आयोगाचे आदेश पुढीलप्रमाणे :

## आदेश

अपील निकाली काढण्यात येत आहे.

**(विजय कुवळेकर)**
**राज्य माहिती आयुक्त,**
**पुणे खंडपीठ**

**पुणे**
**दि :- २८.९.२०११**

**राज्य माहिती आयुक्त, राज्य माहिती आयोग, महाराष्ट्र राज्य, पुणे खंडपीठ यांच्यासमोर**
**<u>माहितीचा अधिकार अधिनियम,२००५ च्या कलम १९ (३) अन्वये दाखल झालेले अपील</u>**

राज्य माहिती आयोग, पुणे खंडपीठ,
नवीन प्रशासकीय इमारत, चौथा मजला,
कौन्सिल हॉल समोर, पुणे ४११ ००१

श्री. उत्तम अनंत मोरे
४९ ब, मेनरोड, जेऊर, ता. करमाळा,
जि. सोलापूर — अपीलकर्ता

**विरुध्द**

**अपिलीय प्राधिकारी** तथा अधीक्षक,
सार्वजनिक न्यास नोंदणी कार्यालय,
नाथ प्राईड, पहिला मजला, सिव्हिल हॉस्पिटलच्या पूर्वस,
उत्तर सदर बझार, सोलापूर

उत्तरवादी

**जन माहिती अधिकारी** तथा अध्यक्ष,
न्यू यशवंत शिक्षण प्रसारक मंडळ, सालसे, ता. करमाळा, जि. सोलापूर

| | | |
|---|---|---|
| १ | अपील क्रमांक | २९४५/२०१०/सोलापूर |
| २ | सुनावणीची तारीख | दि. ३/९/२०११ |

**३. उपस्थित**

**अपीलकर्ता -** श्री. उत्तम अनंत मोरे
४९ ब, मेनरोड, जेऊर, ता. करमाळा, जि. सोलापूर

**जन माहिती अधिकारी** तथा अध्यक्ष,
न्यू यशवंत शिक्षण प्रसारक मंडळ, सालसे, ता. करमाळा,
जि. सोलापूर श्री. रविंद्र नामदेव सपकाळ

| | |
|---|---|
| | **अपिलीय प्राधिकारी** तथा अधीक्षक,<br>सार्वजनिक न्यास नोंदणी कार्यालय, नाथ प्राईड, पहिला मजला,<br>सिव्हिल हॉस्पिटलच्या पूर्वस, उत्तर सदर बझार, सोलापूर<br>यांचे प्रतिनिधी श्री. एस. आय. कांबळे |
| ४ | माहिती - मागणीच्या मूळ अर्जाची (जोडपत्र-अ) छायाप्रत सोबत जोडली आहे. |

## <u>विवेचन</u>

प्रस्तुत अपिलाची सुनावणी दि. १२/५/२०११ रोजी मुक्रर करण्यात आली होती. सदर सुनावणीस जन माहिती अधिकारी यांचे वतीने पुढील तारीख मिळण्याची विनंती केल्यामुळे पुन्हा दि. ३/९/२०११ रोजी सुनावणी घेण्यात आली.

आयोगापुढील सुनावणीत अपीलकर्ता, जन माहिती अधिकारी यांनी पुढीलप्रमाणे निवेदन केले :

<u>अपीलकर्ता</u> - न्यू यशवंत शिक्षण प्रसारक मंडळ, सालसे, ता. करमाळा, जि. सोलापूर या संस्थेकडे मागितलेली माहिती न देता पाकिटात कोरे कागद पाठविले. रजिस्टर टपालाने अशा प्रकारे कोरे कागद पाठवून माहिती नाकारणाऱ्या जन माहिती अधिकाऱ्यांवर दंडात्मक कारवाई व्हावी. हे पाकिट वकिलाकडे सोपवून संस्थेच्या अध्यक्षांना नोटीस देऊन मागितलेला खुलासाही अद्याप मिळाला नाही. दोन वर्षे झाले तरीही माहिती मिळालेली नाही.

अपीलकर्त्यांनी रजिस्टर टपालाचे पाकिट व आत कोरे कागद असे आयोगापुढे सादर केले.

<u>जन माहिती अधिकारी</u> - अपीलकर्त्यांच्या दि. १६/१/२००९ च्या अर्जाला दि. १२/१२/२००९ च्या अर्जान्वये उत्तर पाठविले. अपीलकर्त्यांनी दि. १/१/२०१० च्या पत्रान्वये मनिऑर्डरने शुल्क पाठविल्याचे कळविले. शुल्क भरल्यानंतर दि. १३/१/२०१० रोजी रजिस्टर टपालाने माहिती पाठविली. सन २००५ ते २००८ या काळातील अपीलकर्त्यांनी मागितलेली माहिती उपलब्ध नसल्यामुळे तसे कळविले. कोरे कागद पाठविल्याचे पत्र अपीलकर्त्यांनी आम्हाला पाठविले. परंतु संस्थेच्या विश्वस्त मंडळातील अपीलकर्त्यांचे सभासदत्त्व रद्द केल्यामुळे व त्याबाबतचा अहवाल धर्मादाय आयुक्तांकडे सादर करण्यात येणार असल्याचे कळल्यानंतर अपीलकर्त्यांनी अशा प्रकारे खोटी तक्रार केली आहे. पाकिटात कोरे कागद नव्हते, माहितीचे कागद होते.

जन माहिती अधिकाऱ्यांनी पाठविलेल्या माहितीच्या प्रती सादर केल्या.

अपीलकर्त्यांनी सादर केलेल्या पाकिटात कोरे कागद असले तरी रजिस्टर टपालाने हेच कोरे कागद पाठविले, असे त्यावरुन सिध्द होत नाही. तसेच जन माहिती अधिकारी यानी सादर केलेल्या प्रती पाहता माहिती नाकारल्याचे दिसत नाही. उभय बाजूंतील संस्थांतर्गत वादामध्ये माहितीचा अधिकार अधिनियम, २००५ चा वापर करुन सर्व यंत्रणांचा वेळ व कार्यशक्ती याचा अपव्यय उभय बाजूंनी करणे योग्य नाही. संबंधित प्रकरणात कोणताही सार्वजनिक हिताचा विषय दिसत नाही. तथापि जन माहिती अधिकारी यानी आयोगापुढे सादर केलेल्या माहितीच्या छायांकित प्रती अपीलकर्त्यास हव्या असल्यास नि:शुल्क देण्यात याव्यात, असे मौखिक आदेश आयोगाने सुनावणीच्या वेळी दिले.

आयोगाचे आदेश पुढीलप्रमाणे :

## आदेश

अपील निकाली काढण्यात येत आहे.

**(विजय कुवळेकर)**
**राज्य माहिती आयुक्त,**
**पुणे खंडपीठ**

**पुणे**
**दि :- २६.९.२०११**

**राज्य माहिती आयुक्त, राज्य माहिती आयोग, महाराष्ट्र राज्य, पुणे खंडपीठ यांच्यासमोर**
**<u>माहितीचा अधिकार अधिनियम, २००५ च्या कलम १९ (३) अन्वये दाखल झालेले अपील</u>**

राज्य माहिती आयोग, पुणे खंडपीठ,
नवीन प्रशासकीय इमारत, चौथा मजला,
कौन्सिल हॉल समोर, पुणे ४११ ००१

श्री.सूर्यकांत शामराव हळ्ळी
ब्लॉक नं.२९, दमाणीनगर, देगाव रोड, सोलापूर — अपीलकर्ता

**विरुध्द**

**अपिलीय प्राधिकारी** तथा शिक्षणाधिकारी (माध्यमिक),
जिल्हा परिषद, सोलापूर — उत्तरवादी

**जन माहिती अधिकारी** तथा मुख्याध्यापक, ज्ञानसंपदा शिक्षा प्रसारक मंडळ,
७३, कमलानगर, विजापूर रोड, सोलापूर

| | | |
|---|---|---|
| १ | अपील क्रमांक | २८४७ / २०१० / सोलापूर |
| २ | सुनावणीची तारीख | दि.३.९.३०११ |

**३. उपस्थित**

**अपीलकर्ता** श्री.सूर्यकांत शामराव हळ्ळी
ब्लॉक नं.२९, दमाणीनगर, देगाव रोड, सोलापूर

**अपिलीय प्राधिकारी** तथा शिक्षणाधिकारी (माध्यमिक), जिल्हा परिषद, सोलापूर
श्री.एम.जी.आंबेडकर

**जन माहिती अधिकारी** तथा मुख्याध्यापक, ज्ञानसंपदा शिक्षा प्रसारक मंडळ,
७३, कमलानगर, विजापूर रोड, सोलापूर श्री.सिध्दारूढ शिवलिंग बेडगनूर

| | |
|---|---|
| ४ | माहिती - मागणीच्या मूळ अर्जाची (जोडपत्र-अ) छायाप्रत सोबत जोडली आहे. |

# विवेचन

अपीलकर्ता, जन माहिती अधिकारी व अपिलीय प्राधिकारी यांनी आयोगापुढील सुनावणीत खालीलप्रमाणे निवेदन केले :

अपीलकर्ता : ज्ञानसंपदा शिक्षण प्रसारक मंडळ या संस्थेच्या सदस्यांची नावे व पत्ते यात फरक कसा केला गेला याच्या पुराव्याची सत्यप्रत, तसेच संस्था स्थापन झाल्यापासून दि.३०.६.२०१० पर्यंत संस्थेने धर्मादाय आयुक्त, सोलापूर यांच्याकडे वेळोवेळी पाठविलेले चेंज रिपोर्टस इ. माहिती मागितली होती. संस्थेने ती दिली नाही. संस्थेची मूळ नावे व संस्थेकडील नावे व पत्ते यात तफावत आहे. त्याचा खुलासा केला जात नाही. अपील क्र.१३९१ मध्ये आयोगाने असा आदेश देऊनही संस्थेने माहिती दिली नाही.

जन माहिती अधिकारी : अपीलकर्त्याच्या दि.८.७.२०१० च्या अर्जाला दि.५.८.२०१० च्या पत्रान्वये उत्तर दिले. 'संस्थेकडे व शाळेकडे माहितीच्या अधिकारात अर्ज पाठवून तुम्ही अलीकडे तुम्हास खुशी द्यावी म्हणून वारंवार मागणी करू लागला आहात,'असे उत्तरात स्पष्ट म्हटलेले आहे. मुद्देनिहाय उत्तर दिले व नंतर रजिस्टर्ड टपालाने माहितीही पाठविली. ती मिळाल्याची त्यांच्या मुलीची स्वाक्षरी आहे.

अपीलकर्ता याना संबंधित टपाल त्यांच्या मुलीने स्वीकारल्याची प्रत दाखविण्यात आली. दि.२३.८.२०१० चे हे टपाल असून मुलीने ती स्वीकारल्याची आपल्याला कल्पना नसल्याचे अपीलकर्त्यांनी सांगितले.

मुख्याध्यापकांच्या (स्वतःच्या) मुलाचे वैद्यकीय देयक सादरच केलेले नसल्यामुळे त्याबाबतची माहिती देणे शक्य नव्हते. अपील क्र.१३९१ मध्ये माहिती देण्याचे आदेश आयोगाने दिलेले नाहीत, तर माहिती दिली असल्याचा निष्कर्ष आयोगाने नोंदविलेला आहे, असेही जन माहिती अधिकारी श्री.सिध्दारूढ शिवलिंग बेडगनूर यानी नमूद केले.

अपिलीय प्राधिकारी : अपीलकर्त्याची सदस्यांच्या नावातील बदलाबाबतची तक्रार हा माहितीच्या अधिकारातील विषय नाही. त्याबाबत ते धर्मादाय आयुक्तांकडे दाद / माहिती मागू शकतात.

अपील क्र.१३९१ मध्ये अपीलकर्त्यास माहिती देण्याचे आदेश आयोगाने दिल्याचे अपीलकर्त्याचे निवेदन सत्य नाही. याबाबत दिशाभूल करयाचा प्रयत्न केल्याबद्दल अपीलकर्त्यास कडक ताकिद देण्यात

येत आहे. तसेच कागदपत्रांची पडताळाी करून हव्या असलेल्या कागदपत्रांच्या प्रती स्वीकारल्याची स्वाक्षरीही त्यानी केली असल्याचे जन माहिती अधिकारी यानी निदर्शनास आणले आहे. या बाबी, तसेच संबंधित प्रकरणात कोणतेही सार्वजनिक हित असल्याचे दिसत नाही, हे लक्षात घेता अपीलकर्त्यांनी पुनः पुन्हा त्याच स्वरूपाच्या माहितीसाठी सर्व यंत्रणांचा वेळ व कार्यशक्ती यांचा अपव्यय करणे योग्य नाही. मात्र सदस्यांच्या / शाळेच्या नावातील मूळ नोंदींच्या अनुषंगाने कोणत्याही कागदपत्रांच्या प्रती त्याना हव्या असल्यास जन माहिती अधिकारी तथा मुख्याध्यापक, ज्ञानसंपदा शिक्षण प्रसारक मंडळ, ७३, कमलानगर, विजापूर रोड, सोलापूर यानी त्या पुरवाव्यात ही कार्यवाही १५ दिवसांत पूर्ण व्हावी, असे मौखिक आदेश आयोगाने सुनावणीच्या वेळी दिले.

आयोगाचे आदेश पुढीलप्रमाणे :

## आदेश

अपील निकाली काढण्यात येत आहे.

**(विजय कुवळेकर)**
**राज्य माहिती आयुक्त,**
**पुणे खंडपीठ**

**पुणे**
**दि :- २६.९.२०११**

**राज्य माहिती आयुक्त, राज्य माहिती आयोग, महाराष्ट्र राज्य, पुणे खंडपीठ यांच्यासमोर**
**माहितीचा अधिकार अधिनियम,२००५ च्या कलम १९ (३) अन्वये दाखल झालेले अपील**

राज्य माहिती आयोग, पुणे खंडपीठ,
नवीन प्रशासकीय इमारत, चौथा मजला,
कौन्सिल हॉल समोर, पुणे ४११ ००१

श्री. साजीदभाई इब्राहिम सय्यद
मु.पो.दत्तचौक (देशमुख गल्ली),
अकलुज, ता. माळशिरस, जि. सोलापूर — अपीलकर्ता

**विरुध्द**

**अपिलीय प्राधिकारी** तथा कार्यकारी अभियंता,
संवसू विभाग, महावितरण कंपनी, अकलुज, ता. माळशिरस, जि. सोलापूर
उत्तरवादी

**जन माहिती अधिकारी** तथा उपकार्यकारी अभियंता,
संवसू विभाग, महावितरण कंपनी, अकलुज, ता. माळशिरस, जि. सोलापूर

| | | |
|---|---|---|
| १ | अपील क्रमांक | १०९४/२०१०/सोलापूर |
| २ | सुनावणीची तारीख | दि. ३/९/२०११ |

**३. उपस्थित**

**अपीलकर्ता** श्री. साजीदभाई इब्राहिम सय्यद
मु.पो.दत्तचौक (देशमुख गल्ली), अकलुज, ता. माळशिरस, जि. सोलापूर

**अपिलीय प्राधिकारी** तथा कार्यकारी अभियंता,
संवसू विभाग, महावितरण कंपनी, अकलुज, ता. माळशिरस,
जि. सोलापूर श्री. एम. एम. गायकवाड

**जन माहिती अधिकारी** तथा उपकार्यकारी अभियंता,
संवसू विभाग, महावितरण कंपनी, अकलुज, ता. माळशिरस,
जि. सोलापूर श्री. एम. एल. जाधव

| | |
|---|---|
| | **तत्कालीन जन माहिती अधिकारी** श्री. डी. एस. धनशेट्टी<br><br>**मे. मनोहर इलेक्ट्रिकलचे मालक** श्री. लक्ष्मण मनोहर बंदिष्टे |
| ४ | माहिती - मागणीच्या मूळ अर्जाची (जोडपत्र-अ) छायाप्रत सोबत जोडली आहे. |

## विवेचन

आयोगापुढील सुनावणीत अपीलकर्ता, जन माहिती अधिकारी व अपिलीय प्राधिकारी यांनी पुढीलप्रमाणे निवेदन केले :

अपीलकर्ता- मे.मनोहर इलेक्ट्रिकल कंपनी, नातेपुते या ठेकेदारी करणाऱ्या कंपनीच्या परवान्याची मूळ कागदपत्रे, नूतनीकरणाची कागदपत्रे, त्यानी आयकर, विक्रीकर भरल्याच्या सन २००५ ते २०१० पर्यंतच्या मूळ प्रती इ. माहिती मागितली होती. ती मूळ कागदपत्रे मिळाली नाहीत. तसेच बिले खोटी दाखविली असून त्यावर संबंधित अधिकाऱ्यांच्या सहया नाहीत.

जन माहिती अधिकारी व अपिलीय प्राधिकारी - अपीलकर्त्यांनी दारिद्रय रेषेखालील दाखला जोडून खाजगी कंपनीच्या मूळ कागदपत्रांची मागणी आमच्या कार्यालयाकडे केली आहे. कोणतीही माहिती खोटी दिलेली नाही. बिलांच्या मागील बाजूंची छायांकित प्रत न झाल्यामुळे अधिकाऱ्यांच्या सहया नसल्याचे त्यांचे म्हणणे आहे. प्रथम अपिलाच्या सुनावणीच्या वेळी हा मुद्दा त्यानी मांडला असता तर मूळ बिले दाखविणे शक्य होते व कागदपत्रांच्या छायांकित प्रती देता आल्या असत्या. आमच्या कार्यालयात असलेली सर्व माहिती दिलेली आहे.

जन माहिती अधिकारी व अपिलीय प्राधिकारी यांनी अपीलकर्त्यास दिलेल्या माहितीची मूळ कागदपत्रे आयोगास सादर केली.

मनोहर इलेक्ट्रिकल कंपनीचे मालक श्री. लक्ष्मण मनोहर बंदिष्टे सुनावणीस उपस्थित होते. त्यानी कंपनीचा परवाना आदि कागदपत्रे आयोगापुढे सादर केली.

उभय बाजूंची निवेदने व सादर करण्यात आलेली कागदपत्रे विचारात घेता अपीलकर्त्यांची मागणी वैयक्तिक स्वरुपाची असून त्यात सार्वजनिक हिताचा कोणताही भाग नाही. तसेच खाजगी

कंपनीची मूळ कागदपत्रे माहितीच्या अधिकारात मागता येणार नाहीत. संबंधित कार्यालयीन कामकाजाच्या अनुषंगाने महाराष्ट्र राज्य वीज वितरण कंपनीकडे दाखल असलेली कागदपत्रे अपीलकर्त्यास अवलोकनासाठी उपलब्ध होऊ शकतात. त्याच्या छायांकित प्रतीही मिळू शकतात. बिलांच्या प्रतींच्या दोन्ही बाजूंच्या छायांकित प्रती देण्याची दक्षता जन माहिती अधिकारी यानी घेणे आवश्यक आहे. त्यानी आयोगापुढे सादर केलेल्या बिलांच्या संबंधित छायांकित प्रती अपीलकर्त्यास निःशुल्क द्याव्यात, असे मौखिक आदेश आयोगाने सुनावणीच्या वेळी दिले. परंतु सुनावणीनंतर अपीलकर्त्यास या प्रती देऊ केल्या असता त्यानी घेण्यास नकार दिल्यामुळे सहा बिलांच्या दोन्ही बाजूंकडील छायांकित प्रती रजिस्टर टपालाने पाठवीत असल्याचे दि. ३/९/२०११ च्या पत्रान्वये व प्रती पाठविल्याचे दि. ५/९/२०११ च्या पत्रान्वये अपिलीय प्राधिकारी श्री. एम. एम. गायकवाड यानी संबंधित प्रतींसह आयोगास सादर केले. देऊ केलेली माहिती न स्वीकारण्याची कृती अपीलकर्त्यांच्या भूमिकेबाबत साशंकता निर्माण करणारी आहे.

आयोगाचे आदेश पुढीलप्रमाणे :

**आदेश**

अपील अमान्य करण्यात येत आहे.

**(विजय कुवळेकर)**
**राज्य माहिती आयुक्त,**
**पुणे खंडपीठ**

**पुणे**
**दि :- २६.९.२०११**

**राज्य माहिती आयुक्त, राज्य माहिती आयोग, महाराष्ट्र राज्य, पुणे खंडपीठ यांच्यासमोर**
**<u>माहितीचा अधिकार अधिनियम, २००५ च्या कलम १९ (३) अन्वये दाखल झालेले अपील</u>**

राज्य माहिती आयोग, पुणे खंडपीठ,
नवीन प्रशासकीय इमारत, चौथा मजला,
कौन्सिल हॉल समोर, पुणे ४११ ००१

श्री.हणमंत नागनाथ खांडेकर
मु.पो.गोटेवाडी, ता.मोहोळ, जि.सोलापूर अपीलकर्ता

**विरुध्द**

**अपिलीय प्राधिकारी** तथा कार्यकारी अभियंता,
भिमा विकास विभाग क्र.२, सोलापूर उत्तरवादी

**जन माहिती अधिकारी** तथा उपविभागीय अभियंता,
भिमा पाटबंधारे मंडळ, मोहोळ, जि.सोलापूर

| | | |
|---|---|---|
| १ | अपील क्रमांक | १३२२ / २००९ / सोलापूर |
| २ | सुनावणीची तारीख | दि. २३.२.२०११ |
| **३.** | **उपस्थित**<br><br>**अपिलीय प्राधिकारी** तथा कार्यकारी अभियंता,<br>भिमा विकास विभाग क्र.२, सोलापूर श्री.ए.बी.साळे<br><br>**जन माहिती अधिकारी** तथा उपविभागीय अभियंता,<br>भिमा पाटबंधारे मंडळ, मोहोळ, जि.सोलापूर श्री.उ.वि.माने | |
| ४ | माहिती - मागणीच्या मूळ अर्जाची (जोडपत्र-अ) छायाप्रत सोबत जोडली आहे. | |

## <u>विवेचन</u>

गायरानाजवळील कालव्याच्या संदर्भातील दि.१.१.२००३ ते २०.५.२००९ पर्यंतची माहिती अपीलकर्ता श्री.हणमंत नागनाथ खांडेकर यानी मागितली होती. अपीलकर्ता शेतकरी असून त्यानी मागितलेली माहिती ३८२८ पृष्ठांची होती.त्याना शुल्क कळविले, ते त्यानी भरले नाही व कार्यकारी अभियंता हे अपिलीय प्राधिकारी नसताना त्यांच्याकडे अपील केले. अपीलकर्ता यानी दारिद्र्यरेषेखाली

असल्याचा दाखला नंतर सादर केला. अपीलकर्त्यांनी मागितलेली माहिती विस्तृत स्वरूपाची असल्यामुळे कार्यालयाकडील उपलब्ध निधीमध्ये निःशुल्क देणे शक्य नसतानाही अपीलकर्त्यास अभिलेख अवलोकनासाठी उपलब्ध असल्याचे कळविले. संबंधित पाणीवापर संस्थेचे सन २००७-२००८ च्या आधीचे अभिलेख उपलब्ध नाहीत. संस्थेवर प्रशासक नेमयात आलेला आहे, असे प्रतिपादन जन माहिती अधिकारी तथा उपविभागीय अभियंता, भिमा पाटबंधारे मंडळ, मोहोळ, जि.सोलापूर श्री.उ.वि.माने व अपिलीय प्राधिकारी तथा कार्यकारी अभियंता, भिमा विकास विभाग क्र.२, सोलापूर श्री.ए.बी.साळे यांनी केले.

उभय बाजूंची निवेदने व सादर करण्यात आलेली कागदपत्रे विचारात घेता माहितीबाबत जन माहिती अधिकारी यानी केलेली कार्यवाही योग्य आहे. अपीलकर्त्याच्या दारिद्र्यरेषेखालील यादीतील समावेशाबाबत गटविकास अधिकारी, पंचायत समिती, मोहोळ यांच्याकडून कार्यकारी अभियंता यानी खातरजमा करून घ्यावी, असे मौखिक आदेश आयोगाने सुनावणीच्या वेळी दिले. त्यानुसार सहाय्यक जन माहिती अधिकारी तथा उपकार्यकारी अभियंता, भिमा विकास विभाग क्र.२, सोलापूर यानी दि.२८.६.२०११ च्या पत्रान्वये गटविकास अधिकारी याना कळविले. परंतु गटविकास अधिकारी यानी अद्याप असा अहवाल दाखल केलेला नाही. तो त्वरित सादर न केल्यास ते कारवाईस पात्र ठरतील.

आयोगाचे आदेश पुढीलप्रमाणे :

**आदेश**

अपील निकाली काढण्यात येत आहे.

**(विजय कुवळेकर)**
**राज्य माहिती आयुक्त,**
**पुणे खंडपीठ**

**पुणे**
**दि :- २६.९.२०११**

**राज्य माहिती आयुक्त, राज्य माहिती आयोग, महाराष्ट्र राज्य, पुणे खंडपीठ यांच्यासमोर**
**<u>माहितीचा अधिकार अधिनियम, २००५ च्या कलम १९ (३) अन्वये दाखल झालेले अपील</u>**

राज्य माहिती आयोग, पुणे खंडपीठ,
नवीन प्रशासकीय इमारत, चौथा मजला,
कौन्सिल हॉल समोर, पुणे ४११ ००१

श्री.धोंडीराम दत्तात्रय माळी
मु.पो.कळमा, ता.उत्तर सोलापूर, जि.सोलापूर अपीलकर्ता

**विरुध्द**

**अपिलीय प्राधिकारी** तथा शिक्षणाधिकारी (माध्यमिक),
जिल्हा परिषद, सोलापूर उत्तरवादी

**जन माहिती अधिकारी** तथा उपशिक्षणाधिकारी (माध्यमिक),
जिल्हा परिषद, सोलापूर

| | | |
|---|---|---|
| १ | अपील क्रमांक | ६४४ / २००९ / सोलापूर |
| २ | सुनावणीची तारीख | दि.३.९.२०११ |
| **३. उपस्थित**<br><br>**अपिलीय प्राधिकारी** तथा शिक्षणाधिकारी (माध्यमिक), जिल्हा परिषद, सोलापूर<br>श्री.एम.जी.आंबेडकर | | |
| ४ | माहिती - मागणीच्या मूळ अर्जाची (जोडपत्र-अ) छायाप्रत सोबत जोडली आहे. | |

## <u>विवेचन</u>

अपीलकर्ता श्री.धोंडीराम दत्तात्रय माळी यानी एका शिक्षकाच्या जुलै १९९३ मधील मान्यतापत्राची प्रत व अनुषंगिक माहिती मागितली होती. सुमारे १७ वर्षांपूर्वीचे हे अभिलेख कार्यालयात उपलब्ध

नाहीत. तसे अपीलकर्त्यास कळवियात येईल, असे प्रतिपादन अपिलीय प्राधिकारी तथा शिक्षणाधिकारी (माध्यमिक), जिल्हा परिषद, सोलापूर श्री.एम.जी.आंबेडकर यानी केले. आयोगाने स्मरण दिल्यानंतर त्याची पूर्तता अपिलीय प्राधिकारी यानी केली, याबाबत त्याना समज देण्यात येत आहे.

प्रस्तुत अपिलाच्या सुनावणीसाठी दि.२३.२.२०११ वदि.३.९.२०११ या तारखा देऊनही दोन्ही वेळा अपीलकर्ता गैरहजर होते. यावरून माहिती मिळण्याबाबत अपीलकर्ता याना स्वारस्य नाही, असे दिसते.

आयोगाचे आदेश पुढीलप्रमाणे :

**<u>आदेश</u>**

अपील निकाली काढण्यात येत आहे.

**(विजय कुवळेकर)**
**राज्य माहिती आयुक्त,**
**पुणे खंडपीठ**

**पुणे**
**दि :- २६.९.२०११**

**राज्य माहिती आयुक्त, राज्य माहिती आयोग, महाराष्ट्र राज्य, पुणे खंडपीठ यांच्यासमोर**
**माहितीचा अधिकार अधिनियम, २००५ च्या कलम १९ (३) अन्वये दाखल झालेले अपील**

राज्य माहिती आयोग, पुणे खंडपीठ,
नवीन प्रशासकीय इमारत, चौथा मजला,
कौन्सिल हॉल समोर, पुणे ४११ ००१

श्री.अनंतकुमार बाहुबली रणदिवे
५६,राणाप्रतापनगर, विजापूर रोड, नडगिरी पेट्रोलपंपासमोर, सोलापूर — अपीलकर्ता

**विरुध्द**

**अपिलीय प्राधिकारी** तथा शिक्षणाधिकारी (माध्यमिक),
जिल्हा, परिषद, सोलापूर — उत्तरवादी

**जन माहिती अधिकारी** तथा श्री नूतन प्रशाला, जयकुमारनगर,
विजापूर रोड, सोलापूर

| | | |
|---|---|---|
| १ | अपील क्रमांक | १४२३ / सोलापूर, ९५०/२००९/सोलापूर |
| २ | सुनावणीची तारीख | दि.२३.२.२०११ |

**३. उपस्थित**

**अपीलकर्ता** श्री.अनंतकुमार बाहुबली रणदिवे
५६,राणाप्रतापनगर, विजापूर रोड, नडगिरी पेट्रोलपंपासमोर, सोलापूर

**अपिलीय प्राधिकारी** तथा शिक्षणाधिकारी (माध्यमिक), जिल्हा, परिषद, सोलापूर
प्रतिनिधी श्री.जे.टी.खंडागळे

**जन माहिती अधिकारी** तथा मुख्याध्यापक, श्री नूतन प्रशाला,
जयकुमारनगर, विजापूर रोड, सोलापूर श्री.नंदकुमार शांतीनाथ सावळे

| | |
|---|---|
| ४ | माहिती - मागणीच्या मूळ अर्जाची (जोडपत्र-अ) छायाप्रत सोबत जोडली आहे. |

## विवेचन

अपीलकर्ता, जन माहिती अधिकारी व अपिलीय प्राधिकारी यांनी आयोगासमोरील सुनावणीत खालीलप्रमाणे निवेदन केले :

अपीलकर्ता : श्री नूतन प्रशाला, विजापूर रोड, सोलापूर या शाळेतील काही वर्गांची हजेरीपत्रके, विद्यार्थ्यांच्या गुणपत्रिका इ.माहिती मागितली होती. परंतु काही वर्षांच्या गुणपत्रिकेच्या प्रती, शिक्षकांच्या वेळापत्रकात केलेल्या बदलाची माहिती जन माहिती अधिकारी तथा मुख्याध्यापक, श्री नूतन प्रशाला, जयकुमारनगर, विजापूर रोड, सोलापूर यानी दिली नाही. याच शाळेकडे विविध स्वरूपाची माहिती मागणाऱ्या अर्जावरील ८ ते १० अपिले मी केलेली आहेत. माहिती मिळणे आवश्यक आहे. अन्य अपिलांमध्ये माझ्या पदोन्नतीसाठी आवश्यक असलेली माहितीही जन माहिती अधिकारी यानी दिलेली नाही

जन माहिती अधिकारी : दि.१.२.२०११ मध्ये मुख्याध्यापक पदाचा पदभार स्वीकारला असून माझ या आधीचे मुख्याध्यापक श्री.आर.बी.चौधरी यानी उपलब्ध माहिती दिलेली आहे. श्री.आर.बी.चौधरी यांच्या आधीचे मुख्याध्यापक श्री.के.डी.चौधरी यांच्याकडून संपूर्ण कागदपत्रे मिळाली नसल्याचा दावा न्यायालयात दाखल केला असून प्रकरण प्रलंबित आहे. याबाबतचा सर्व तपशील अपीलकर्त्याना देण्यात आलेला आहे. आयोगाने यापूर्वी निकाली काढण्यात आलेल्या अपिलांमध्ये मागितलेली माहितीच अपीलकर्ता त्रास देण्यासाठी पुनः पुन्हा मागत आहेत.

अपीलकर्ता यानी अत्यंत विस्तृत स्वरूपाची माहिती मागितली असून विद्यार्थ्यांच्या गुणपत्रिका सरसकट देण्याची त्यांची मागणी योग्य नाही. तसेच कारणे, खुलासा, स्पष्टीकरण अशा स्वरूपाची मागणी माहितीचा अधिकार अधिनियम, २००५ अंतर्गत येत नाही. मात्र केवळ प्रकरण न्यायाप्रविष्ट असल्याच्या कारणावरून देय माहिती नाकारता येणार नाही. एकत्रित गुणपत्रिकांची यादी अपीलकर्त्यास पुरवावी, असे मौखिक आदेश आयोगाने सुनावणीच्या वेळी दिले. त्यानुसार पूर्तता केल्याचे जन माहिती अधिकारी तथा मुख्याध्यापक, श्री नूतन प्रशाला, जयकुमारनगर, विजापूर रोड, सोलापूर श्री.नंदकुमार

शांतीनाथ सावळे यानी दि.२६.३.२०११ च्या पत्रान्वये दिलेल्या माहितीच्या प्रतीसह आयोगास अवगत केले.

उभय बाजूंची निवेदने व सादर करण्यात आलेली कागदपत्रे विचारात घेता अपीलकर्त्यास वेळोवेळी माहिती देण्यात आलेली आहे. तसेच अशा प्रकारच्या माहितीच्या मागणीत सार्वजनिक हिताचा कोणताही विषय दिसत नाही. पुनः पुन्हा तीच व मोठ्या प्रमाणावर माहिती मागणे हा माहितीच्या अधिकाराचा सुसंगत असा वापर म्हणता येणार नाही. सर्वोच्च न्यायालयाने सिव्हिल अपील क्र. ६४५४/२०११ प्रकरणी दि. ९/८/२०११ रोजी दिलेल्या निर्णयात अशा स्वरूपाच्या माहिती-मागणीबाबत मार्गदर्शक अभिप्राय दिला आहे.

Indiscriminate and impractical demands or directions under RTI Act for disclosure of all and sundry information (unrelated to transparency and accountability in the functioning of public authorities and eradication of corruption) would be counter-productive as it will adversely affect the efficiency of the administration and result in the executive getting bogged down with the non-productive work of collecting and furnishing information, असे न्यायालयाने म्हटले आहे. अपीलकर्त्यास त्याची जाणीव देण्यात येत आहे.

आयोगाचे आदेश पुढीलप्रमाणे :

## आदेश

अपिले अमान्य करण्यात येत आहेत.

**(विजय कुवळेकर)**
**राज्य माहिती आयुक्त,**
**पुणे खंडपीठ**

**पुणे**
**दि :- २६.९.२०११**

**राज्य माहिती आयुक्त, राज्य माहिती आयोग, महाराष्ट्र राज्य, पुणे खंडपीठ यांच्यासमोर**
**<u>माहितीचा अधिकार अधिनियम, २००५ च्या कलम १९ (३) अन्वये दाखल झालेले अपील</u>**

राज्य माहिती आयोग, पुणे खंडपीठ,
नवीन प्रशासकीय इमारत, चौथा मजला,
कौन्सिल हॉल समोर, पुणे ४११ ००१

श्री.मंदार मानसिंग पाटील
२७१, ए वॉर्ड, मरगाई गल्ली, शिवाजी पेठ, कोल्हापूर अपीलकर्ता

**विरुध्द**

**अपिलीय प्राधिकारी** तथा सचिव, श्री प्रिन्स शिवाजी मराठा बोर्डिंग हाऊस,
१०६१, ए वॉर्ड, शिवाजी पेठ, कोल्हापूर ४१६०१२ उत्तरवादी

**जन माहिती अधिकारी** तथा प्राचार्य, न्यू कॉलेज, कोल्हापूर

| | | |
|---|---|---|
| १ | अपील क्रमांक | २४९७ / २०१० / कोल्हापूर |
| २ | सुनावणीची तारीख | दि.२७.९.२०११ |

**३. उपस्थित**

**अपीलकर्ता** श्री.मंदार मानसिंग पाटील
२७१, ए वॉर्ड, मरगाई गल्ली, शिवाजी पेठ, कोल्हापूर

**अपिलीय प्राधिकारी** तथा सचिव, श्री प्रिन्स शिवाजी मराठा बोर्डिंग हाऊस,
१०६१, ए वॉर्ड, शिवाजी पेठ, कोल्हापूर श्री.दत्तात्रय बाबुराव इंगवले

**जन माहिती अधिकारी** तथा प्राचार्य, न्यू कॉलेज, कोल्हापूर डॉ.पांडुरंग कृष्णा पाटील

| ४ | माहिती - मागणीच्या मूळ अर्जाची (जोडपत्र-अ) छायाप्रत सोबत जोडली आहे. |
|---|---|

## विवेचन

अपीलकर्ता, जन माहिती अधिकारी व अपिलीय प्राधिकारी यांनी आयोगासमोरील सुनावणीत खालीलप्रमाणे निवेदन केले :

अपीलकर्ता : पूर्ण वेळ शिक्षक कर्मचाऱ्यांची नावे, पत्ते, दूरध्वनी क्रमांक व वेतन आदी माहिती मागितली होती. परंतु ही माहिती वैयक्तिक असल्याच्या कारणावरून जन माहिती अधिकारी यानी नाकारली. जन माहिती अधिकारी व अपिलीय प्राधिकारी यांच्याबाबत माझ्याकडून अर्ज करताना चूक झाली होती. संबंधित माहिती वैयक्तिक स्वरूपाची नाही त्यामुळे ती मिळाली पाहिजे.

जन माहिती अधिकारी व अपिलीय प्राधिकारी : कर्मचाऱ्यांचे व्यक्तिगत निवासी पत्ते, दूरध्वनी, वेतन इ.माहिती जाहीर केल्यामुळे त्याना त्रास होऊ शकतो म्हणून अशी माहिती न देण्याचा निर्णय अधिनियमाच्या कलम ८(ज) प्रमाणे अपीलकर्त्यास कळविला.

अनुदानित शिक्षण संस्थेतील शिक्षकांचे नाव, वेतन व ते शिकवत असलेले विषय ही माहिती वैयक्तिक स्वरूपाची नाही. किंबहुना माहितीचा अधिकार अधिनियम, २००५ च्या कलम ४ अन्वये सार्वजनिक प्राधिकरणाने स्वयंस्फूर्तीने जाहीर करणे आवश्यक असलेली अशा स्वरूपाची ही माहिती आहे. संबंधित शिक्षकांचे निवासी पत्ते, दूरध्वनी क्रमांक इ.माहिती मात्र वैयक्तिक स्वरूपाची असून माहितीचा अधिकार अधिनियम, २००५ च्या कलम ११ नुसार त्रयस्थ पक्ष म्हणून त्यांच्या संमतीशिवाय ती देय ठरत नाही.

आयोगाचे आदेश पुढीलप्रमाणे :

## आदेश

(१) अपील निकाली काढण्यात येत आहे.

(२) अनुदानित शिक्षण संस्थेतील शिक्षक आदी सेवकांचे नाव, वेतन हा तपशील माहितीचा अधिकार अधिनियम, २००५ च्या कलम ४ अन्वये श्री प्रिन्स शिवाजी मराठा बोर्डिंग हाऊस या संस्थेने जाहीर करणे आवश्यक आहे. त्यानुसार पूर्तता करून, मात्र अपीलकर्त्याने मागणी

केलेले संबंधितांचे निवासी पत्ते, दूरध्वनी क्रमांक वगळता ऊर्वरित माहिती निःशुल्क पुरवून जन माहिती अधिकारी तथा सचिव, श्री प्रिन्स शिवाजी मराठा बोर्डिंग हाऊस, १०६१, ए वॉर्ड, शिवाजी पेठ, कोल्हापूर यानी दि.१५.१०.२०११ पर्यंत अनुपालन अहवाल आयोगाला सादर करावा.

**(विजय कुवळेकर)**
**राज्य माहिती आयुक्त,**
**पुणे खंडपीठ**

**पुणे**
**दि :- २८.९.२०११**

**राज्य माहिती आयुक्त, राज्य माहिती आयोग, महाराष्ट्र राज्य, पुणे खंडपीठ यांच्यासमोर**
**<u>माहितीचा अधिकार अधिनियम, २००५ च्या कलम १९ (३) अन्वये दाखल झालेले अपील</u>**

राज्य माहिती आयोग, पुणे खंडपीठ,
नवीन प्रशासकीय इमारत, चौथा मजला,
कौन्सिल हॉल समोर, पुणे ४११ ००१

श्री.जगन्नाथ मारूती संकपाळ
माले, ता.पन्हाळा, जि.कोल्हापूर — अपीलकर्ता

**विरुध्द**

**अपिलीय प्राधिकारी** तथा मुख्य अभियंता(बांधकाम विभाग),
जिल्हा परिषद, कोल्हापूर, जि.कोल्हापूर — उत्तरवादी

**जन माहिती अधिकारी** तथा उपअभियंता (बांधकाम विभाग),
पंचायत समिती, पन्हाळा, ता.पन्हाळा, जि.कोल्हापूर

| | | |
|---|---|---|
| १ | अपील क्रमांक | २४७७ / २०१० / कोल्हापूर |
| २ | सुनावणीची तारीख | दि.२७.९.२०११ |

**३. उपस्थित**

**अपिलीय प्राधिकारी** तथा मुख्य अभियंता(बांधकाम विभाग),
जिल्हा परिषद, कोल्हापूर, जि.कोल्हापूर प्रतिनिधी श्री.रामचंद्र सखाराम मांडे

**जन माहिती अधिकारी** तथा उपअभियंता (बांधकाम विभाग),
पंचायत समिती, पन्हाळा, ता.पन्हाळा, जि.कोल्हापूर श्री.सिताराम वासुदेव पाटील

| | |
|---|---|
| ४ | माहिती - मागणीच्या मूळ अर्जाची (जोडपत्र-अ) छायाप्रत सोबत जोडली आहे. |

## विवेचन

'चारही बाजू समान असणाऱ्या आकाराच्या जागेस चौरस म्हणतात, अशी माहिती आपणाकडून मिळाली. तेव्हा १०० चौरस फुटाच्या आकाराची जागा असेल तर त्याचे क्षेत्रफळ व लांबी-रूंदी किती होईल, याची माहिती खुलासेवार मिळावी,' अशी मागणी अपीलकर्ता श्री.जगन्नाथ मारूती संकपाळ यानी केली होती. जन माहिती अधिकारी तथा उपअभियंता (बांधकाम विभाग), पंचायत समिती, पन्हाळा, ता.पन्हाळा, जि.कोल्हापूर यानी दिलेल्या उत्तराने व अपिलीय प्राधिकाऱ्यांच्या निर्णयाने समाधान झाले नसल्याच्या कारणावरून त्यानी राज्य माहिती आयोगाकडे अपील केले आहे. मात्र नंतर नवीन माहिती मिळाल्यामुळे अपील निकाली ठेवण्यास आपली हरकत नाही, असे लेखी निवेदन अपीलकर्त्यानी दि.२३.९.२०११ च्या पत्रान्वये अपिलीय प्राधिकारी तथा मुख्य अभियंता(बांधकाम विभाग), जिल्हा परिषद, कोल्हापूर, जि.कोल्हापूर याना सादर केले. त्याची प्रत जन माहिती अधिकारी तथा उपअभियंता (बांधकाम विभाग), पंचायत समिती, पन्हाळा, ता.पन्हाळा, जि.कोल्हापूर यानी सुनावणीच्या वेळी आयोगाला सादर केली.

अपीलकर्त्याची मागणी माहितीचा अधिकार अधिनियम, २००५ च्या कलम २ मध्ये नमूद केलेल्या 'माहिती'च्या संज्ञेत येणारी नाही. तरीही जन माहिती अधिकारी व अपिलीय प्राधिकारी यांनी केलेली कार्यवाही योग्य आहे.

आयोगाचे आदेश पुढीलप्रमाणे :

## आदेश

अपील निकाली काढण्यात येत आहे.

**(विजय कुवळेकर)**
**राज्य माहिती आयुक्त,**
**पुणे खंडपीठ**

**पुणे**
**दि :- २८.९.२०११**

**राज्य माहिती आयुक्त, राज्य माहिती आयोग, महाराष्ट्र राज्य, पुणे खंडपीठ यांच्यासमोर**
**<u>माहितीचा अधिकार अधिनियम, २००५ च्या कलम १९ (३) अन्वये दाखल झालेले अपील</u>**

राज्य माहिती आयोग, पुणे खंडपीठ,
नवीन प्रशासकीय इमारत, चौथा मजला,
कौन्सिल हॉल समोर, पुणे ४११ ००१

श्री.राजेंद्र जयपाल कुमटाळे
तेरवाड, ता.शिरोळ, जि.कोल्हापूर — अपीलकर्ता

**विरुध्द**

**अपिलीय प्राधिकारी** तथा जिल्हा अधीक्षक, भूमी अभिलेख, कोल्हापूर
यांचे कार्यालय, कोल्हापूर — उत्तरवादी

**जन माहिती अधिकारी** तथा उपअधीक्षक, भूमी अभिलेख, शिरोळ,
ता.शिरोळ, जि.कोल्हापूर

| | | |
|---|---|---|
| १ | अपील क्रमांक | २४७२ / २०१० / कोल्हापूर |
| २ | सुनावणीची तारीख | दि.२७.९.२०११ |

**३. उपस्थित**

**अपीलकर्ता** श्री.राजेंद्र जयपाल कुमटाळे
तेरवाड, ता.शिरोळ, जि.कोल्हापूर

**अपिलीय प्राधिकारी** तथा जिल्हा अधीक्षक, भूमी अभिलेख, कोल्हापूर
यांचे कार्यालय, कोल्हापूर श्री.एस.डी.खामकर

**जन माहिती अधिकारी** तथा उपअधीक्षक, भूमी अभिलेख, शिरोळ, ता.शिरोळ, जि.कोल्हापूर
श्रीमती स्मिता साहिल शहा

| | |
|---|---|
| ४ | माहिती - मागणीच्या मूळ अर्जाची (जोडपत्र-अ) छायाप्रत सोबत जोडली आहे. |

## <u>विवेचन</u>

अपीलकर्ता, जन माहिती अधिकारी व अपिलीय प्राधिकारी यांनी आयोगापुढील सुनावणीत खालीलप्रमाणे निवेदन केले :

<u>अपीलकर्ता</u> : दोन रस्त्यांची रूंदी व पोटखराबा याबाबतची माहिती मागितली होती. परंतु रस्त्यांची रूंदी दिली नाही व पोटखराबा म्हणून जेवढी जमीन नमूद केलेली आहे ती योग्य वाटत नाही. त्याबाबतचा खुलासा होणे आवश्यक आहे. जन माहिती अधिकारी व अपिलीय प्राधिकारी यांनी पुढील अपील कोणाकडे करावयाचे याबाबतचा तपशील दिलेला नाही.

<u>जन माहिती अधिकारी</u> : अपीलकर्ता म्हणतात ते रस्ते नसून पाऊलवाट आहे. त्याची रूंदी नोंदविलेली नसते. अभिलेखानुसार पोटखराबा म्हणून जेवढी जमीन दर्शविली आहे तो तपशील अपीलकर्त्यास कळविला आहे. पोटखराबाच्या क्षेत्राबाबत अपीलकर्त्याची तक्रार असल्यास तो माहितीच्या अधिकारातील विषय नाही.

उभय बाजूंची निवेदने व सादर करण्यात आलेली कागदपत्रे विचारात घेता अपीलकर्त्याची तक्रार माहितीचा अधिकार अधिनियम, २००५ च्या कक्षेतील नाही. जन माहिती अधिकारी व अपिलीय प्राधिकारी यांनी पुढील अपिलाबाबतचा तपशील उत्तरात/अपिलाच्या निर्णयात नमूद करणे आवश्यक असल्याची समज तत्कालीन जन माहिती अधिकारी तथा उपअधीक्षक, भूमी अभिलेख, शिरोळ, ता.शिरोळ, जि.कोल्हापूर श्री.एस.व्ही.कुंभार व अपिलीय प्राधिकारी तथा जिल्हा अधीक्षक, भूमी अभिलेख, कोल्हापूर यांचे कार्यालय, कोल्हापूर श्री.एस.डी.खामकर यांना देण्यात येत आहे.

आयोगाचे आदेश पुढीलप्रमाणे :

## <u>आदेश</u>

अपील अमान्य करण्यात येत आहे.

**(विजय कुवळेकर)**
**राज्य माहिती आयुक्त,**
**पुणे खंडपीठ**

**पुणे**
**दि :- २८.९.२०११**

**राज्य माहिती आयुक्त, राज्य माहिती आयोग, महाराष्ट्र राज्य, पुणे खंडपीठ यांच्यासमोर**
**<u>माहितीचा अधिकार अधिनियम, २००५ च्या कलम १९ (३) अन्वये दाखल झालेले अपील</u>**

राज्य माहिती आयोग, पुणे खंडपीठ,
नवीन प्रशासकीय इमारत, चौथा मजला,
कौन्सिल हॉल समोर, पुणे ४११ ००१

श्री.सुधाकर भिकाजी भागवत
समर्थ बंगलो, प्लॉट नं.३८३, १२ वी गल्ली, राजारामपुरी (Ext),
भोपळे चाळीच्या मागे, कोल्हापूर ४१५००८ — अपीलकर्ता

**विरुध्द**

**अपिलीय प्राधिकारी** तथा अप्पर पोलीस अधीक्षक, सांगली — उत्तरवादी

**जन माहिती अधिकारी** तथा पोलीस उपअधीक्षक, मुख्यालय,
विश्रामबाग, जि.सांगली

| | | |
|---|---|---|
| १ | अपील क्रमांक | २४९९ / २०१० / कोल्हापूर |
| २ | सुनावणीची तारीख | दि.२७.९.२०११ |

**३. उपस्थित**

**अपिलीय प्राधिकारी** तथा अप्पर पोलीस अधीक्षक, सांगली
डॉ.दिगंबर पांडुरंग प्रधान

**जन माहिती अधिकारी** तथा पोलीस उपअधीक्षक, मुख्यालय,
विश्रामबाग, जि.सांगली श्री.के.एन.कारंडे

| | |
|---|---|
| ४ | माहिती - मागणीच्या मूळ अर्जाची (जोडपत्र-अ) छायाप्रत सोबत जोडली आहे. |

## विवेचन

विशिष्ट संदर्भात नियमानुसार केल्या जाणाऱ्या कार्यवाहीबाबत सर्वसाधारण स्वरूपाची माहिती अपीलकर्ता श्री.सुधाकर भिकाजी भागवत यानी मागितली होती. त्यांच्या दि.१६.७.२०१० च्या अर्जाला जन माहिती अधिकारी तथा पोलीस उपअधीक्षक, मुख्यालय, विश्रामबाग, जि.सांगली यानी दि.१९.७.२०१० च्या पत्रान्वये उत्तर दिले. त्यानी दिलेल्या माहितीने समाधान न झाल्याने अपिलीय प्राधिकारी यांच्याकडे त्यानी अपील केले. अपिलीय प्राधिकाऱ्यानी पुन्हा माहिती देण्याचे आदेश दिले. त्यानुसार पुन्हा माहिती पुरविण्यात आली, असे प्रतिपादन पोलीस उपअधीक्षक, मुख्यालय, विश्रामबाग, जि.सांगली श्री.के.एन.कारंडे व अप्पर पोलीस अधीक्षक, सांगली डॉ.दिगंबर पांडुरंग प्रधान यानी केले. त्यानी केलेली कार्यवाही रास्त आहे.

आयोगाचे आदेश पुढीलप्रमाणे :

## आदेश

अपील अमान्य करण्यात येत आहे.

**(विजय कुवळेकर)**
**राज्य माहिती आयुक्त,**
**पुणे खंडपीठ**

**पुणे**
**दि :- २८.९.२०११**

**राज्य माहिती आयुक्त, राज्य माहिती आयोग, महाराष्ट्र राज्य, पुणे खंडपीठ यांच्यासमोर**
**माहितीचा अधिकार अधिनियम, २००५ च्या कलम १९ (३) अन्वये दाखल झालेले अपील**

राज्य माहिती आयोग, पुणे खंडपीठ,
नवीन प्रशासकीय इमारत, चौथा मजला,
कौन्सिल हॉल समोर, पुणे ४११ ००१

श्री.किरण मान्नाप्पा मांडवकर
घर नं.९९७, बी वॉर्ड, जैन गल्ली, रविवार पेठ, कोल्हापूर-१२ अपीलकर्ता

**विरुध्द**

**अपिलीय प्राधिकारी** तथा उपआयुक्त क्र.(II),
कोल्हापूर महानगरपालिका, कोल्हापूर उत्तरवादी

**जन माहिती अधिकारी** तथा कामगार अधिकारी, कोल्हापूर महानगरपालिका, कोल्हापूर

| | | |
|---|---|---|
| १ | अपील क्रमांक | २५०० / २०१० / कोल्हापूर |
| २ | सुनावणीची तारीख | दि.२७.९.२०११ |

**३. उपस्थित**

**अपीलकर्ता** श्री.किरण मान्नाप्पा मांडवकर
घर नं.९९७, बी वॉर्ड, जैन गल्ली, रविवार पेठ, कोल्हापूर-१२

**अपिलीय प्राधिकारी** तथा उपआयुक्त क्र.(II),
कोल्हापूर महानगरपालिका, कोल्हापूर श्री.ओमप्रकाश दिवटे

**जन माहिती अधिकारी** तथा कामगार अधिकारी, कोल्हापूर महानगरपालिका, कोल्हापूर
प्रतिनिधी श्री.ओमप्रकाश दिवटे

| | |
|---|---|
| ४ | माहिती - मागणीच्या मूळ अर्जाची (जोडपत्र-अ) छायाप्रत सोबत जोडली आहे. |

## विवेचन

अपीलकर्ता, जन माहिती अधिकारी व अपिलीय प्राधिकारी यांनी आयोगासमोरील सुनावणीत खालीलप्रमाणे निवेदन केले :

अपीलकर्ता : सन २००६ मध्ये कोल्हापूर महानगरपालिकेने मान्य केलेल्या ९९२ रोजंदारी कर्मचाऱ्यांच्या यादीत ९६८ क्रमांकावर माझे नाव आहे. सन १९९० पासून रोजंदारी कर्मचारी म्हणून सार्वजनिक बांधकाम विभागाकडे मी काम करीत असूनही रोजंदारी यादीतून मला वगळण्यात आले. ते का वगळले? याची माहिती दिली नाही. त्यामुळे कामापासून मला वंचित रहावे लागत आहे व न्यायालयात पुरावा दाखल करता येत नाही.

अपिलीय प्राधिकारी : जन माहिती अधिकारी यानी अपीलकर्त्यास उत्तर दिले. मात्र अपीलकर्त्याच्या मागणीनुसार जुन्या कागदपत्रांमध्ये रोजंदारी कर्मचाऱ्याला का वगळले अशा स्वरूपाच्या नोंदी असत नाहीत. तसेच अशी कारणे माहितीच्या अधिकारात देता येत नाहीत.

अपीलकर्त्याची तक्रार माहितीचा अधिकार अधिनियम, २००५ च्या कक्षेतील नाही. मात्र रोजंदारी कर्मचारी यादी करण्याबाबतच्या कार्यवाहीची व अनुषंगिक कागदपत्रांची पाहणी करून आवश्यक असलेल्या कागदपत्रांच्या प्रती अपीलकर्ता प्राप्त करून घेऊ शकतात. जन माहिती अधिकारी यानी अपीलकर्त्यास आवश्यक असल्यास, असे अभिलेख अवलोकनासाठी उपलब्ध करून देणे आवश्यक आहे.

आयोगाचे आदेश पुढीलप्रमाणे :

## आदेश

अपील अमान्य करण्यात येत आहे.

**(विजय कुवळेकर)**
**राज्य माहिती आयुक्त,**
**पुणे खंडपीठ**

**पुणे**
**दि :- २८.९.२०११**

**राज्य माहिती आयुक्त, राज्य माहिती आयोग, महाराष्ट्र राज्य, पुणे खंडपीठ यांच्यासमोर**
**माहितीचा अधिकार अधिनियम, २००५ च्या कलम १९ (३) अन्वये दाखल झालेले अपील**

राज्य माहिती आयोग, पुणे खंडपीठ,
नवीन प्रशासकीय इमारत, चौथा मजला,
कौन्सिल हॉल समोर, पुणे ४११ ००१

श्री.दिपक शंकरराव नवनाळे
वॉर्ड नं.७, घर नं.७०६, वेताळपेठ, इचलकरंजी,
ता.हातकणंगले, जि.कोल्हापूर अपीलकर्ता

**विरुध्द**

**अपिलीय प्राधिकारी** तथा संचालक, वस्त्रोद्योग संचालनालय, नागपूर उत्तरवादी

**जन माहिती अधिकारी** तथा सहाय्यक सचिव, चौंडेश्वरी सहकारी
सूत गिरणी लि.,इचलकरंजी, मिलसाईट गट नं.३२४,
कोल्हापूर-सांगली रोड, धरणगुत्ती, पो.चिपरी, ता.शिरोळ, जि.कोल्हापूर

| | | |
|---|---|---|
| १ | अपील क्रमांक | २४७३ / २०१० / कोल्हापूर |
| २ | सुनावणीची तारीख | दि. २७.९.२०११ |
| ४ | माहिती - मागणीच्या मूळ अर्जाची (जोडपत्र-अ) छायाप्रत सोबत जोडली आहे. | |

## विवेचन

अपीलकर्ता श्री.दिपक शंकरराव नवनाळे यानी चौंडेश्वरी सहकारी सूत गिरणी लि.,इचलकरंजी, मिलसाईट गट नं.३२४, कोल्हापूर-सांगली रोड, धरणगुत्ती, पो.चिपरी, ता.शिरोळ, जि.कोल्हापूर या संस्थेच्या सन २००५ ते २०१० अखेरपर्यंतच्या लेखा तपासणी अहवालाच्या प्रती दोन अर्जाद्वारे मागितल्या होत्या. त्या त्याना पुरविण्यात आल्याचे कार्यकारी संचालक, चौंडेश्वरी सहकारी सूत गिरणी

लि.,इचलकरंजी, मिलसाईट गट नं.३२४, कोल्हापूर-सांगली रोड, धरणगुत्ती, पो.चिपरी, ता.शिरोळ, जि.कोल्हापूर यानी नकला मिळाल्याची अपीलकर्त्याची पोहोच असलेल्या पत्राच्या प्रतीसह दि.२०.९.२०११ च्या पत्रान्वये लेखी निवेदनाद्वारे आयोगाला कळविले.

आयोगाचे आदेश पुढीलप्रमाणे :

**आदेश**

अपील निकाली काढण्यात येत आहे.

**(विजय कुवळेकर)**
**राज्य माहिती आयुक्त,**
**पुणे खंडपीठ**

**पुणे**
**दि :- २८.९.२०११**

**राज्य माहिती आयुक्त, राज्य माहिती आयोग, महाराष्ट्र राज्य, पुणे खंडपीठ यांच्यासमोर**
**माहितीचा अधिकार अधिनियम, २००५ च्या कलम १९ (३) अन्वये दाखल झालेले अपील**

राज्य माहिती आयोग, पुणे खंडपीठ,
नवीन प्रशासकीय इमारत, चौथा मजला,
कौन्सिल हॉल समोर, पुणे ४११ ००१

श्री.शशिकांत तुकाराम हावळ
मु.पो.सोळांकूर, ता.राधानगरी, जि.कोल्हापूर — अपीलकर्ता

**विरुध्द**

**अपिलीय प्राधिकारी** तथा अप्पर पोलीस अधीक्षक,
पोलीस अधीक्षक कार्यालय, कोल्हापूर — उत्तरवादी

**जन माहिती अधिकारी** तथा पोलीस उपअधीक्षक, शाहूवाडी विभाग,
सोन्या मारूती चौक, कोल्हापूर

| | | |
|---|---|---|
| १ | अपील क्रमांक | २३३८ / २०१० / कोल्हापूर |
| २ | सुनावणीची तारीख | दि.२७.९.२०११ |

**३. उपस्थित**

**अपिलीय प्राधिकारी** तथा अप्पर पोलीस अधीक्षक, पोलीस अधीक्षक कार्यालय, कोल्हापूर
श्री.संजय डी.येनपुरे

**जन माहिती अधिकारी** तथा पोलीस उपअधीक्षक, शाहूवाडी विभाग,
सोन्या मारूती चौक, कोल्हापूर श्री.संजय यशवंत जाधव

| | |
|---|---|
| ४ | माहिती - मागणीच्या मूळ अर्जाची (जोडपत्र-अ) छायाप्रत सोबत जोडली आहे. |

## विवेचन

एप्रिल २००२ मध्ये आपल्याविरूध्द राधानगरी पोलीस ठाण्यात नोंद झालेला गुन्हा व त्या अनुषंगाने झालेले जाबजबाब इ. कागदपत्रांच्या प्रती मागितल्या होत्या. परंतु यातील अनेक कागदपत्रे पोलीस ठाण्याच्या अभिलेखावर दाखल व उपलब्ध नसल्याचे व अन्य कागदपत्रे दोषारोप पत्रासोबत न्यायालयात दाखल करण्यात आली असल्यामुळे न्यायालयाकडून घ्यावीत, असे उत्तर जन माहिती अधिकारी यानी दिले. कागदपत्रे दाखल असतानाही नसल्याचे कळवून खोटी व दिशाभूल करणारी माहिती जन माहिती अधिकारी यानी दिली व अपिलीय प्राधिकारी यानी याची दखल घेतली नाही, अशी तक्रार अपीलकर्ता श्री.शशिकांत तुकाराम हावळ यानी राज्य माहिती आयोगाकडील अपील अर्जात केली आहे.

अपीलकर्ता यांच्या दि.२.१.२०१० रोजीच्या अर्जाला दि.३०.१.२०१० च्या पत्रान्वये उत्तर दिले. संबंधित दाव्यातील कागदपत्रांच्या प्रती सरकारी अभियोक्ता यांच्याकडील कागदपत्रांमधून प्राप्त करून घेऊन अपीलकर्त्यास पुरविल्या. संबंधित विषय सन २००२ मधील असून तक्रारी अर्ज व अन्य कागदपत्रांच्या जतनाची मुदत एक वर्षाची आहे. नष्ट केलेल्या कागदपत्रांची नाश रजिस्टरला नोंद आहे, असे निवेदन जन माहिती अधिकारी तथा पोलीस उपअधीक्षक, शाहूवाडी विभाग, सोन्या मारूती चौक, कोल्हापूर श्री.संजय यशवंत जाधव यानी केले.

अपीलकर्ता यानी ग्रामसेवकाला मारहाण केल्याचे हे प्रकरण असून पोलीस ठाण्याकडील उपलब्ध कागदपत्रांबरोबरच सरकारी अभियोक्ताकडून कागदपत्रे मागवून शक्य तेवढी माहिती अपीलकर्त्यास पुरविली. अन्य कागदपत्रे उपलब्ध नसल्यामुळे त्याच्या प्रती देता येत नाहीत, असे निवेदन अपिलीय प्राधिकारी तथा

उभय बाजूंची निवेदने व सादर करण्यात आलेली कागदपत्रे विचारात घेता आयोगाचे आदेश पुढीलप्रमाणे :

## आदेश

(१) अपील निकाली काढण्यात येत आहे.

(२) अपीलकर्त्याच्या मागणीशी संबंधित कागदपत्रांच्या नाश रजिस्टरमधील नोंदींची नक्कल जन माहिती अधिकारी तथा पोलीस उपअधीक्षक, शाहूवाडी विभाग, सोन्या मारूती चौक, कोल्हापूर यानी आयोगाला सादर करावी व त्याची प्रत अपीलकर्त्यास पुरवावी. दि१५.१०.२०११ पर्यंत ही कार्यवाही पूर्ण करण्यात येऊन अनुपालन अहवाल आयोगाला सादर करावा.

**(विजय कुवळेकर)**
**राज्य माहिती आयुक्त,**
**पुणे खंडपीठ**

**पुणे**
**दि :- २८.९.२०११**

**राज्य माहिती आयुक्त, राज्य माहिती आयोग, महाराष्ट्र राज्य, पुणे खंडपीठ यांच्यासमोर**
**माहितीचा अधिकार अधिनियम, २००५ च्या कलम १९ (३) अन्वये दाखल झालेले अपील**

राज्य माहिती आयोग, पुणे खंडपीठ,
नवीन प्रशासकीय इमारत, चौथा मजला,
कौन्सिल हॉल समोर, पुणे ४११ ००१

श्री.संग्राम तुकाराम पाटील
द्वारा ग्लोबल इन्फोसिस लर्निंग, शाहू मिल चौक, कोल्हापूर अपीलकर्ता

**विरुध्द**

**अपिलीय प्राधिकारी** तथा अप्पर पोलीस अधीक्षक, कोल्हापूर उत्तरवादी

**जन माहिती अधिकारी** तथाउपविभागीय पोलीस अधिकारी, शहर विभाग, कोल्हापूर

| | | |
|---|---|---|
| १ | अपील क्रमांक | २३५२ / २०१० / कोल्हापूर |
| २ | सुनावणीची तारीख | दि.२७.९.२०११ |

**३. उपस्थित**

**अपिलीय प्राधिकारी** तथा अप्पर पोलीस अधीक्षक, कोल्हापूर श्री.संजय डी.येनपुरे

| | |
|---|---|
| ४ | माहिती - मागणीच्या मूळ अर्जाची (जोडपत्र-अ) छायाप्रत सोबत जोडली आहे. |

## विवेचन

अपीलकर्ता व अपिलीय प्राधिकारी यांनी आयोगासमोरील सुनावणीत खालीलप्रमाणे निवेदन केले :

अपीलकर्ता : न्यायालयाच्या आदेशानुसार पोलिसांनी केलेल्या तपासाबाबतच्या कागदपत्रांच्या प्रती जन माहिती अधिकारी यांच्याकडे मागितल्या होत्या. संबंधित कागदपत्रे न्यायालयात दाखल करण्यात आली असल्याचे जन माहिती अधिकारी यानी कळविले. परंतु न्यायालयाकडील कागदपत्रांच्या प्रती प्राप्त करून घेतल्या असता त्यात जन माहिती अधिकाऱ्यानी दिलेल्या उत्तरानुसार कागदपत्रे आढळली नाहीत. पोलिसांनी तपास करताना सर्व कागदपत्रे मिळवून व सखोल चौकशी करून अहवाल

सादर केलेला नाही. त्यामुळे त्यानी न्यायालयाला सादर केलेल्या अहवालात योग्य निष्कर्ष काढलेले नाहीत. तशा कागदपत्रांसह पुरावा दाखल न करता आल्यामुळे न्यायालयाचा निर्णय माझ्याविरूध्द गेला.

अपिलीय प्राधिकारी : अपीलकर्त्यानी मागणी केल्यानुसार चौकशी अहवालाची प्रत व पोलिसांकडे उपलब्ध असलेली माहिती देण्यात आली. संबंधित प्रकरणी अपीलकर्ता स्वतःच फिर्यादी असून न्यायालयातील कागदपत्रांच्या नकला ते न्यायालयात प्राप्त करून घेऊ शकतात. मात्र महानगरपालिकेकडील कागदपत्रांच्या प्रती ते आमच्याकडे मागत असून महापालिकेने त्या कागदपत्रांच्या प्रती आम्हाला पुरविलेल्या नाहीत. त्यामुळे या प्रती पोलिसांकडून देणे शक्य नाही.

उभय बाजूंची निवेदने व सादर करण्यात आलेली कागदपत्रे विचारात घेता संबंधित प्रकरणात तपास योग्य प्रकारे झाला नसल्याची व पोलिसांचा चौकशी अहवाल चुकीचा असल्याची अपीलकर्त्याची तक्रार हा माहितीचा अधिकार अधिनियम, २००५ अंतर्गत निर्णयाचा विषय नाही. अपीलकर्त्यानी मागणी केलेली कागदपत्रे महानगरपालिकेने पोलिसांना सादर केली नाहीत, असे अपिलीय प्राधिकाऱ्यांचे म्हणणे आहे. त्या कागदपत्रांबाबत तशा स्वरूपाचे पत्र अपिलीय प्राधिकारी यानी अपीलकर्त्यास द्यावे, असे मौखिक आदेश आयोगाने सुनावणीच्या वेळी दिले.

आयोगाचे आदेश पुढीलप्रमाणे :

## आदेश

अपील निकाली काढण्यात येत आहे.

**(विजय कुवळेकर)**
**राज्य माहिती आयुक्त,**
**पुणे खंडपीठ**

**पुणे**
**दि :- २८.९.२०११**

**राज्य माहिती आयुक्त, राज्य माहिती आयोग, महाराष्ट्र राज्य, पुणे खंडपीठ यांच्यासमोर**
**माहितीचा अधिकार अधिनियम, २००५ च्या कलम १९ (३) अन्वये दाखल झालेले अपील**

राज्य माहिती आयोग, पुणे खंडपीठ,
नवीन प्रशासकीय इमारत, चौथा मजला,
कौन्सिल हॉल समोर, पुणे ४११ ००१

श्री.अशोक सदाशिव दळवी
मु.पो.कागल, प्लॉट नं.१७७, जयसिंगराव पार्क, ता.कागल, जि.कोल्हापूर अपीलकर्ता

**विरुध्द**

**अपिलीय प्राधिकारी** तथा सह जिल्हा निबंधक वर्ग-१,
मध्यवर्ती प्रशासकीय इमारत, कोल्हापूर उत्तरवादी

**जन माहिती अधिकारी** तथा दुय्यम निबंधक श्रेणी-१,
तहसील कार्यालय आवार, कागल, ता.कागल, जि.कोल्हापूर

| | | |
|---|---|---|
| १ | अपील क्रमांक | २४७० / २०१० / कोल्हापूर |
| २ | सुनावणीची तारीख | दि.२७.९.२०११ |
| **३.** | **उपस्थित** | |

**अपिलीय प्राधिकारी** तथा सह जिल्हा निबंधक वर्ग-१, मध्यवर्ती प्रशासकीय इमारत, कोल्हापूर श्री.सी.बी.भुरकुंडे

**जन माहिती अधिकारी** तथा दुय्यम निबंधक श्रेणी-१, तहसील कार्यालय आवार, कागल, ता.कागल, जि.कोल्हापूर श्री.एस.एस.कोळी

| | |
|---|---|
| ४ | माहिती - मागणीच्या मूळ अर्जाची (जोडपत्र-अ) छायाप्रत सोबत जोडली आहे. |

## विवेचन

एका जमीन खरेदी-विक्री प्रकरणातील नोंदणीकृत दस्तासोबतच्या कागदपत्रांची व जिल्हाधिकाऱ्यानी दिलेल्या परवानगी आदेशाच्या प्रतींची मागणी अपीलकर्ता श्री.अशोक सदाशिव दळवी यानी केली होती. मूळ दस्ताव्यतिरिक्तच्या कागदपत्रांच्या प्रती त्याना पुरविल्या. नोंदणीकृत दस्ताची

संपूर्ण नक्कल देण्याची तरतूद नोंदणी कायद्यात असून त्यासाठी शासनाने पूर्वनिर्धारित केलेल्या पध्दतीनुसार स्वतंत्र अर्ज करून व त्यानुसार शुल्क भरून प्रती प्राप्त करून घेण्याबाबत अपीलकर्त्यास कळविले. परंतु त्यानुसार त्यानी पूर्तता केली नाही. त्यामुळे प्रती देता आल्या नाहीत. असे प्रतिपादन जन माहिती अधिकारी तथा दुय्यम निबंधक श्रेणी-१, तहसील कार्यालय आवार, कागल, ता.कागल, जि.कोल्हापूर श्री.एस.एस.कोळी व अपिलीय प्राधिकारी तथा सह जिल्हा निबंधक वर्ग-१, मध्यवर्ती प्रशासकीय इमारत, कोल्हापूर श्री.सी.बी.भुरकुंडे यानी केले.

उभय बाजूंची निवेदने व सादर करण्यात आलेली कागदपत्रे विचारात घेता

जन माहिती अधिकारी व अपिलीय प्राधिकारी यानी केलेली कार्यवाही योग्य आहे. तथापि संबंधित नकलांसाठी अपीलकर्त्याकडून स्वतंत्र अर्जाची मागणी न करता माहितीच्या अधिकारातील अर्ज हाच संबंधित दस्तांच्या नकलेसाठी केलेला अर्ज मानून अशा नकलेसाठी शासनाने पूर्वनिर्धारित केलेले शुल्क आकारून अपीलकर्त्यास नकला देणे उचित ठरेल.

आयोगाचे आदेश पुढीलप्रमाणे :

**आदेश**

(१) अपील निकाली काढण्यात येत आहे.

(२) अपीलकर्त्यांनी मागणी केलेल्या दस्ताच्या नकला त्याना आवश्यक असल्यास नोंदणी कायद्यानुसार निर्धारित केलेले शुल्क आकारून जन माहिती अधिकारी तथा दुय्यम निबंधक श्रेणी-१, तहसील कार्यालय आवार, कागल, ता.कागल, जि.कोल्हापूर यानी पुरवाव्यात.

**(विजय कुवळेकर)**
**राज्य माहिती आयुक्त,**
**पुणे खंडपीठ**

**पुणे**
**दि :- २६.९.२०११**

**राज्य माहिती आयुक्त, राज्य माहिती आयोग, महाराष्ट्र राज्य, पुणे खंडपीठ यांच्यासमोर**
**माहितीचा अधिकार अधिनियम, २००५ च्या कलम १९ (३) अन्वये दाखल झालेले अपील**

राज्य माहिती आयोग, पुणे खंडपीठ,
नवीन प्रशासकीय इमारत, चौथा मजला,
कौन्सिल हॉल समोर, पुणे ४११ ००१

श्री.मुकुंद दत्तात्रय घोलप
१२, रामतिलक सेक्टर नं.१, साई चौक, इंद्रायणीनगर, भोसरी, पुणे-३९ अपीलकर्ता

**विरुध्द**

**अपिलीय प्राधिकारी** तथा सचिव, विभागीय जाती प्रमाणपत्र पडताळणी
समिती क्र.३, पुणे विभाग, पुणे, पीएमटी बिल्डिंग क्र.३, स्वारगेट, पुणे-३७ उत्तरवादी

**जन माहिती अधिकारी** तथा संशोधन अधिकारी, विभागीय जाती प्रमाणपत्र पडताळणी
समिती क्र.३, पुणे विभाग, पुणे, पीएमटी बिल्डिंग क्र.३, स्वारगेट, पुणे-३७

| | | |
|---|---|---|
| १ | अपील क्रमांक | २९८३ / २०१० / पुणे |
| २ | सुनावणीची तारीख | दि.२९.६.२०११ |

**३. उपस्थित**

**अपीलकर्ता** श्री.मुकुंद दत्तात्रय घोलप
१२, रामतिलक सेक्टर नं.१, साई चौक, इंद्रायणीनगर, भोसरी, पुणे-३९

**अपिलीय प्राधिकारी** तथा सचिव, विभागीय जाती प्रमाणपत्र पडताळणी समिती क्र.३, पुणे विभाग, पुणे, पीएमटी बिल्डिंग क्र.३, स्वारगेट, पुणे श्री.भिमराव खंडाळे

**जन माहिती अधिकारी** तथा संशोधन अधिकारी, विभागीय जाती प्रमाणपत्र पडताळणी समिती क्र.३, पुणे विभाग, पुणे, पीएमटी बिल्डिंग क्र.३, स्वारगेट, पुणे श्रीमती मनीषा फुले

| | |
|---|---|
| ४ | माहिती - मागणीच्या मूळ अर्जाची (जोडपत्र-अ) छायाप्रत सोबत जोडली आहे. |

# <u>विवेचन</u>

अपीलकर्ता, जन माहिती अधिकारी व अपिलीय प्राधिकारी यांनी आयोगासमोरील सुनावणीत खालीलप्रमाणे निवेदन केले :

<u>अपीलकर्ता</u> : पिंपरी चिंचवड महानगरपालिकेतील अभियता श्री.जयंत मधुकर शेट्टी यानी जात पडताळीसाठी केलेल्या अर्जासोबतच्या कागदपत्रांच्या प्रती मागितल्या होत्या. परंतु त्याबाबतची माहिती मिळाली नाही. अपिलीय प्राधिकारी यानी अपिलाची दखल घेतली नाही.

<u>जन माहिती अधिकारी व अपिलीय प्राधिकारी</u> : अपीलकर्त्यानी त्रयस्थ व्यक्तीच्या जात पडताळणीसंबंधी माहिती मागितली होती. ती देणे शक्य नाही. अपीलकर्त्यानी केलेले प्रथम अपील अपीलकर्त्यांकडे पोहोच असली तरी कार्यालयाकडे उपलब्ध नसल्यामुळे दखल घेता आली नाही. जात पडताळीचे मोठ्या प्रमाणावरील काम व त्याबाबत सादर होणारी कागदपत्रे, अपुरा कर्मचारी वर्ग व अन्य पदाचा अतिरिक्त कार्यभार यामुळे अपीलकर्त्यास विहित मुदतीत त्याबाबत कळविता आले नाही, असे लेखी निवेदन जन माहिती अधिकारी यांच्याकडील कनिष्ठ लिपिक श्री.एम.बी.वीरकायदे यानी सादर केले.

अपीलकर्त्यानी त्रयस्थ व्यक्तीच्या संदर्भात माहिती मागितली असून त्यात सार्वजनिक हिताचा कोणता संदर्भ आहे हे स्पष्ट केलेले नाही. सद्यस्थितीत अशा स्वरूपाची वैयक्तिक माहिती देय ठरत नाही. मात्र जन माहिती अधिकाऱ्यानी अपीलकर्त्यास तसे त्वरित विहित मुदतीत कळविणे आवश्यक आहे याची समज जन माहिती अधिकारी तथा संशोधन अधिकारी, विभागीय जाती प्रमाणपत्र पडताळणी समिती क्र.३, पुणे विभाग, पुणे, पीएमटी बिल्डिंग क्र.३, स्वारगेट, पुणे श्रीमती मनीषा फुले याना देण्यात येत आहे.

आयोगाचे आदेश पुढीलप्रमाणे :

## **आदेश**

अपील निकाली काढण्यात येत आहे.

**(विजय कुवळेकर)**
**राज्य माहिती आयुक्त,**
**पुणे खंडपीठ**

**पुणे**
**दि :- २८.९.२०११**

**राज्य माहिती आयुक्त, राज्य माहिती आयोग, महाराष्ट्र राज्य, पुणे खंडपीठ यांच्यासमोर**
**माहितीचा अधिकार अधिनियम,२००५ च्या कलम १९ (३) अन्वये दाखल झालेले अपील**

राज्य माहिती आयोग, पुणे खंडपीठ,
नवीन प्रशासकीय इमारत, चौथा मजला,
कौन्सिल हॉल समोर, पुणे ४११ ००१

श्री. सुनिल मधुकर जगताप
२११, मुंढवा, पुणे ४११ ०३६ अपीलकर्ता

**विरुध्द**

**अपिलीय प्राधिकारी** तथा शिक्षणप्रमुख,
शिक्षण मंडळ कार्यालय, पुणे महानगरपालिका,
कै. भाऊसाहेब शिरोळे भवन, शिवाजीनगर, पुणे ४११ ००५

उत्तरवादी

**जन माहिती अधिकारी** तथा उपशिक्षणप्रमुख,
शिक्षण मंडळ कार्यालय, पुणे महानगरपालिका,
कै. भाऊसाहेब शिरोळे भवन, शिवाजीनगर, पुणे ४११ ००५

| | | |
|---|---|---|
| १ | अपील क्रमांक | ३०२०/२०१०/पुणे |
| २ | सुनावणीची तारीख | दि. २९/६/२०११ |

**३. उपस्थित**

**अपीलकर्ता** श्री. सुनिल मधुकर जगताप , २११, मुंढवा, पुणे ४११ ०३६

**अपिलीय प्राधिकारी** तथा शिक्षणप्रमुख,
शिक्षण मंडळ कार्यालय, पुणे महानगरपालिका, कै.भाऊसाहेब शिरोळे भवन, शिवाजीनगर, पुणे यांचे वतीने श्री.संभाजी विठ्ठल जाधव

**जन माहिती अधिकारी** तथा उपशिक्षणप्रमुख,
शिक्षण मंडळ कार्यालय, पुणे महानगरपालिका,
कै. भाऊसाहेब शिरोळे भवन, शिवाजीनगर, पुणे श्री. धनंजय मनोहर परदेशी

| | |
|---|---|
| ४ | माहिती - मागणीच्या मूळ अर्जाची (जोडपत्र-अ) छायाप्रत सोबत जोडली आहे. |

## विवेचन

आयोगापुढील सुनावणीत अपीलकर्ता, जन माहिती अधिकारी व अपिलीय प्राधिकारी यांनी पुढीलप्रमाणे निवेदन केले :

अपीलकर्ता- पुणे महानगरपालिकेच्या शिक्षणमंडळातील रखवालदार, शिपाई यांच्या भरती-बाबतची माहिती मागितली होती. या भरतीला शासन मान्यता होती काय, नसल्यास शासनाचे बंदी आदेश डावलून भरती केली गेली काय अशी विचारणा केली होती. परिपूर्ण माहिती मिळाली नाही व अपिलाचा निर्णय अपिलीय प्राधिकारी यानी दिला नाही.

अपिलीय प्राधिकारी व जन माहिती अधिकारी - कार्यालयातील समन्वयातील त्रृटींमुळे अपीलकर्त्यांच्या मूळ अर्जावर व प्रथम अपिलावर त्वरित कार्यवाही झाली नाही. संकलित करुन माहिती देण्यास अवधी लागणार असल्याची कल्पना अपीलकर्त्यास दिली होती व त्यानी ती मान्य केली होती. तथापि संबंधित नोकरभरती रद्द करण्यात आली असल्यामुळे त्या संबंधित अनुषंगिक माहिती अपीलकर्त्यास देता येणार नाही. अपिलाचा निर्णय दिला, परंतु तो अपीलकर्त्यास कळविण्यास विलंब झ ाला, असे प्रतिपादन व याच आशयाचे लेखी निवेदन अपिलीय प्राधिकारी श्री.संभाजी विठ्ठल जाधव यानी सादर केले.

माहिती-मागणीच्या अर्जावरील कार्यवाही व प्रथम अपिलाच्या निर्णयाबाबत माहितीचा अधिकार अधिनियम, २००५ मध्ये नमूद केलेल्या विहित मुदतीत कार्यवाही होणे आवश्यक आहे, याची समज जन माहिती अधिकारी श्री. धनंजय मनोहर परदेशी व अपिलीय प्राधिकारी श्री. संभाजी विठ्ठल जाधव याना देण्यात येत आहे.

आयोगाचे आदेश पुढीलप्रमाणे :

## आदेश

अपील निकाली काढण्यात येत आहे.

**(विजय कुवळेकर)**
**राज्य माहिती आयुक्त,**
**पुणे खंडपीठ**

**पुणे**
**दि :- २६.९.२०११**

**राज्य माहिती आयुक्त, राज्य माहिती आयोग, महाराष्ट्र राज्य, पुणे खंडपीठ यांच्यासमोर**
**माहितीचा अधिकार अधिनियम,२००५ च्या कलम १९ (३) अन्वये दाखल झालेले अपील**

राज्य माहिती आयोग, पुणे खंडपीठ,
नवीन प्रशासकीय इमारत, चौथा मजला,
कौन्सिल हॉल समोर, पुणे ४११ ००१

श्री. अरविंद पांडुरंग कर्णिक
सी-१४, हिल व्हयू रेसिडेन्सी,
२८८, बाणेर, पुणे ४११ ०४५ अपीलकर्ता

**विरुध्द**

**अपिलीय प्राधिकारी** तथा कार्यकारी अभियंता,
बांधकाम नियंत्रा व विकास योजना विभाग,
झोन क्र. ३, पुणे महानगरपालिका, पुणे ४११ ००५

उत्तरवादी

**जन माहिती अधिकारी** तथा उपअभियंता,
बांधकाम नियंत्रा व विकास योजना विभाग,
झोन क्र. ३, पुणे महानगरपालिका, पुणे ४११ ००५

| | | |
|---|---|---|
| १ | अपील क्रमांक | ३१५८/२०१०/पुणे |
| २ | सुनावणीची तारीख | दि. २९/६/२०११ |

**३. उपस्थित**

**अपीलकर्ता** श्री. अरविंद पांडुरंग कर्णिक
सी-१४, हिल व्हयू रेसिडेन्सी, २८८, बाणेर, पुणे ४११ ०४५

**अपिलीय प्राधिकारी** तथा कार्यकारी अभियंता,
बांधकाम नियंत्रण व विकास योजना विभाग,
झोन क्र. ३, पुणे महानगरपालिका, पुणे श्री. एस.बी.दांडगे

| | |
|---|---|
| | **जन माहिती अधिकारी** तथा उपअभियंता,<br>बांधकाम नियंत्रण व विकास योजना विभाग,<br>झोन क्र. ३, पुणे महानगरपालिका, पुणे श्री. सुधीर पानसरे |
| ४ | माहिती - मागणीच्या मूळ अर्जाची (जोडपत्र-अ) छायाप्रत सोबत जोडली आहे. |

## विवेचन

आयोगापुढील सुनावणीत अपीलकर्ता, जन माहिती अधिकारी व अपिलीय प्राधिकारी यांनी पुढीलप्रमाणे निवेदन केले :

अपीलकर्ता - बाणेर येथे सर्व्हे नं. २८८/१ अ/१ ब येथे गृहसंकुल बांधण्यासाठी निर्मिती बिल्डर्स या विकसकाने सादर केलेल्या व महानगरपालिकेने मंजूर केलेल्या नकाशाची प्रमाणित प्रत इ. माहिती मागितली होती. ती मिळाली नाही. महानगरपालिकेकडील अनेक विभागांकडे वारंवार संपर्क साधूनही मूळ नकाशाची प्रत दिली जात नसल्यामुळे सदनिका खरेदीदारांना अनेक अडचणी सहन कराव्या लागत आहेत. संबंधित विकसकाने सदनिका खरेदीदारांना जे माहिती पत्रक दिले त्यानुसार केलेल्या कामाचा कायदेशीरपणा नकाशा व त्या अनुषंगाने कागदपत्रे प्राप्त झाल्याशिवाय सिध्द होणे शक्य नाही.

जन माहिती अधिकारी- संबंधित गृहप्रकल्पाचा आराखडा पूर्वी जिल्हाधिकारी, पुणे यानी मंजूर केलेला आहे. वेगवेगळे नकाशे विकसकाने मंजूर करुन घेतले असून श्री. मुरकुटे नावाच्या जमीन मालकाच्या नावे आराखडा (Layout) मंजूर आहे, त्याची प्रत उपलब्ध आहे. विकसक/आर्किटेक्ट यांच्याकडून माहिती प्राप्त करुन घेऊन आणली आहे. दोन वेगवेगळे नकाशे होते. त्याना एकत्रित मंजुरी दिलेली नाही. मात्र पूर्णत्वाचा दाखला एकत्रितच दिलेला आहे.

उभय बाजूंची निवेदने व सादर करण्यात आलेली कागदपत्रे विचारात घेता मागितलेली नेमकी माहिती दिली गेली पाहिजे. विकसकाने सादर केलेल्या व महानगरपालिकेने मंजूर केलेल्या बांधकाम नकाशाची प्रत व योग्य ती माहिती अपीलकर्त्यास नेमकेपणाने उपलब्ध करुन दिली गेली पाहिजे. जन माहिती अधिकारी व अपिलीय प्राधिकारी यानी एका आठवडयात ही कार्यवाही करावी, असे मौखिक आदेश आयोगाने सुनावणीच्या वेळी दिले.

आयोगाचे आदेश पुढीलप्रमाणे :

**<u>आदेश</u>**

अपील निकाली काढण्यात येत आहे.

**(विजय कुवळेकर)**
**राज्य माहिती आयुक्त,**
**पुणे खंडपीठ**

**पुणे**
**दि :- २६.९.२०११**

**राज्य माहिती आयुक्त, राज्य माहिती आयोग, महाराष्ट्र राज्य, पुणे खंडपीठ यांच्यासमोर**
**माहितीचा अधिकार अधिनियम,२००५ च्या कलम १९ (३) अन्वये दाखल झालेले अपील**

राज्य माहिती आयोग, पुणे खंडपीठ,
नवीन प्रशासकीय इमारत, चौथा मजला,
कौन्सिल हॉल समोर, पुणे ४११ ००१

श्रीमती उषा कृष्णाजी साळवे
गोपाळ सहकारी गृहरचना संस्था मर्यादित,
फलॅट नं. अे/८, अे वॉर्ड, भांगरवाडी, अपीलकर्ता
लोणावळा, ता. मावळ, जि. पुणे

**विरुध्द**

**अपिलीय प्राधिकारी** तथा मुख्याधिकारी,
लोणावळा नगरपरिषद, ता. मावळ, जि. पुणे

उत्तरवादी

**जन माहिती अधिकारी** तथा सहाय्यक नगररचनाकार,
नगररचना विभाग, लोणावळा नगरपरिषद, ता. मावळ, जि. पुणे

| | | |
|---|---|---|
| १ | अपील क्रमांक | २८०१/२०१०/पुणे |
| २ | सुनावणीची तारीख | दि. १०/५/२०११ |

**३. उपस्थित**

**अपीलकर्ता** श्रीमती उषा कृष्णाजी साळवे
गोपाळ सहकारी गृहरचना संस्था मर्यादित, फलॅट नं. अे/८, अे वॉर्ड,
भांगरवाडी, लोणावळा, ता. मावळ, जि. पुणे

**जन माहिती अधिकारी** तथा सहाय्यक नगररचनाकार,
नगररचना विभाग, लोणावळा नगरपरिषद, ता. मावळ,
जि. पुणे श्री.शरद भागवत पाटील

| | |
|---|---|
| ४ | माहिती - मागणीच्या मूळ अर्जाची (जोडपत्र-अ) छायाप्रत सोबत जोडली आहे. |

## विवेचन

आयोगापुढील सुनावणीत अपीलकर्ता, जन माहिती अधिकारी व अपिलीय प्राधिकारी यांनी पुढीलप्रमाणे निवेदन केले :

अपीलकर्ता - 'प्राईम बिल्डस' या विकसकाने लोणावळा नगर परिषदेचे सहाय्यक नगररचनाकार व त्याच विभागातील कर्मचारी याना हाताशी धरुन मूळ नकाशा डावलून वाढीव व अनधिकृत बांधकाम केले. याबाबत आम्ही वेळोवेळी केलेल्या तक्रारीची दखल सहाय्यक नगररचनाकार यानी घेतली नाही. त्यामुळे दि. ३०/८/२०१० च्या अर्जान्वये माहिती मागितली होती. परंतु जन माहिती अधिकारी यानी विलंबाने व अपूर्ण माहिती दिली. एका आठवडयात माहिती देण्याचे आदेश अपिलीय प्राधिकारी यानी दि. २६/१०/२०१० रोजी देऊनही व त्यानंतर स्मरणपत्र देऊनही जन माहिती अधिकारी श्री.शरद भागवत पाटील यानी दि. १०/१२/२०१० रोजी म्हणजे ३ महिने १४ दिवसांनी व तीही अपूर्ण माहिती दिली. आम्ही केलेले तक्रार अर्ज त्यानी नष्ट केले असून संचिकेत ते नसल्याचे सांगितले. त्यामुळे त्यांच्यावर दंडात्मक कारवाई व्हावी.

जन माहिती अधिकारी - अपीलकर्त्यांनी याच विषयाच्या अनुषंगाने ६ अर्ज केले असून यापूर्वी त्यांच्या ३ अपिलांची सुनावणी आयोगापुढे झाली आहे. वेळोवेळी त्याना माहिती दिली असून सर्व संचिकाही अवलोकनासाठी उपलब्ध करुन दिल्या. तसेच दि. ३०/८/२०१० च्या अर्जानुसार दि. २९/९/२०१० च्या पत्रान्वये मुद्देनिहाय माहिती दिली. एक दिवसाचा विलंब झाल्याचे अपीलकर्त्यांचे म्हणणे असल्यामुळे माहिती निःशुल्क दिली. त्यामुळे हा खर्च संबंधितांकडून वसूल करण्याचे आदेश अपिलीय प्राधिकारी यानी दिले. त्यानुसार सहाय्यक जन माहिती अधिकारी श्री. प्रशांत प्रल्हाद घुमे यांच्याकडून ही रक्कम वसूल करण्यात आली. श्री. स. प. उगिले हे तत्कालीन जन माहिती अधिकारी होते. मी दि. २०/१०/२०१० रोजी पदभार स्वीकारला. अपिलीय प्राधिकारी यानी अभिलेख तपासून माहिती देण्याचे आदेश दिले होते. त्यानुसार मी स्वतः माहिती दिली. अभिलेखानुसार सर्व कागदपत्रे देण्यात आली आहेत.

उभय बाजूंची निवेदने व सादर करण्यात आलेली कागदपत्रे विचारात घेता तत्कालीन जन माहिती अधिकारी श्री. स. प. उगिले यानी मुद्देनिहाय उत्तर दिले असून अभिलेखानुसार माहिती दिली आहे. अपीलकर्त्यांनी अनेक मुद्दयांमध्ये कारणांची विचारणा केली असून अशा स्वरुपाची विचारणा माहितीचा अधिकार अधिनियम, २००५ च्या कलम २ मधील 'माहिती'च्या व्याख्येत येत नाही. संबंधितांनी कागदपत्रे नष्ट केल्याचे अपीलकर्त्यांचे म्हणणे आहे. हा आरोप गंभीर स्वरुपाचा असला, तरी याबाबत रीतसर कायदेशीर कारवाई करण्याचा मार्ग त्याना उपलब्ध आहे. या आरोपाची, चौकशी तसेच विकसकाने नगरपरिषदेतील कर्मचाऱ्यांच्या सहाय्याने बेकायेदशीर बांधकाम केल्याबाबतच्या तक्रारीची कारणे माहितीचा अधिकार अधिनियम, २००५ च्या कक्षेतील बाब नाही.

आयोगाचे आदेश पुढीलप्रमाणे :

**आदेश**

अपील अमान्य करण्यात येत आहे.

**(विजय कुवळेकर)**
**राज्य माहिती आयुक्त,**
**पुणे खंडपीठ**

**पुणे**
**दि :- २६.९.२०११**

**राज्य माहिती आयुक्त, राज्य माहिती आयोग, महाराष्ट्र राज्य, पुणे खंडपीठ यांच्यासमोर**
**माहितीचा अधिकार अधिनियम, २००५ च्या कलम १९ (३) अन्वये दाखल झालेले अपील**

राज्य माहिती आयोग, पुणे खंडपीठ,
नवीन प्रशासकीय इमारत, चौथा मजला,
कौन्सिल हॉल समोर, पुणे ४११ ००१

डॉ.भाऊ रघुनाथ साबडे
सोनिया, २३८, श्री को-ऑप. सहकारी गृहरचना संस्था, सहकारनगर नं.२, पुणे-९ अपीलकर्ता

**विरुध्द**

**अपिलीय प्राधिकारी** तथा रजा राखीव उपजिल्हाधिकारी (कूळकायदा शाखा),
जिल्हाधिकारी कार्यालय, पुणे-१ उत्तरवादी

**जन माहिती अधिकारी** तथा
(१)अप्पर चिटणीस, कुळकायदा शाखा, जिल्हाधिकारी कार्यालय, पुणे
(२)अव्वल कारकून, पूरनिवारण शाखा, जिल्हाधिकारी कार्यालय, पुणे

| | | |
|---|---|---|
| १ | अपील क्रमांक | २७२३ / २०१० / पुणे |
| २ | सुनावणीची तारीख | दि. ..२०११ |

**३. उपस्थित**

**अपीलकर्ता** डॉ.भाऊ रघुनाथ साबडे
सोनिया, २३८, श्री को-ऑप. सहकारी गृहरचना संस्था, सहकारनगर नं.२, पुणे

**अपिलीय प्राधिकारी** तथा रजा राखीव उपजिल्हाधिकारी (कूळकायदा शाखा),
जिल्हाधिकारी कार्यालय, पुणे डॉ.किरण महाजन

**जन माहिती अधिकारी** तथा (१)अप्पर चिटणीस, कुळकायदा शाखा,
जिल्हाधिकारी कार्यालय, पुणे श्रीमती अमिता तळेकर

| ४ | माहिती - मागणीच्या मूळ अर्जाची (जोडपत्र-अ) छायाप्रत सोबत जोडली आहे. |
|---|---|

## विवेचन

अपीलकर्ता, जन माहिती अधिकारी व अपिलीय प्राधिकारी यांनी आयोगासमोरील सुनावणीत खालीलप्रमाणे निवेदन केले :

अपीलकर्ता : सन १९६१ मध्ये आलेल्या पानशेत पुरानंतर सरकारने पूरग्रस्तांना पुण्यातील सहकारनगर क्र.१ व २ मध्ये दिर्घ भाडेपट्ट्याच्या मुदतीने जमिनी दिल्या. ८९६ सभासद असून सन १९७० पासून आम्ही तेथे राहत आहोत. महानगरपालिकेचे आवश्यक कर भरत आहोत. कागदोपत्री आमची नावे दाखल आहेत. परंतु सरकारने जमिनी दिलेल्या आदेशाची प्रत मिळत नाही. जिल्हाधिकारी कार्यालयातही मिळत नाही. भाडेपट्टा संपल्यावर जागा मालकीच्या करण्यासाठी अडचण येऊ नये या दृष्टीने ही प्रत अधिकृत पुराव्यासाठी मिळणे आवश्यक आहे.

जन माहिती अधिकारी : अपीलकर्त्यांनी मूळ अर्ज महसूल शाखेत केलेला आहे. तेथे अपीलकर्त्यांना हव्या असलेल्या आदेशाच्या प्रती न मिळाल्याने अर्ज आमच्या विभागाकडे वर्ग करयात आला. परंतु आमच्या विभागाकडेही हे अभिलेख आढळ होत नाहीत. भूखंड वाटपाचे कामकाज महसूल शाखेकडून झाले असून आदेशाची स्वाक्षरी नसलेली प्रत उपलब्ध आहे. महसूल शाखेकडे हे अभिलेख उपलब्ध असावे लागतील.

अपिलीय प्राधिकारी : महसूल शाखेकडील हा विषय असून फक्त देखरेखीसाठी आमच्या कक्षेत आहे. संबंधित अभिलेख हे कायमस्वरूपी जतनाचे आहेत.

उभय बाजूंची निवेदने व सादर करण्यात आलेली कागदपत्रे विचारात घेता अपीलकर्त्याची मागणी सार्वजनिक हिताच्या स्वरूपाची असून संबंधित अभिलेख कायमस्वरू पी जतनाचे आहेत. शासनाच्या आदेशाची प्रत संबंधित शासकीय कार्यालयात उपलब्ध असणे आवश्यक आहे. महाराष्ट्र अभिलेख अधिनियम, २००५ अन्वये जतनाच्या कालावधीनुसार अभिलेख उपलब्ध होणे बंधनकारक आहे. म्हणून जिल्हाधिकारी, पुणे यानी याबाबत संबंधितांकरवी अधिक कसून शोध घेणे व अपीलकर्त्याच्या मागणीनुसार कागदपत्रे उपलब्ध करून देणे आवश्यक आहे.

आयोगाचे आदेश पुढीलप्रमाणे :

## आदेश

(१) अपील मान्य करण्यात येत आहे.

(२) पानशेत पूरग्रस्तांना पुण्यातील सहकारनगर क्र.१ व २ मध्ये सरकारने ९९ वर्षांच्या भाडेपट्ट्याने दिलेल्या जमिनीबाबतच्या शासकीय आदेशाचा व अनुषंगिक कागदपत्रांचा शोध संबंधित विभागाकरवी घेऊन जिल्हाधिकारी, पुणे यानी अपीलकर्त्यास त्याच्या प्रती उपलब्ध करून द्याव्यात व दि.२९.१०.२०११ पर्यंत आयोगाला अनुपालन अहवाल सादर करावा.

**(विजय कुवळेकर)**
**राज्य माहिती आयुक्त,**
**पुणे खंडपीठ**

**पुणे**
**दि :- २६.९.२०११**

प्रतः:जिल्हाधिकारी, पुणे याना पुढील कारवाईसाठी

**राज्य माहिती आयुक्त, राज्य माहिती आयोग, महाराष्ट्र राज्य, पुणे खंडपीठ यांच्यासमोर**
**माहितीचा अधिकार अधिनियम,२००५ च्या कलम १९ (३) अन्वये दाखल झालेले अपील**

राज्य माहिती आयोग, पुणे खंडपीठ,
नवीन प्रशासकीय इमारत, चौथा मजला,
कौन्सिल हॉल समोर, पुणे ४११ ००१

श्री. गजानन भिकाजी कुंभार
सरस्वती नगर, बर्फाचे कारखान्यासमोर,
इंदापूर, जि. पुणे — अपीलकर्ता

**विरुध्द**

**अपिलीय प्राधिकारी** तथा तहसीलदार,
तहसील कार्यालय इंदापूर, ता. इंदापूर, जि. पुणे

उत्तरवादी

**जन माहिती अधिकारी** तथा निवासी नायब तहसीलदार,
तहसील कार्यालय इंदापूर, ता. इंदापूर, जि. पुणे

| | | |
|---|---|---|
| १ | अपील क्रमांक | २१२१/२०१०/पुणे |
| २ | सुनावणीची तारीख | दि. ६/१/२०११ |

**३. उपस्थित**

**अपीलकर्ता** श्री. गजानन भिकाजी कुंभार
सरस्वती नगर, बर्फाचे कारखान्यासमोर, इंदापूर, जि. पुणे

**अपिलीय प्राधिकारी** तथा तहसीलदार,
तहसील कार्यालय इंदापूर, ता. इंदापूर, जि. पुणे श्री. नागेश प्र. पाटील

| | |
|---|---|
| ४ | माहिती - मागणीच्या मूळ अर्जाची (जोडपत्र-अ) छायाप्रत सोबत जोडली आहे. |

## विवेचन

शासकीय जमीन आपल्याला मिळावी, या मागणीबाबत जिल्हाधिकाऱ्यांकडे केलेल्या अर्जानुसार चौकशी करण्याची सूचना जिल्हाधिकाऱ्यांनी तहसील कार्यालयाला दिली होती. परंतु त्यानुसार योग्य चौकशी व कार्यवाही झाली नाही, अशी अपीलकर्ता श्री. गजानन भिकाजी कुंभार यांची तक्रार असून या संदर्भात आयोगाने यापूर्वी त्यांच्या अपील क्र. २१२१/२०१०/पुणे या अपिलावर आदेश पारित केलेले आहेत. त्याच मागणीसाठी अपीलकर्ता यानी नव्याने दोन अपिले दि. १३/९/२०११ व दि. १५/९/२०११ रोजी सादर केली आहेत. आयोगाचा यापूर्वीचाच निर्णय प्रस्तुत अपिलांमध्येही लागू आहे. वैयक्तिक स्वरुपाच्या, तसेच प्रशासकीय कार्यवाहीची मागणी असलेल्या एकाच विषयासाठी वेळोवेळी माहितीच्या अधिकारात अर्ज व अपिले करुन सर्व यंत्रणेचा वेळ व परिश्रम यांचा अपव्यय करु नये. याच विषयाबाबत याच मागणीसाठी अपीलकर्त्यांनी आयोगाकडे पुन्हा अपील केल्यास त्याची दखल घेण्यात येणार नाही, याची समज अपीलकर्त्यास देण्यात येत आहे.

आयोगाचे आदेश पुढीलप्रमाणे :

## आदेश

अपिले अमान्य करण्यात येत आहेत.

**(विजय कुवळेकर)**
**राज्य माहिती आयुक्त,**
**पुणे खंडपीठ**

**पुणे**
**दि :- २६.९.२०११**

**राज्य माहिती आयुक्त, राज्य माहिती आयोग, महाराष्ट्र राज्य, पुणे खंडपीठ यांच्यासमोर**
**माहितीचा अधिकार अधिनियम, २००५ च्या कलम १९ (३) अन्वये दाखल झालेले अपील**

राज्य माहिती आयोग, पुणे खंडपीठ,
नवीन प्रशासकीय इमारत, चौथा मजला,
कौन्सिल हॉल समोर, पुणे ४११ ००१

श्री.उदय केशव हर्षे
पारिजात, प्लॉट नं.४४, गिरीश सोसायटी, वारजे, पुणे-४११०५८ अपीलकर्ता

**विरुध्द**

**अपिलीय प्राधिकारी** तथा कार्यकारी अभियंता (बांधकाम नियंत्रण),
उपआयुक्त विभागीय कार्यालय क्र.१, पुणे महानगरपालिका,
मुद्रणालय आवार, घोले रोड, पुणे-५ उत्तरवादी

**जन माहिती अधिकारी** तथा नगर अभियंता (बांधकाम नियंत्रण),
उपआयुक्त विभागीय कार्यालय क्र.१, पुणे महानगरपालिका,
मुद्रणालय आवार, घोले रोड, पुणे-५

| | | |
|---|---|---|
| १ | अपील क्रमांक | ३०१६ / २०१० / पुणे |
| २ | सुनावणीची तारीख | दि.२९.६.२०११ |

**३. उपस्थित**

**अपीलकर्ता** श्री.उदय केशव हर्षे
पारिजात, प्लॉट नं.४४, गिरीश सोसायटी, वारजे, पुणे-४११०५८

**अपिलीय प्राधिकारी** तथा कार्यकारी अभियंता (बांधकाम नियंत्रण),
उपआयुक्त विभागीय कार्यालय क्र.१, पुणे महानगरपालिका,
मुद्रणालय आवार, घोले रोड, पुणे श्री.रामचंद्र तुकाराम शेळकंदे

**जन माहिती अधिकारी** तथा नगर उपअभियंता (बांधकाम नियंत्रण),
उपआयुक्त विभागीय कार्यालय क्र.१, पुणे महानगरपालिका,
मुद्रणालय आवार, घोले रोड, पुणे श्री.जगदीश रामचंद्र जाधव

| | |
|---|---|
| ४ | माहिती - मागणीच्या मूळ अर्जाची (जोडपत्र-अ) छायाप्रत सोबत जोडली आहे. |

# विवेचन

अपीलकर्ता, जन माहिती अधिकारी व अपिलीय प्राधिकारी यांनी आयोगासमोरील सुनावणीत खालीलप्रमाणे निवेदन केले :

अपीलकर्ता : वारजे(पुणे) येथील गिरीश सोसायटी मध्ये भूखंड क्र.६२ मधील इमारतीच्या गुंठेवारीबाबतची माहिती मागितली होती. मंजूर लेआऊटमध्ये गुंठेवारी करता येत नसतानाही संबंधित व्यक्तींनी नियमबाह्य जास्त बांधकाम केले आहे. त्याबाबत मागणी करूनही कारवाई केली जात नाही व माहितीही दिली जात नाही. दोन दिवसांत माहिती देण्याचे आदेश अपिलीय प्राधिकारी यानी दिले होते. परंतु तरीही जन माहिती अधिकारी यानी माहिती दिली नाही.

जन माहिती अधिकारी : अपीलकर्त्याचा अर्ज दि.१५.१२.२००९ चा असून माहिती क्षेत्रिय कार्यालयाकडील असल्याने तत्कालीन जन माहिती अधिकारी श्री.रामचंद्र तुकाराम शेळकंदे यानी त्याच दिवशी तो सहाय्यक जन माहिती अधिकारी तथा सहाय्यक अभियंता (बांधकाम निरीक्षक),वारजे, कर्वेरोड क्षेत्रिय कार्यालय, पुणे महानगरपालिका यांच्याकडे वर्ग केला. मान्य गुंठेवारीची संचिका संबंधित विभागाकडून प्राप्त करून घेऊन माहिती उपलब्ध करून देण्याच्या सूचना सहाय्यक जन माहिती अधिकारी यानी संबंधित कर्मचाऱ्यांना दिल्या. नंतरच्या काळात जन माहिती अधिकारी व अपिलीय प्राधिकारी यांची व्यवस्था बदलली गेली व तत्कालीन जन माहिती अधिकारी हे अपिलीय प्राधिकारी झाले आणि सहाय्यक जन माहिती अधिकारी हे जन माहिती अधिकारी झाले. कर्वेनगर क्षेत्रिय कार्यालयातील जन माहिती अधिकारी म्हणून मी (श्री.जगदीश रामचंद्र जाधव यानी) दि.६.४.२०१० रोजी माहिती श्री.हर्षे याना दिली.

अपिलीय प्राधिकारी : त्यावेळच्या नियमानुसार असलेल्या अधिकाराप्रमाणे संबंधित जागेत मल्टी स्टोअरेजच्या बांधकामाला मान्यता दिली होती.

संबंधित बांधकाम बेकायदेशीर असल्याची तक्रार व त्यावरील कार्यवाहीची अपीलकर्त्याची मागणी, तसेच खुलासा, अन्वयार्थ अशा स्वरूपाची प्रश्नार्थक विचारणा या बाबी माहितीचा अधिकार अधिनियम, २००५ अंतर्गत येत नाहीत. तथापि त्या संदर्भातील माहिती अपीलकर्त्यास माहितीचा अधिकार अधिनियम, २००५ मधील तरतुदीनसार ३० दिवसांत-म्हणजे दि.१६.१.२०१०पर्यंत

दिली जाणे आवश्यक होते. तत्कालीन जन माहिती अधिकारी (व विद्यमान अपिलीय प्राधिकारी ) यानी अर्ज त्वरित सहाय्यक जन माहिती अधिकारी यांच्याकडे वर्ग केला असून तत्कालीन सहाय्यक जन माहिती अधिकारी (व विद्यमान जन माहिती अधिकारी) यानी तो श्री.सदानंद विनायक मारणे व श्रीमती वैशाली दत्तात्रय तारू या कर्मचाऱ्यांकडे पुढील कार्यवाहीसाठी सोपविला. दि.६.४.२०१० रोजी कागदपत्रे मिळाल्याची अपीलकर्त्याची स्वाक्षरी असलेली प्रत जन माहिती अधिकारी यानी सादर केली आहे. तत्कालीन अपिलीय प्राधिकारी तथा उपआयुक्त विभागीय कार्यालय क्र.१, पुणे महानगरपालिका, मुद्रणालय आवार, घोले रोड, पुणे श्री.विजय दहीभाते यानी दि.१८.२.२०१० रोजी 'नियमितीकरण दाखला तळटीप क्र.२ नुसार मिळकतीची तपासणी करून १५ दिवसांत कारवाई करावी,' असे आदेश दिले. हे आदेश प्रशासकीय कार्यवाहीचे आहेत, माहिती देण्याबद्दलचे नाहीत. नंतर अपिलीय प्राधिकारी झ ालेले श्री.शेळकंदे यानी 'दोन दिवसात माहिती देण्याचे आदेश' दि.२४.९.२०१० रोजी दिले असल्याचे कागदपत्रांवरून दिसून येते. तरीही माहिती देण्यास विलंब का झाला, याचे स्पष्टीकरण त्यानी अथवा विद्यमान जन माहिती अधिकारी तथा नगर उपअभियंता (बांधकाम नियंत्रण), उपआयुक्त विभागीय कार्यालय क्र.१, पुणे महानगरपालिका, मुद्रणालय आवार, घोले रोड, पुणे श्री.जगदीश रामचंद्र जाधव यानी दिलेले नाही. संबंधित बांधकामाला दिलेल्या परवानगीची प्रत व गुंठेवारीविषयक परिपत्रकाची प्रत विद्यमान जन माहिती अधिकारी तथा नगर उपअभियंता (बांधकाम नियंत्रण), उपआयुक्त विभागीय कार्यालय क्र.१, पुणे महानगरपालिका, मुद्रणालय आवार, घोले रोड, पुणे श्री.जगदीश जाधव यानी अपीलकर्त्यास आठ दिवसांत द्यावी, असे मौखिक आदेश आयोगाने सुनावणीच्या वेळी दिले. परंतु त्यानुसार माहिती मिळाली नसल्याची तक्रार अपीलकर्ता श्री.उदय केशव हर्षे यानी दि.११.७.२०११ च्या पत्रान्वये आयोगाकडे केली. मात्र आयोगाच्या मौखिक आदेशानुसार दि.२.७.२०११ च्या पत्रान्वये माहिती पाठविण्यात आली असून दि.१२.७.२०११ ची त्यांची पोहोच असल्याची प्रत विद्यमान जन माहिती अधिकारी तथा नगर उपअभियंता (बांधकाम नियंत्रण), उपआयुक्त विभागीय कार्यालय क्र.१, पुणे महानगरपालिका, मुद्रणालय आवार, घोले रोड, पुणे श्री.जगदीश जाधव यानी आयोगास अहवालासोबत सादर केली..

उभय बाजूंची निवेदने व सादर करण्यात आलेली कागदपत्रे विचारात घेता अपीलकर्ता याना माहिती देण्यास झालेल्या विलंबाबाबत संबंधित कर्मचाऱ्यांच्या खुलाशासह अहवाल अपिलीय प्राधिकारी तथा कार्यकारी अभियंता (बांधकाम नियंत्रण), उपआयुक्त विभागीय कार्यालय क्र.१, पुणे महानगरपालिका, मुद्रणालय आवार, घोले रोड, पुणे यानी सादर करणे आवश्यक आहे.

आयोगाचे आदेश पुढीलप्रमाणे :

## आदेश

(१) अपील अंशतः मान्य करण्यात येत आहे.

(२) अपीलकर्ता श्री.उदय केशव हर्षे याना माहिती देण्यास ७७ दिवस विलंब झाल्याचे कागदपत्रांवरून दिसून येते. तत्कालीन जन माहिती अधिकारी तथा नगर उपअभियंता (बांधकाम नियंत्रण), उपआयुक्त विभागीय कार्यालय क्र.१, पुणे महानगरपालिका, मुद्रणालय आवार, घोले रोड, पुणे यानी तत्कालीन सहाय्यक जन माहिती अधिकारी तथा सहाय्यक अभियंता (बांधकाम निरीक्षक), वारजे कर्वेरोड क्षेत्रिय कार्यालय, पुणे महानगरपालिका श्री.जगदीश रामचंद्र जाधव यांच्याकडे अर्ज ५ दिवसाच्या विहित मुदतीत वर्ग केला असून सहाय्यक जन माहिती अधिकारी यानी श्री.सदानंद विनायक मारणे व श्रीमती वैशाली दत्तात्रय तारू यांना माहिती सादर करण्याबाबतच्या सूचना दिल्याचे कागदपत्रावरून स्पष्ट होते. त्यामुळे माहितीचा अधिकार अधिनियम, २००५ च्या कलम ५(४, ५) अन्वये श्री.सदानंद विनायक मारणे व श्रीमती वैशाली दत्तात्रय तारू हे जन माहिती अधिकारी ठरतात. माहिती देण्यास झालेल्या विलंबाबाबत शास्तीविषयक म्हणण्यासह त्यांचा लेखी खुलासा घेऊन स्वयंस्पष्ट अभिप्रायासह अपिलीय प्राधिकारी तथा कार्यकारी अभियंता (बांधकाम नियंत्रण), उपआयुक्त विभागीय कार्यालय क्र.१, पुणे महानगरपालिका, मुद्रणालय आवार, घोले रोड, पुणे यानी दि.१५.१०.२०११ पर्यंत आयोगाला सादर करावा. शास्तीविषयक निर्णय त्यानंतर घेण्यात येईल.

(३) अपीलकर्त्यास हवे असल्यास संबंधित गुंठेवारीच्या प्रकरणातील सर्व संचिकांचे अवलोकन जन माहिती अधिकारी तथा नगर उपअभियंता (बांधकाम नियंत्रण), उपआयुक्त विभागीय कार्यालय क्र.१, पुणे महानगरपालिका, मुद्रणालय आवार, घोले रोड, पुणे यानी करू द्यावे व त्याना हव्या असलेल्या कागदपत्रांच्या प्रती योग्य ते शुल्क आकारून पुरवाव्यात. यानुसार कार्यवाही करून त्यानी दि.१५.१०.२०११ पर्यंत आयोगाला अहवाल सादर करावा.

**(विजय कुवळेकर)**
**राज्य माहिती आयुक्त,**
**पुणे खंडपीठ**

**पुणे**
**दि :- २७.९.२०११**

**राज्य माहिती आयुक्त, राज्य माहिती आयोग, महाराष्ट्र राज्य, पुणे खंडपीठ यांच्यासमोर**
**माहितीचा अधिकार अधिनियम,२००५ च्या कलम १९ (३) अन्वये दाखल झालेले अपील**

राज्य माहिती आयोग, पुणे खंडपीठ,
नवीन प्रशासकीय इमारत, चौथा मजला,
कौन्सिल हॉल समोर, पुणे - ४११ ००१

श्री.गणपती बीरु लांबोर
मु.पो.कोलीक पैकी धनगरवाडा, **अपीलकर्ता**
ता.पन्हाळा, जि.कोल्हापूर

**विरुध्द**

**अपिलीय प्राधिकारी तथा तहसीलदार,**
तहसील कार्यालय पन्हाळा,
जि.कोल्हापूर

**उत्तरवादी**

**जन माहिती अधिकारी तथा निवासी नायब तहसीलदार,**
तहसील कार्यालय पन्हाळा,
जि.कोल्हापूर

| | | |
|---|---|---|
| १ | अपील क्रमांक | २३५१/२०१०/कोल्हापूर |
| २ | सुनावणीची तारीख | दि.२७.९.२०११ |
| ३ | **उपस्थिती**<br>**जन माहिती अधिकारी तथा निवासी नायब तहसीलदार,**<br>तहसील कार्यालय पन्हाळा, जि.कोल्हापूर<br>श्री.शरद वसंतराव पाटील | |
| ४ | **मूळ अर्जान्वये केलेली मागणी :-** मौजे कोलीक येथील गट नं.१३३ मधील सरकारी मुलकीपड गायरान जमिनीतील अतिक्रमणाबाबत दिलेल्या नोटिशीच्या आधारे केलेल्या कार्यवाहीचा तपशील | |

## <u>विवेचन</u>

अपीलकर्ता श्री.गणपती बीरु लांबोर यानी राज्य माहिती आयोगाकडे केलेल्या अपिलावर दि.२७.९.२०११ रोजी सुनावणी घेण्यात आली. घ्मी मागणी केलेली माहिती व कागदपत्रे मला सुनावणीच्या तारखेपूर्वीच मिळाली असल्याने सुनावणीस हजर राहण्याची आवश्यकता वाटत नाही. माझी कोणतीही तक्रार राहिली नाही. माझे अपील निकाली काढण्यात यावेङ, असे अपीलकर्ता श्री.लांबोर यांचे निवेदन जन माहिती अधिकारी तथा निवासी नायब तहसीलदार, तहसील कार्यालय पन्हाळा, जि.कोल्हापूर श्री.शरद वसंतराव पाटील यानी सुनावणीच्या वेळी आयोगास सादर केले.

आयोगाचे आदेश पुढीलप्रमाणे :

## <u>आदेश</u>

अपील निकाली काढण्यात येत आहे.

**पुणे.**
**दि :- २८.९.२०११**

**(विजय कुवळेकर )**
**राज्य माहिती आयुक्त,**
**पुणे खंडपीठ.**

**राज्य माहिती आयुक्त, राज्य माहिती आयोग, महाराष्ट्र राज्य, पुणे खंडपीठ यांच्यासमोर**
**माहितीचा अधिकार अधिनियम,२००५ च्या कलम १९ (३) अन्वये दाखल झालेले अपील**

राज्य माहिती आयोग, पुणे खंडपीठ,
नवीन प्रशासकीय इमारत, चौथा मजला,
कौन्सिल हॉल समोर, पुणे - ४११ ००१

श्री.श्रीमंत शांतविरप्पा कळसगोंडा
मु.पो.नागणसूर, ता.अक्कलकोट, **अपीलकर्ता**
जि.सोलापूर

**विरुध्द**

**अपिलीय प्राधिकारी तथा शिक्षणाधिकारी (माध्यमिक),**
जिल्हा परिषद, सोलापूर

**उत्तरवादी**

**जन माहिती अधिकारी तथा मुख्याध्यापक,**
एच.जी.प्रचंडे हायस्कूल, मु.पो.नागणसूर,
ता.अक्कलकोट, जि.सोलापूर

| | | |
|---|---|---|
| १ | अपील क्रमांक | २६५८/२०१०/सोलापूर |
| २ | सुनावणीचा दिनांक | १०.५.२०११ |
| ३ | उपस्थिती<br><br>श्री.श्रीमंत शांतविरप्पा कळसगोंडा<br>मु.पो.नागणसूर, ता.अक्कलकोट,<br>जि.सोलापूर<br><br>अपिलीय प्राधिकारी तथा **शिक्षणाधिकारी (माध्यमिक),**<br>जिल्हा परिषद, सोलापूर<br>यांचे प्रतिनिधी श्री.मुजावर मदारगवी सय्यदसाहेब, प्रभारी शिक्षणाधिकारी, | |

| | |
|---|---|
| ४ | **मूळ अर्जान्वये केलेली मागणी :-** एच.जी.प्रचंडे हायस्कूल या प्रशालेचे दैनंदिन कामकाज कर्मचाऱ्यांची नियुक्ती, रोस्टर तद्नुषंगिक माहिती |

## विवेचन

अपीलकर्ता श्री.श्रीमंत शांतविरप्पा कळसगोंडा यानी राज्य माहिती आयोगाकडे केलेल्या अपिलावर दि.१०.५.२०११ रोजी सुनावणी घेण्यात आली. सुनावणीतील मौखिक आदेशानुसार अपीलकर्ता श्री.कळसगोंडा याना माहिती देण्यात आली असल्याचे अपीलकर्ता श्री.कळसगोंडा यांच्या पोहोच देणाऱ्या निवेदनासह अपिलीय प्राधिकारी तथा शिक्षणाधिकारी (माध्यमिक), जिल्हा परिषद, सोलापूर यानी आयोगास अहवाल सादर केला आहे.

आयोगाचे आदेश पुढीलप्रमाणे :

## आदेश

अपील निकाली काढण्यात येत आहे.

**पुणे.**
**दि :- २७.९.२०११**

**(विजय कुवळेकर )**
**राज्य माहिती आयुक्त,**
**पुणे खंडपीठ.**

**राज्य माहिती आयुक्त, राज्य माहिती आयोग, महाराष्ट्र राज्य, पुणे खंडपीठ यांच्यासमोर**
**<u>माहितीचा अधिकार अधिनियम,२००५ च्या कलम १९ (३) अन्वये दाखल झालेले अपील</u>**

राज्य माहिती आयोग, पुणे खंडपीठ,
नवीन प्रशासकीय इमारत, चौथा मजला,
कौन्सिल हॉल समोर, पुणे - ४११ ००१

श्री.सुधीर नामदेव खुर्द
मु.पो.येवती, ता.मोहोळ, **अपीलकर्ता**
जि.सोलापूर

**विरुध्द**

**अपिलीय प्राधिकारी तथा अप्पर पोलीस अधीक्षक,**
सोलापूर ग्रामीण, जिल्हाधिकारी कचेरी कंपौंड,
सोलापूर

**उत्तरवादी**

**जन माहिती अधिकारी तथा उप विभागीय पोलीस अधिकारी (मुख्यालय),**
सोलापूर ग्रामीण, सोलापूर

| | | |
|---|---|---|
| १ | अपील क्रमांक | ६६८/२०११/सोलापूर |
| २ | सुनावणीचा दिनांक | दि.३.९.२०११ |
| ३ | **मूळ अर्जान्वये केलेली मागणी :-** दि.११.८.२०१० रोजी दाखल केलेल्या तक्रार अर्जाच्या अनुषंगाने आरोपीवर केलेल्या कारवाईची माहिती | |

**<u>विवेचन</u>**

अपीलकर्ता श्री.सुधीर नामदेव खुर्द यानी राज्य माहिती आयोगाकडे केलेल्या अपिलावर दि.३.९.२०११ रोजी सुनावणी घेण्यात आली. 'मी मागणी केलेली माहिती मला मिळाली असल्याने माझे अपील काढून घेत आहे. माझी काहीही तक्रार राहिलेली नाही', असा अपीलकर्ता श्री.खुर्द यांचा जबाब

जन माहिती अधिकारी तथा उप विभागीय पोलीस अधिकारी (मुख्यालय), सोलापूर ग्रामीण, सोलापूर श्री.एम.एस.उंबरजे यानी आयोगास सादर केला.

आयोगाचे आदेश पुढीलप्रमाणे :

**<u>आदेश</u>**

अपील निकाली काढण्यात येत आहे.

**पुणे.**
**दि :- २८.९.२०११**

**(विजय कुवळेकर )**
**राज्य माहिती आयुक्त,**
**पुणे खंडपीठ.**

**राज्य माहिती आयुक्त, राज्य माहिती आयोग, महाराष्ट्र राज्य, पुणे खंडपीठ यांच्यासमोर**
**माहितीचा अधिकार अधिनियम,२००५ च्या कलम १९ (३) अन्वये दाखल झालेले अपील**

राज्य माहिती आयोग, पुणे खंडपीठ,
नवीन प्रशासकीय इमारत, चौथा मजला,
कौन्सिल हॉल समोर, पुणे - ४११ ००१

श्री.विष्णु पंढरी अतकरे
मु.पो.देगांव (वाळूज), **अपीलकर्ता**
ता.मोहोळ, जि.सोलापूर-४१३ ४१०

**विरुध्द**

**अपिलीय प्राधिकारी तथा प्रादेशिक सहसंचालक (साखर),**
पुणे विभाग, शिवाजीनगर, साखर संकुल,
पुणे-४११ ००५

**उत्तरवादी**

**जन माहिती अधिकारी तथा कार्यकारी संचालक,**
श्री संतनाथ सहकारी साखर कारखाना मर्यादित,
तुळशीदासनगर, ता.बार्शी, जि.सोलापूर

| | | |
|---|---|---|
| १ | अपील क्रमांक | २३१२/२०११/सोलापूर |
| २ | **मूळ अर्जान्वये केलेली मागणी :-** थकित पगार व फायनल अकौंटबाबतची माहिती | |

**विवेचन**

अपीलकर्ता श्री.विष्णु पंढरी अतकरे यानी राज्य माहिती आयोगाकडे केलेल्या अपिलासोबतची कागदपत्रे विचारात घेता जन माहिती अधिकारी तथा कार्यकारी संचालक, श्री संतनाथ सहकारी साखर कारखाना मर्यादित, तुळशीदासनगर, ता.बार्शी, जि.सोलापूर यांचे उत्तर व अपिलीय प्राधिकारी तथा प्रादेशिक सहसंचालक (साखर), पुणे विभाग, शिवाजीनगर, साखर संकुल, पुणे यांचा निर्णय योग्य आहे.

आयोगाचे आदेश पुढीलप्रमाणे :

**<u>आदेश</u>**

अपील अमान्य करण्यात येत आहे.

**पुणे.**
**दि :- २८.९.२०११**

**(विजय कुवळेकर )**
**राज्य माहिती आयुक्त,**
**पुणे खंडपीठ.**

**राज्य माहिती आयुक्त, राज्य माहिती आयोग, महाराष्ट्र राज्य, पुणे खंडपीठ यांच्यासमोर**
**माहितीचा अधिकार अधिनियम, २००५ च्या कलम १९ (३) अन्वये दाखल झालेले अपील**

राज्य माहिती आयोग, पुणे खंडपीठ,
नवीन प्रशासकीय इमारत, चौथा मजला,
कौन्सिल हॉल समोर, पुणे ४११ ००१

श्री.नारायण कृष्णात चावरे व श्री.भगवान कृष्णात चावरे
देवाळे, ता.पन्हाळा, जि.कोल्हापूर अपीलकर्ता

**विरुध्द**

**अपिलीय प्राधिकारी** तथा विस्तार अधिकारी (ग्रामपंचायत),
पंचायत समिती कार्यालय, पन्हाळा, ता.पन्हाळा, जि.कोल्हापूर उत्तरवादी

**जन माहिती अधिकारी** तथा ग्रामसेवक, ग्रामपंचायत देवाळे,
ता.पन्हाळा, जि.कोल्हापूर

| | | |
|---|---|---|
| १ | अपील क्रमांक | १९२२ / २०१० / कोल्हापूर |
| २ | सुनावणीची तारीख | दि.१३.९.२०११ |

**३. उपस्थित**

**अपीलकर्ता** श्री.नारायण कृष्णात चावरे व श्री.भगवान कृष्णात चावरे
देवाळे, ता.पन्हाळा, जि.कोल्हापूर

**अपिलीय प्राधिकारी** तथा विस्तार अधिकारी (ग्रामपंचायत), पंचायत समिती कार्यालय,
पन्हाळा, ता.पन्हाळा, जि.कोल्हापूर श्री.के.एस.पाटील

**जन माहिती अधिकारी** तथा ग्रामसेवक, ग्रामपंचायत देवाळे, ता.पन्हाळा, जि.कोल्हापूर
श्रीमती एल.एस.कणसे

| | |
|---|---|
| ४ | माहिती - मागणीच्या मूळ अर्जाची (जोडपत्र-अ) छायाप्रत सोबत जोडली आहे. |

## विवेचन

अपीलकर्ता, जन माहिती अधिकारी व अपिलीय प्राधिकारी यांनी आयोगासमोरील सुनावणीत खालीलप्रमाणे निवेदन केले :

अपीलकर्ता : आमचे ना हरकत पत्र न घेता शेजाऱ्याच्या बांधकामाला परवानगी दिली. बांधकामाच्या नकाशात सांडपाण्याच्या व्यवस्थेची तरतूद नाही. या बांधकामाबाबतची खरी माहिती दिली नाही.

जन माहिती अधिकारी : संबंधित मिळकतीबाबत अभिलेखानुसार माहिती दिली.

अपिलीय प्राधिकारी : अपीलकर्त्याचा अर्ज विस्तृत भाष्य करून मते नोंदविणारा व मिळकतीच्या माहितीबरोबरच 'दप्तर दिरंगाई कायदा म्हणजे काय?', 'खातेनिहाय चौकशी म्हणजे काय?', 'तीन वर्षे बदली नाही म्हणजे काय?', अशा स्वरूपाचीही विचाराणा करणारा आहे. प्रथम अपिलाच्या सुनावणीला अपीलकर्त्याचे बंधू उपस्थित होते व त्यांच्या मागणीनुसार हवी असलेली माहिती देण्याचे आदेश दिले. त्यानुसार जन माहिती अधिकाऱ्यानी माहिती दिल्याची पाहोच आहे.

माहिती मिळाल्याची अपीलकर्त्याच्या भावाची पोहोच असलेल्या पत्रासह पूरक कागदपत्रांच्या प्रती जन माहिती अधिकारी तथा ग्रामसेवक, ग्रामपंचायत देवाळे, ता.पन्हाळा, जि.कोल्हापूर श्रीमती एल.एस.कणसे व अपिलीय प्राधिकारी तथा विस्तार अधिकारी (ग्रामपंचायत), पंचायत समिती कार्यालय, पन्हाळा, ता.पन्हाळा, जि.कोल्हापूर श्री.के.एस.पाटील यांनी सादर केल्या.

जन माहिती अधिकारी व अपिलीय प्राधिकारी यांनी केलेली कार्यवाही योग्य आहे. अपीलकर्त्यानी केलेल्या अन्य विचारणा अथवा तक्रारी माहितीचा अधिकार अधिनियम, २००५ अंतर्गत येत नाहीत.

आयोगाचे आदेश पुढीलप्रमाणे :

**<u>आदेश</u>**

अपील अमान्य करण्यात येत आहे.

**(विजय कुवळेकर)**
**राज्य माहिती आयुक्त,**
**पुणे खंडपीठ**

**पुणे**
**दि :- २८.९.२०११**

**राज्य माहिती आयुक्त, राज्य माहिती आयोग, महाराष्ट्र राज्य, पुणे खंडपीठ यांच्यासमोर**
**<u>माहितीचा अधिकार अधिनियम, २००५ च्या कलम १९ (३) अन्वये दाखल झालेले अपील</u>**

राज्य माहिती आयोग, पुणे खंडपीठ,
नवीन प्रशासकीय इमारत, चौथा मजला,
कौन्सिल हॉल समोर, पुणे ४११ ००१

श्री.मारुती भाऊसाहेब जाधव
मु.पो.तळाशी, ता.राधानगरी, जि.कोल्हापूर — अपीलकर्ता

**विरुध्द**

**अपिलीय प्राधिकारी** तथा सहनिबंधक वर्ग-१, मध्यवर्ती प्रशासकीय इमारत,
कसबा बावडा रोड, कोल्हापूर — उत्तरवादी

**जन माहिती अधिकारी** तथा दुय्यम निबंधक, श्रेणी-१,
राधानगरी, जि.कोल्हापूर

| | | |
|---|---|---|
| १ | अपील क्रमांक | २१७५ / २०१० / कोल्हापूर |
| २ | सुनावणीची तारीख | दि.१३.९.२०११ |

**३. उपस्थित**

**अपीलकर्ता** श्री.मारुती भाऊसाहेब जाधव
मु.पो.तळाशी, ता.राधानगरी, जि.कोल्हापूर

**अपिलीय प्राधिकारी** तथा सहनिबंधक वर्ग-१, मध्यवर्ती प्रशासकीय इमारत,
कसबा बावडा रोड, कोल्हापूर श्री.चिंतामण भा.भुरकुंडे

**जन माहिती अधिकारी** तथा दुय्यम निबंधक, श्रेणी-१, राधानगरी, जि.कोल्हापूर
विद्यमान प्रतिनिधी-सौ.विद्या रविंद्र कंकाळ, तत्कालीन-श्री.मधुकर यादव धुमाळे

| | |
|---|---|
| ४ | माहिती - मागणीच्या मूळ अर्जाची (जोडपत्र-अ) छायाप्रत सोबत जोडली आहे. |

## विवेचन

अपीलकर्ता, जन माहिती अधिकारी व अपिलीय प्राधिकारी यांनी आयोगासमोरील सुनावणीत खालीलप्रमाणे निवेदन केले :

अपीलकर्ता : नवीन अविभाज्य शर्तीच्या जमिनीची खरेदीपत्रे नोंदवू नयेत, असे शासनाचे आदेश असतानाही दस्त नोंदविला असून त्याबाबतचे स्पष्टीकरण व खरी माहिती जन माहिती अधिकारी यानी दिली नाही. दि.९.२.२०१० रोजी रदन-२३१ हा अशा प्रकारचा दसत नोंदविला गेला आहे हा हे खरे आहे की नाही, हेही सांगितले जात नाही.

जन माहिती अधिकारी : सन १९६२ मध्ये संबंधितानी सरकारी रकमेचा भरणा करून जमीन रिग्रँट करून घेतली त्याबाबतच्या दस्ताचा संदर्भ अपीलकर्ता देत आहेत. त्यांच्या दि.२.३.२०१० च्या अर्जाला दि.१७.३.२०१० च्या पत्रान्वये उत्तर दिले. अनेक मुद्दयांबाबत त्यानी खुलासेवजा प्रश्न विचारले असून तशी माहिती देता येत नसल्याचे कळविले.

अपिलीय प्राधिकारी : दस्ताच्या नोंदीबाबत अपीलकर्त्याची तक्रार असल्यास नियमानुसार ते हरकत घेऊ शकतात. परंतु ती कार्यवाही माहितीच्या अधिकारातील नाही.

दस्ताची नोंदणी अथवा जमिनीची विक्री कायदेशीर की बेकायदेशीर, ही बाब माहितीचा अधिकार अधिनियम, २००५ च्या निर्णय कक्षेतील नाही. मात्र केवळ प्रश्नार्थक विचारणा आहे या कारणावरून माहिती नाकारता येणार नाही. संबंधित प्रश्नाच्या स्वरूपावर त्याबाबतचा निर्णय अवलंबून राहील. त्यानुसार अपीलकर्त्याच्या मूळ अर्जातील मुद्दा क्र.२,३,४ व ५ याचे उत्तर जन माहिती अधिकाऱ्यानी देणे आवश्यक आहे ते चार दिवसांत द्यावे असे मौखिक आदेश आयोगाने सुनावणीच्या वेळी दिले. अन्य मुद्दयांमधील विचारणा माहितीचा अधिकार अधिनियम, २००५ अंतर्गत येत नाही.

आयोगाचे आदेश पुढीलप्रमाणे :

## आदेश

(१) अपील अंशतः मान्य करण्यात येत आहे.

(२) आयोगाच्या मौखिक आदेशानुसार केलेल्या कार्यवाहीचा अहवाल जन माहिती अधिकारी तथा दुय्यम निबंधक, श्रेणी-१, राधानगरी, जि.कोल्हापूर यानी दि.२०.१०.२०११ पर्यंत आयोगाला सादर करावा.

**(विजय कुवळेकर)**
**राज्य माहिती आयुक्त,**
**पुणे खंडपीठ**

**पुणे**
**दि :- ०८.९.२०११**